निवेदन

(मंडळाच्या सहासष्टाव्या वाढदिवसाच्या दिवशी नवीन प्रयोगशाळेचे उद्‌घाटन मा. खासदार जयंतराव टिळक यांच्या हस्ते झाले. त्यावेळी मंडळाचे खजिनदार श्री. नानासाहेब तथा ग. वि. नातू यांनी केलेले निवेदन येथे देत आहोत—संपादक.)

मंडळाच्या मूळ उद्दिष्टांच्या परिपूर्तीसाठी म्हणजे विद्येच्या क्षेत्रात, संशोधनाच्या दिशेने गेल्या दोन वर्षांत आपण काय काय केले आहे याची माहिती या सहासष्टाव्या वाढदिवसाच्या निमित्ताने येथे सांगण्याचे योजिले आहे. आजचा मुख्य समारंभ म्हणजे प्रयोगशाळेचे उद्‌घाटन हा त्याचाच भाग आहे.

(१) गेल्या दोन वर्षांमध्ये आपल्या साधनसामग्रीत लक्षणीय भर पडलेली आहे. जवळजवळ दीड हजार नवी कागदपत्रे मंडळात आलेली आहेत. त्यात रास्त्यांचे बाराशे व इतर कागद थळरनेचे जोशी व गोडबोले यांच्याकडून आले आहेत. याशिवाय पाचशे हस्तलिखित पोथ्या आणलेल्या आहेत. या गेल्या साडेतीनशे वर्षांत तयार झालेल्या आहेत. ही सामग्री मुख्यतः प्रा. खरे यांच्या यत्नाने मिळाली आहे व त्यांना श्री. रा. पा. गोस्वामी यांचे साहाय्य झाले आहे.

(२) आपल्यापाशी असलेल्या साधनांची वर्गवारी, नोंद व सूची करणे ही त्यापुढची पायरी आहे. आपल्या संग्रहात सुमारे बाराशे चित्रे आहेत. त्यांची सविस्तर वर्णनात्मक सूची तयार करण्याचे काम दीड वर्षापूर्वी डॉ. म. श्री. माटे यांनी हाती घेतले आहे. श्रीमती उषा रानडे या कामात त्यांना साहाय्य करीत आहेत. या कामाचा पहिला टप्पा पूर्ण झाला असून सध्या चित्रशाळेत लावलेल्या सर्वच्या सर्व म्हणजे सव्वा चारशे चित्रांची वर्णने तयार आहेत. वस्तुशाळेचीही अशी सूची करण्याच्या कामाला प्रारंभ झाला आहे.

शिवाय, या साधनसामग्रीचा उपयोग करून संशोधनात्मक ग्रंथ तयार करण्याची योजना आखलेली असून, त्यापैकी ‘ तालचित्रे ’ ह्या इंग्रजी ग्रंथाच्या छपाईला प्रारंभ झाला आहे. ब्लॉक करण्याचे काम बहुतेक झाले असून दीड ते दोन महिन्यांत हा ग्रंथ हातात येईल. याचे लेखन मंडळाच्या सदस्या श्रीमती उषा रानडे व श्रीमती कमल चव्हाण अशा दोघींनी केले आहे. आतापर्यंत संग्रहातील चित्रे फुटकळपणे आपण छापली होती. आता या मालेतून संग्रहाचा चांगला अभ्यासही होईल.

मराठी इतिहासाची विस्तृत शकावली प्रा. खरे आणि इतर यांनी तयार केलेली असून त्या ग्रंथाच्या छपाईसही प्रारंभ झालेला आहे. या वर्षामध्ये ते काम पुरे करता येईल अशी अपेक्षा आहे.

संशोधनाच्या प्रसिद्धीचे आपले सर्वांत महत्त्वाचे माध्यम म्हणजे आपले त्रैमासिक. शके १८९५ चे दोन अंक आतापर्यंत प्रसिद्ध झालेले असून पुढच्या तीन अंकांची मुद्रण-प्रत तयार आहे. एक आहे त्रैमासिक–सूचीचा. दुसरा ज्ञानेश्वर-विषयक निबंधाचा व तिसरा संकीर्ण साहित्याचा. (म्हणजे प्रस्तुतचा). या वर्षीच्या डिसेंबरपर्यंत हे तीनही अंक प्रसिद्ध करण्याची खटपट चालू आहे. ह्या अंकाच्या प्रसिद्धीबरोबर पूर्वीचे मागे पडलेले अंक पूर्ण होतील.

आपल्या येथील आणि संशोधकांनी स्वतंत्रपणे जमविलेल्या साधनांवर आधारलेले संशोधन प्रसिद्ध करण्याचा दुसरा मार्ग म्हणजे आपले वार्षिक संमेलन. गेल्या संमेलनासाठी पंचेचाळीस शोध-निबंध आले होते. संमेलनात भाग घेणाऱ्या अभ्यासकांची संख्या वाढतच आहे. विशेष आनंदाची व उल्लेखनीय गोष्ट म्हणजे आपापल्या विषयात प्राविण्य मिळविलेले तरुण, नवीन अभ्यासक जास्तीजास्त संख्येने यात सहभागी होत आहेत.

याच सहभागाची साक्ष नुकत्याच पार पडलेल्या दोन चर्चा-सत्रांत दिसून आली. दोन्ही सत्रे यशस्वी करण्यास प्रा. खरे, डॉ. चिं. ना. परचुरे, व डॉ. मु. श्री. कानडे यांच्याबरोबर आपले अनुभवी सभासद श्री. वि. त्र्यं. शेटे यांचे श्रम कारणीभूत झाले आहेत. यापैकी शिवराजनीतीविषयक सत्रात पंचवीस व ज्ञानेश्वर चरित्र विषयक चर्चासत्रात चाळीस विद्वानांनी भाग घेतला. गतवर्षीपासून शिवजन्म दिवस व यंदापासून बाजी पासलकर दिवस साजरे करण्यात येऊ लागले आहेत. त्यातूनही संशोधकांना अधिक वाव मिळेल. या कामात श्री. एकबोटे व श्री. द. न. पासलकर यांचे अमोल साहाय्य झाले आहे.

हा सर्व प्रपंच चालवावयाचा म्हणजे चांगले द्रव्यबळ हवे. ज्ञानेश्वर व शिवराजनीती ह्या चर्चासत्रासाठी सुमारे दहा हजार रुपये मिळविले. हा झाला लोकाश्रय.

महाराष्ट्र व भारत या दोनही शासनांनी निरनिराळी अनुदाने दिली आहेत. महाराष्ट्र शासनाकडन वार्षिक निर्वाह अनुदान मिळते. ग्रंथालयासाठी ग्रंथालय संचालनालयाकडून प्रतिवर्षी येणाऱ्या अनुदानाशिवाय गतवर्षी आणखी अडीच हजार रुपये रॅक्ससाठी मिळाले. भारत शासनाने प्रयोगशाळा व संग्रहालयीन प्रकाशने या दोन्हीसाठी मिळून गेल्या दोन वर्षांत तेहतीस हजार रुपये अनुदान मंजूर केले आहे. त्यापैकी एक तृतीयांश प्रत्यक्ष हातातही आले आहे.

आज उद्घाटन होत असलेली नवी प्रयोगशाळा याच अनुदानातून निर्माण होत आहे. या कामात डॉ. ग. गं. मुजुमदार यांचे सक्रिय मार्गदर्शन लाभले आहे.

[नव्या प्रयोगशाळेत, नाणी, ताम्रपट अशासारख्या वस्तूंची साफसफाई व जतन, तसेच कागदपत्रांना रासायनिक पद्धतीने निर्जंतुक करण्याच्या नित्याच्या

कामाबरोबरच, भित्तीचित्रांचे संरक्षण, पुराणवस्तूंचे जतन अशा विषयांवर संशोधन करण्याची योजना आहे. व त्या दृष्टीने प्रयोगशाळेची उभारणी करण्यात येत आहे असे डॉ. मुजुमदार यांनी या प्रसंगी सांगितले.

मा. जयंतराव टिळक यांनी, संशोधनाच्या, जतनाच्या पद्धतीत जुने दृष्टिकोन सोडून देऊन नव्या आधुनिक साधनांचा, मार्गांचा वापर करण्याच्या आवश्यकतेवर भर दिला. " मंडळाचे कार्य अधिक नेटाने महाराष्ट्राबाहेरील लोकांपर्यंत पोहोचविण्याची गरज आहे." असे सांगून संशोधन, प्रयोगशाळा, प्रकाशन, इत्यादि कार्यांत भारत शासनाकडून साहाय्य मिळूवन देण्यासाठी शक्य ते सर्व सहकार्य देण्याचे आश्वासन दिले. कार्याध्यक्षांनी या सर्व अपेक्षा पूर्ण करण्याची खटपट सतत करीत राहूच असे सांगितले. त्यांनी पाहुण्यांचे आभार मानल्यावर हा समारंभ संपला.]

छत्रपती संभाजी महाराजांची ' बारद्वारी '

मु. गो. गुळवणी

रायगड ही मराठ्यांची राजधानी असली तरी, वेगवेगळ्या प्रसंगांच्या अनुरोधाने छत्रपतींना आपला मुक्काम निरनिराळ्या ठिकाणी ठेवावा लागे. अशा ठिकाणात पन्हाळगड फार महत्त्वाचा होता. विशेषत: संभाजीच्या कारकीर्दीत ह्या किल्ल्यास विशेष महत्त्व आले.

इ. स. १६८५ ते १६८७ या काळात औरंगजेबाची सक्त मेहनत खचली व शिवाजीचा पाणीदार मुलगा संभाजी युद्ध करून हाती लागावयाचा नाही, याची खात्री झाल्याने बादशहाने आपला मोर्चा विजापूरकडे फिरविला. संभाजी मोंगल फौजेवर दाब ठेवण्याकरिता पन्हाळा व विशाळगड याचे दरम्यान राहू लागला. त्यावेळी " बारद्वारी " नावाची एक जागा संभाजीने आपणासाठी किल्ल्यावर तयार केली. ती संभाजीची खूण म्हणून अद्यापि तेथे दाखविली जाते. (मराठी रियासत, ३, कै. गो. स. सरदेसाई, पान ८२).

वरील उताऱ्यात " बारद्वारी " जागा किल्ल्यावर संभाजीने तयार केली असे विधान आहे. पन्हाळगड ही अदिलशहांची उत्तरेकडील राजधानी असून त्याचे नाव " शहानबी दुर्ग " होते अशी नोंद आहे. (पन्हाळा, रा. ब. डी. बी. पारसनीस) किल्ल्यावर ज्या इमारती आहेत, त्यात " बारद्वारी " नावाची एकही जागा नाही. कारण पन्हाळ्याचे बहुतेक सर्व कागदपत्र मी पाहिले आहेत. तद्वतच विशाळगडीही असे ठिकाण नाही, मग ही जागा कोठे तयार केली असा प्रश्न समोर आला.

दुसरी गोष्ट ही की, या जागेत राहून तो मोंगल फौजेवर दाब ठेवीत असे. यावरून ही जागा पन्हाळा ते विशाळगड या दरम्यान असली पाहिजे. त्यातही विशाळगड हा डोंगरांनी वेढलेला भाग आहे. विशाळगडापेक्षा शत्रूंचे लक्ष अधिक पन्हाळगडाकडेच असणार तेव्हा पन्हाळगड शाबूत ठेवण्यासाठी व शत्रूवर दाब ठेवण्यासाठीच ही जागा अत्यंत सुरक्षित अशी पन्हाळगडानजीकच कोठे तरी असणार (Key Point). याशिवाय पन्हाळगडाला येण्याचा सोपा मार्ग म्हणजे उत्तरेकडून; कारण तिकडे चढ कमी. गडावर संरक्षणाची जास्त व्यवस्था याच बाजूला आहे. त्यावरून गडाच्या पश्चिमेकडे म्हसाईच्या पठाराच्या सभोवार ज्या दऱ्या आहेत; त्या दऱ्यांत कोठेतरी हे ठिकाण असावे असे गृहीत धरून मागोवा घेण्यास सुरुवात केली. त्यातही म्हसाईच्या उत्तरेकडील बाजू अधिक पसंत; कारण सोपा मार्ग शत्रूस हितकारक. तेव्हा त्याच्यावर दाब ठेवण्याचे ठिकाण उत्तर बाजूस असावे हे गृहीत धरून पाहाणी करण्यास सुरुवात केली.

म्हसाईच्या पठाराच्या उत्तर बाजूस (पन्हाळेपासून अंतर ७ मैल) वेखंडवाडी, बादेवाडी, बोंगेवाडी, मराटवाडी, केकलवाडी ही गावे पाहिली. ही गावे सपाटीपासून ६०० फूट उंचीवर डोंगरावर आहेत. ही गावे केव्हापासून अस्तित्वात आहेत ? त्यांतील कुठल्या गावाचे स्थित्यंतर झाले आहे काय ? स्थित्यंतराच्या वेळी कोणी मदत केली आहे काय ? याची पाहाणी सुरू केली तेव्हा वेखंडवाडीचे श्री. भाऊसाहेब खोत, वय ६५, म्हणाले, " बादेवाडी हा गाव मुळचा येथे नव्हता. तो आजचे ठिकाणापासून २ मैलांवर कड्यालगत जंगलात होता. धामधुमीचे काळात त्या गावावर हल्ला झाला. त्यात बरीच माणसे कामी आली. गाव उध्वस्त झाले. उरलेली माणसे निराधार झाली. त्यांना वेखंडवाडीचे खोत, म्हणजे आमचे पूर्वज यांनी आमचे गावचे शीवेत राहावयास जागा दिली व त्यांना आपले अर्धलीचे भाऊ केले व त्या गावाचे नाव " बादेवाडी " असेच ठेवले ".

बादेवाडी गावातील श्री. अर्जुना धोंडी गवड, वय ८५ वर्षे, यांना विचारता त्यांनीही वरील गोष्टीस पुष्टी दिली व आपण वेखंडवाडीच्या खोताचे अर्धलीचे भाऊ असल्याचे सांगितले व तसे जुने कागदही वेखंडवाडीत मी पाहिले.

या नंतर बोरीवडेचे सरपंच, श्री. गवड व श्री. बाबुराव खोत वकील मिळून आम्ही जुने बादेवाडी गाव पाहाण्यास गेलो. नवीन बादेवाडी गावाचे नैर्ऋत्येस २०० फूट उंच डोंगरावर २ मैलांवर एक सपाटी लागली. ही सपाटी १७ एकर आहे. त्याच्या लगत पूर्वेस ४०० फूट उंच जांभे खडकाचा कडा आहे व त्यात ज्या दऱ्या आहेत त्यांना म्हातारीचा दरा, बामण दरा, कुमदरा, झाफचा दरा, चाफे दरा अशी नावे आहेत. या १७ एकर जागेस " भिताडाची मळी " असे नाव आहे. कारण या जागेत अनेक घरांच्या पडक्या भिंती आहेत. एकूण येथे आज १६-१७ घरांचे पाये व अर्धवट पडक्या भिंती आहेत. सध्या हे रान लागवडीसाठी आणले आहे. ही पडकी घरे पाहाताना मला २–३ उखळे आढळली. लगतच एक महादेवाची पिंड आढळली. ही घरे व्यवस्थित व तीन रांगेत बांधली गेली आहेत. महादेवाच्या पिंडीस इथले लोक " ईश्वर-पार्वती " मानतात. याचे मूळ देऊळ कड्यालगत होते. येथून म्हसाई पठारावर जाण्यास फरशी वजा ४–५ फूटाची एक पानंद आहे. (जुना रस्ता) येथे बामण झरा व झाफाच्या दऱ्यातील पाणी पाट बांधून आणलेले आढळले. सध्या जमिनी लागवडीसाठी आणल्याने हे पाट काढून टाकण्यात आल्याचे दिसले. या घरामध्येच १०–१२ वर्षांपूर्वी जमिनीत एक तांब्याचा मोठा तांब्या मिळाल्याचे समजले. तो मी पाहिला. तांब्या पूर्वीच्या जुन्या घाटणीचा आहे. यावरून हे गाव हल्ल्यामध्ये उध्वस्त झाले असावे हे निश्चित. तसेच येथून पूर्वेस, १ मैलावर घोडे काटे (घोडे कौट) या नावाचे स्थान आहे. तेथे घोडी बांधली जात. येथून २ मैलावर पश्चिमेस पांडव दरा आहे. इतकेच नव्हे तर येथून उत्तरेकडील सर्व प्रदेशाची उत्तम टेहेळणी करता

येते, पण हे गाव मात्र कोठूनही दिसत नाही. कारण पठारावरून ४०० फूट खोलीवर व पायथ्यापासून ८०० फूट उंचीवर डोंगरातील खोलगट भागात हे वसविले आहे. शिवाय म्हसाईच्या पठारावरून पन्हाळगड व सभोवतालच्या परिसरांवर सहज ताबा ठेवता येतो. येथील (बादेवाडी) लोक उत्कृष्ट शिकारी म्हणून पूर्वीपासून प्रसिद्ध आहेत. येथील लोकांनी एक जिवंत वाघ पकडून छत्रपतींना दिला होता. याची नोंद जिजाबाईच्या कारकीर्दीत इ. स. १६३० ची आहे. (आकृती १).

"बादेवाडी" व "बारद्वारी" या दोन्ही नावांमध्ये बरेचसे साम्यही आढळते. "बारद्वारी" बोली भाषेत कित्येक वेळा "र" चे "द" होते व जोडाक्षर सुभा शब्दामधील अर्धा शब्द सुटून जातो. त्याप्रमाणेच "बारद्वारी" चे बाददारी झाले. द्वारी मधला "द" गेला. उरले बादवारी, वारीचे वाडी झाले व पुढे बादवाडी चे बादेवाडी झाले. आजही येथील लोक ही जागा बाधीक मानतात. कारण तेथे सुख मिळत नाही. आमचे पूर्वज तेथे उध्वस्त झाले म्हणून या जागी ते प्रतिवर्षी नैवेद्य करतात.

वरील सर्व विवेचनावरून हे निश्चित समजून येईल की, कै. गो. स. सरदेसाई यांनी उल्लेखिलेली "बारद्वारी", संभाजीने राहाण्यासाठी विशाळगड ते पन्हाळगड यांचे दरम्यान केली व ती जागा म्हणजेच मी म्हणतो ती जुने बादेवाडी हे गाव होय.

छत्रपती संभाजींना पन्हाळा व पन्हाळा परिसर हा पूर्णपणे ज्ञात होता. त्यांचे जिवलग मित्र जोत्याजी केसकरांसारखे, या भागातीलच होत. शिकारीनिमित्त ते या भागात फिरले. अचूक ठाणी शोधून मोंगली फौजेवर जेथून त्यांनी ताबा मिळविला, त्या स्थळांची, संभाजीच्या ठाण्याची अचूक माहिती आज नवीन प्रकाशात आणीत आहे.

♠ ♠ ♠

कलचुरी कृष्णराज यांची घारापुरी येथील नाणी

शोभना गोखले

डिसेंबर १९७४ मध्ये कान्हेरी गुंफांचे संरक्षक श्री. व. म. वाणी यांचे नातेवाईक श्री. बागड घारापुरी येथील लेणी बघावयास गेले असता एका फेरीवाल्याने ३१ तांब्याची नाणी श्री. बागड यांना दिली आणि घारापुरी बेटावरील मोर या खेड्यात अशा तऱ्हेची नाणी सापडतात अशी माहिती दिली. ती नाणी श्री. बागड यांनी मला अभ्यासासाठी दिली. नाणी स्वच्छ केल्यावर त्यावर श्रीकृष्णराज ही ब्राह्मी लिपीतील अक्षरे दिसू लागली. (आकृती २ व ३).

प्रस्तुत नाणी तांब्याची असून त्यांचा आकार गोल आहे. गंज चढल्यामुळे काही नाण्यांच्या कडा त्रुटित झाल्या आहेत आणि नाण्यांच्या मागील बाजूवरील नंदीची प्रतिमाही अस्पष्ट झाली आहे. नाण्यांचा व्यास १.०२ सें. मी. ते १.५ सें. मी. आहे. आणि सरासरी वजन ०.९५० ग्रॅम ते ०.३१० ग्रॅम आहे.

नाण्याची दर्शनी बाजू – श्रीकृष्णराज ही ब्राह्मी लिपीतील अक्षरे, नाण्याच्या भोवती ठिपक्यांची किनार आणि नावाखाली यज्ञवेदीप्रमाणे दिसणारी पोकळ आकृती. नाण्याची मागील बाजू — डाव्या बाजूस तोंड केलेला आणि बसलेला नंदी.

या नाण्यावरील अक्षरवटिकेचे साम्य कलचुरी राजा कृष्णराज याच्या चांदीच्या नाण्याशी आहे. कृष्णराजाची चांदीची नाणी सर्वप्रथम इ. स. १८७० साली नाशिक जिल्ह्यातील बागलान तालुक्यात सापडली. गुप्तसम्राट कुमारगुप्त आणि स्कंदगुप्त यांच्या चांदीच्या नाण्यांशी कृष्णराजाच्या नाण्यांचे साम्य आहे ही गोष्ट कै. डॉ. भाऊ दाजी[1] यांनी नजरेस आणली. त्यानंतर कनिंगहॅम[2] फ्लीट[3] भांडारकर आदी संशोधकांनी कृष्णराजाच्या नाण्यांचा अभ्यास केला. विदिशा येथील उत्खननामध्ये कै. डॉ. देवदत्त रामकृष्ण भांडारकर यांना कृष्णराजाची सात चांदीची नाणी सापडली. आजपर्यंत सापडलेल्या उपरिनिर्दिष्ट पुराव्यावरून कलचुरी राजा कृष्णराज याचा विद्वद्‌मान्य कालखंड इ. स. ५५० ते ५७५ असा आहे.

कृष्णराजाची चांदीची नाणी राजपुताना, उत्तर महाराष्ट्र, कोकण आणि विदर्भ या भागात सापडतात. नाशिकजवळ अंजनेरी येथे सापडलेल्या भोगशक्ती[4] राजाच्या ताम्रपटात ' कृष्णराज रूपक ' म्हणजे कृष्णराजाच्या चांदीच्या नाण्यांचा उल्लेख आहे. त्यावरून कृष्णराजरूपक ही नाणी क्षत्रप, सातवाहन आणि त्रैकूटक यांच्या रूप्याच्या नाण्यापेक्षा भिन्न होती ही गोष्ट स्पष्ट होते आणि कृष्णराजानंतर १५० वर्षांच्या कालावधीनंतरही कृष्णराजाची नाणी प्रचलित होती ही गोष्ट डॉ. वा.

वि. मिराशी[५] यांनी पूर्वीच स्पष्ट केली आहे. आजपर्यंत कृष्णराजाची तांब्याची नाणी सापडली नव्हती. या ३१ तांब्याच्या नाण्यांमुळे एक नवीनच पुरावा उपलब्ध झाला आहे. कलचुरी राजा कृष्णराजाची, रूप्याची आणि तांब्याची नाणी एक-समयावच्छेदेकरून प्रचलित होती हे नव्याने सिद्ध झाले आहे. प्रस्तुत नाणी लहान असली तरी या नाण्यांचे पहिल्या कुमारगुप्ताच्या तांब्याच्या नाण्यांशी आणि स्कंद-गुप्ताच्या वृषभांकित नाण्यांशी साम्य आहे. गुप्तराजांची बिरुदे 'महाराजाधिराज' कृष्णराज व शंकरगण यांच्या लेखात आढळून येतात ही गोष्ट सर्वज्ञात आहे. प्रस्तुत नाण्यांवर कृष्णराजांचे मातापितृपादानुध्यात हे चांदीच्या नाण्यांवर सापडणारे बिरुद नाही.

कृष्णराजाची तांब्याची नाणी घारापुरीच्या परिसरात सापडली ही गोष्ट अतिशय महत्त्वाची आहे. घारापुरीची लेणी कोणत्या राजाच्या कारकीर्दीमध्ये निर्माण झाली याबद्दल विद्वानांच्यामध्ये मत-मतांतरे आहेत. मिशिगन विद्यापीठातील प्रा. स्पिक[६] यांच्या मते घारापुरीच्या लेण्यांचा निर्माता कलचुरी राजा कृष्णराज होता. या राजाने दक्षिणेकडे देश पादाक्रांत करण्यास प्रारंभ केल्यामुळे अजिंठ्याचे शिल्पवैभव संपुष्टात आले. प्रा. स्पिक यांनी घारापुरी येथील लेणी व अजिंठा येथील लेणी यामधील शिल्प, मूर्ती व स्थापत्यकला यांमध्ये कमालीचे साम्य असल्याचे दाखवून दिले आहे. वाकाटक साम्राज्याचा अस्त झाल्यानंतर अजिंठ्याचे कलाकार घारापुरी येथे आले असावेत. कलचुरी राजा कृष्णराज याच्या आश्रयाखाली सुरू झालेल्या कलानिर्मितीमध्ये त्यांनी कलानैपुण्य दाखविले असावे. प्रस्तुत नाणी घारापुरीच्या परिसरात सापडली हाही एक महत्त्वाचा दुवा आहे. यामुळे प्रा. स्पिक यांच्या मताला पुष्टी मिळते. आतापर्यंत कलचुरी राजा कृष्णराज याची तांब्याची नाणी अन्यत्र कोठेही सापडली नाहीत. वरील विवेचनावरून ही तांब्याची नाणी नाणकशास्त्राच्या इतिहासात अतिशय महत्त्वाची आहेत हे स्पष्ट होते.

(१) कलचुरी राजा कृष्णराज याची तांब्याची व चांदीची नाणी एक-समयावच्छेदेकरून प्रचलित होती हे नव्याने सिद्ध झाले.

(२) उभय नाण्यांच्या प्रसारास केवळ राजकीय अशांतता किंवा आर्थिक पेच याच गोष्टी कारणीभूत नसून अन्य गोष्टींचाही नव्याने विचार व्हावयास हवा. उदा० तांब्याची नाणी घारापुरी येथे कामगारांना रोजगारासाठी देत असावेत.

(३) कलचुरी राजा कृष्णराज हा घारापुरीच्या लेण्यांचा निर्माता होता. या प्रा. स्पिक यांच्या सिद्धान्तास या नाण्यांमुळे एक महत्त्वाची पुष्टी मिळतो.

चांदवड भित्तीचित्रातील एक प्रतीक : नारी-कुञ्जर

कमल चव्हाण

चांदवड येथे होळकरांचा 'रंगमहाल' नावाचा प्रसिद्ध प्रासाद आहे. त्यातील काष्ठशिल्पाइतकीच त्यातील भित्तीचित्रे मध्ययुगीन कलेच्या अभ्यासकांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहेत. या चित्रकामातील एक चित्र, त्यांची पूर्वपरंपरा व त्यातील कलात्मकता यामुळे विशेष उल्लेखनीय झालेले आहे. ते म्हणजे नारीकुंजराचे. राधाकृष्ण हे युगूल एका हत्तीवर बसून जात आहे. ह्या हत्तीची आकृती आठ स्त्रियांच्या आकृतीच्या संयोजनातून उत्पन्न केली आहे. भोवती निरनिराळी वाद्ये घेतलेल्या स्त्रिया आहेत. (आकृती ४).

चित्रकाराच्या कल्पनाविलासातून ज्या काही अनेक चमत्कृतीपूर्ण गोष्टी उत्पन्न होतात, त्यांपैकी नारीकुंजर ही एक. या प्रतीकाची मूळ प्रेरणा तेराव्या शतकात भारतात प्रचलित झालेल्या अरबी कलाप्रवाहातून मिळालेली असावी. धार्मिक वचने, श्लोक हे लिहिताना अक्षरांची काहीशी अलंकारिक मांडणी करून त्याद्वारे सिंह, हत्ती, घोडा, हरिण अशा प्राण्यांच्या आकृत्या उत्पन्न करीत. अशी चित्रे घराच्या भिंतीवर टांगण्यात येत. पशुपक्षी, मानवप्राणी यांच्या प्रत्यक्ष चित्रणाला इस्लामने बंदी केलेली असल्याने कलाकारांनी हा अप्रत्यक्ष मार्ग चोखाळून वास्तुशोभनाची व्यवस्था केली. ही मूळ कल्पना उचलून भारतीय कलाकारांनी अक्षरांऐवजी मानवी आकृतीचाच मूल-घटक म्हणून उपयोग केला व त्यातून अश्व, गज, मृग, शकट, इतकेच काय पालखी, अशा आकृती तयार केल्या. या सर्वांवर लक्ष्मी-विष्णु, रति-मदन किंवा राधा-कृष्ण ही दांपत्ये आरूढ झालेली दिसतात. क्वचित देवीचे वाहन असणाऱ्या सिंहाच्या शरीरात अनेक पशु-पक्ष्यांच्या आकृती बसविलेल्या दिसतात. त्या सिंहाला 'विश्वरूप'च देण्यात येते. (Erich Neumann, *The Great Mother* 1955, pt. 130). हे चित्र मुगलकालीन आहे. पण अशा चित्रांना प्रारंभ जैन हस्तलिखितातच झाला होता. अर्थात नारीकुंजर ही आकृती सर्वांत अधिक प्रिय होती. या चित्राने भूषविलेली उंची वस्त्रप्रावरणे एकमेकांना भेटीदाखल देण्याचीही प्रथा होती असे समकालीन साहित्यावरून दिसते. पुढे वैष्णवधर्मीय हस्तलिखितात आणि पंधराव्या-सोळाव्या शतकानंतरच्या लघुचित्रात या रूपकाचा वापर मोठ्या प्रमाणात होऊ लागला. कालांतराने भारतीय कलाकारांच्या व विचारवंतांच्या प्रकृतीला अनुसरून या रूपकाला, कलात्मकतेच्या जोडीने अध्यात्मिक संदर्भही देण्यात आला. 'अकहोरचित' 'अनुभवबंध' काव्यात, चित्राची पार्श्वभूमी निर्गुण ब्रह्माचे प्रतीक आहे अशी कल्पना केलेली आहे. नऊ गोपी या मानवी शरीराच्या नऊ प्रवेशमार्गाचे तर कुंजरावर आरूढ झालेला कृष्ण हा आत्म्याचे प्रतीक आहे अशीही कल्पना पाहावयास मिळते.

राधा-कृष्ण यांच्या भावमधूर संबंधांची यातून अभिव्यक्ती होणे स्वाभाविकच होते. राधा व इतर गोपी यांनी कृष्णाबरोबर केलेल्या एका परिहासाची कथा पुराणान्तरी आहे. नऊ गोपींनी आपल्या शरीराचा एक हत्ती तयार केला. मध्य-रात्रीच्या अंधारात थकलेल्या कृष्णाला हा हत्ती दिसल्यावर तो त्यावर स्वार होऊ लागला. तेवढ्यात हत्ती विस्कळित झाला व खाली आलेल्या स्वारीभोवती गोपींनी हासत-नाचत फेर धरला! अक्रूराबरोबर निघालेल्या कृष्णाला थोपविण्यासाठी राधेने नारीकुंजराचे राजसी वाहन प्रस्तूत केले असे नरसी मेहता यांनी आपल्या 'गोविंद-गमन' काव्यात वर्णिले आहे. पंधराव्या शतकापासून थेट एकोणिसाव्या शतकापर्यंत हे वैचित्र्यपूर्ण प्रतीक रसिकांना प्रिय ठरले.

लघुचित्रात नारीकुंजराचे चित्रण अनेकदा केलेले आहे. महाराष्ट्रातील भित्तीचित्राचा अभ्यास करताना लेखिकेला फक्त एकाच ठिकाणी नारीकुंजराचे चित्रण पाहावयास सापडले. ते म्हणजे वर उल्लेखिलेले चांदवडच्या रंगमहालाचे. चांदवड हे ठिकाण मल्हारराव होळकरांनी वसविले व त्यांनीच हा वाडा बांधला. 'रंगमहाल' हे त्याचे प्रचलित नामाभिधान या वाड्यातील मनोहर रंगकामामुळे सार्थ वाटते. या पाचमजली वाड्याच्या दुसऱ्या मजल्यावरील दिवाणखान्याच्या भिंतीवर व आजूबाजूच्या दोन छोट्या खोल्यांच्या भिंतींवर जुने रंगकाम शाबूत आहे. ही सर्वच चित्रे मातीच्या गिलाव्यावर पाण्याच्या रंगाने चित्रित केलेली आहेत. येथील रंगकामाला हवामानाच्या बदलाचा व उपद्रवी दर्शकांचा बराच उपसर्ग पोचलेला आहे. त्यामुळे येथील रंगकाम चांगल्या स्थितीत राहू शकले नाही. सुदैवाने नारीकुंजराचे चित्र या रंगशाळेतील सर्वात सुरक्षित राहिलेले असे दर्जेदार चित्र आहे. दरबार-हॉलच्या पश्चिमी भिंतीवर जवळजवळ १।। फूट उंचीच्या एका मेहरापदार देवळीत हे चित्र आहे.

चित्रात मिरवणुकीचे दृश्य रेखलेले आहे. वसंत ऋतूचे आगमन होताच सृष्टीत चोहोकडे उल्हासाचे वातावरण निर्माण झालेले आहे. गोकुळातील गोपकन्या पण वसंतोत्सव साजरा करीत आहेत. या प्रसंगी नाना प्रकारच्या मनोविनोदात त्या रंगून गेलेल्या आहेत. या उत्सवाचाच एक भाग म्हणून साक्षात रतिमदनाचे रूप असलेल्या राधा-कृष्णाची मिरवणूक काढण्याचे गोपींनी ठरविले. गायनवादनात-रत गोपींनी गीताच्या स्वरावर व वाद्याच्या तालावर नर्तन करीत करीत हत्तीच्या शरीरातील निरनिराळ्या अवयवाच्या जागी स्वतःला संयोजित करून हत्तीची आकृती तयार केली. या नारीकुंजरावर राधा-कृष्णाची जोडी आरूढ झाली. या शोभायात्रेत झांज, पताका, धनुष्य आदि घेतलेल्या इतर गोपकन्या पण अष्टगोपीपासून बनविलेल्या गजाच्या मागेपुढे चाललेल्या आहेत. निळ्या वर्णाचा कृष्ण हत्तीवर राधेसह बसलेला आहे. त्याच्या एका हातात अंकुश आहे. कृष्णाने पितांबर नेसला

असून त्याने मुकूट धारण केलेला आहे. राधेचे लुगडे लाल रंगाचे असून तिच्या नाकात नथ व शरीरावर अनेक अलंकार आहेत.

चित्रात दूर क्षितीजरेषेवर झाडांच्या ओळी आहेत व आकाशात मेघमाला. चित्राच्या पृष्ठभूमीत (Foreground) यमुना नदीचा किनारा आहे. या सरितेत प्रफुल्ल कमळ, सळसळ करीत असलेले मासे आदी सर्व चित्रित केलेले आहे.

त्यातील आकृतींची वेशभूषा मराठी पद्धतीची आहे. चित्रातील पुरुषाकृतीच्या डोक्यावरची पेशवाई पगडी लक्ष वेधून घेते. हत्तीच्या आकृतीत बसविलेल्या स्त्री आकृती मात्र गोल साडी नेसलेल्या आहेत. या पद्धतीने नेसलेल्या साडीची योजना स्पष्टतः हत्तीच्या आकृतीत सोईची दिसावी म्हणून आलेली आहे. मिरवणुकीतील इतर स्त्रिया नऊवारी साडीत दिसत आहेत.

स्त्रियांनी खूप अलंकार धारण केलेले असून त्यांच्या रंगीबेरंगी वस्त्रप्रावरणांमुळे चित्रात रंगाची भरपूर उधळण झालेली आहे. चित्रातील अलंकारिक तत्त्व प्रामुख्याने नजरेत भरते.

मुगलशैलीच्या उत्तरार्धात व या उत्तरार्धात मुगलशैलीपासून प्रभावित इतर प्रान्तीय शैलीतील चित्रकामात पार्श्वभूमीसाठी जो विशिष्ट फिका हिरवा रंग लोकप्रिय झाला होता तो रंग या नारीकुंजराच्या चित्राच्या पार्श्वभूमीत आहे. या आल्हाददायक फिक्या हिरव्या रंगाच्या पार्श्वभूमीवर उष्णरंगाची वस्त्रे धारण केलेल्या आकृतींमुळे चित्र मोठे उठावदार व नयनरम्य झाले आहे.

रंग जरी सपाट भरले असले तरी हिरव्या रंगाच्या भूमीवर तसेच आकृतींवर थोडी छाया (Shade) वापरून आवश्यक ठिकाणी गोलाई दिलेली आहे. आकाशातील ढगांचे चित्रण बोजड असून चित्रातील नाजूक कलाकुसरीला अजिबात शोभत नाही. चित्रित आकृती ठसठशीत असून देखण्या आहेत.

चित्रातील प्रस्तुतीकरणात गतिमान रेषेचे वैशिष्ट्य नजरेत भरते. बाह्यरेषा काळ्या रंगाने रंगविलेल्या आहेत. आकृतींच्या शरीराच्या बाह्यरेषा काळ्या असल्या तरी शरीराच्याच रंगाचीच थोडी गहरी छाया (Shade) घेऊन Shading केल्यामुळे काळ्या रंगाच्या बाह्यरेषेचा करकरीतपणा कमी झालेला आहे. आकृती रेखाटताना कलावंतांनी आकृतीच्या प्रमाणबद्धतेला विशेष महत्त्व न देता त्या वेगवान दिसतील यावर भर दिलेला दिसून येतो. परिणामस्वरूप रेखा लयपूर्ण व धावत्या आहेत. गतिमान रेखाच्या द्वारे मिरवणुकीचा उल्हास चांगल्या प्रकारे अभिव्यक्त झालेला आहे.

हे चित्र आपल्या वैशिष्ट्यपूर्ण विषयामुळे तर उल्लेखनीय आहेच. पण मराठ्यांच्या आश्रयाने निर्माण झालेल्या काही चांगल्या कलाकृतीतही या चित्राचा अवश्य समावेश करता येईल.

♠ ♠ ♠

' योग ' मार्गासंबंधी सहा चित्रे

उषा रानडे

मराठेकालीन चित्रांचा अभ्यास करण्यासाठी ठिकठिकाणी जाऊन चित्रे गोळा करीत असताना अनेक प्रकारची चित्रे हाती आली. त्यात देवताचित्रे, भागवतातील चित्रे आणि व्यक्तिचित्रे हातात आली. तशीच काही रागमालेची चित्रे पण हातात आली. त्याचप्रमाणे बाह्यतः रागमालेच्या स्वरूपाशी मिळतीजुळती पण विषयाच्या दृष्टीने फार वेगळी अशी ६ चित्रे मिळाली. ही चित्रे योगमार्गाशी संबंधित अशा ग्रंथातील असावीत. पण त्याचा काही भाग हा दुसरीकडे गेला असावा. कारण त्यावर तसे आकडे आहेत. म्हणूनच त्याच्यावरील लेखाचा अर्थ लागत नसावा. या चित्रात सर्वच काही अभिनव आहे. (आकृती ५ व ६).

या चित्राची चर्चा दोन भागात करता येईल. (१) चित्राचे वैशिष्टय, (२) त्यावरील लेख.

ही चित्रे ३० × १८ सें. मी. आकाराची आहेत. चित्रातील वर्तुळात काही पूर्णाकृती रंगविल्या आहेत. त्याला नावे आहेत, विशिष्ट रंग आहेत. ती एका विशिष्ट पद्धतीची, पद्मासन घातलेली स्त्री-पुरुषांची चित्रे आहेत. चित्रात जेथे स्त्रिया आहेत, तेथे त्या पाचच आहेत व पुरुष आठच आहेत. चित्राच्या पृष्ठभूमीवर समुद्र असून त्यावर वर्तुळात रागपुरुष व रागस्त्रिया रंगविल्या आहेत.

त्यातील मजकुरावरून ही तीन रागांची चित्रे आहेत असे दिसते, नील, हंस व ॐकार. संगीतातील उपलब्ध व सध्या प्रचलित असणाऱ्या रागात या नावाचे राग नाहीत. हंसध्वनी इ० रागात असे शब्द येत असले तरी चित्रातील विषय व शब्दांचे अर्थ हे संगीताशी जमत नाहीत.

' रागमाले 'ची माहिती देणारे ग्रंथ हे राग कुटुंबाची कल्पना देतात. त्यात एक मुख्य राग, त्याच्या पाच रागिण्या व आठ पुत्र अशी योजना असते. हीच कल्पना घेऊन येथे रागाचे रूपक केले असावे. पण यातील विषय संगीतापेक्षा योगमार्गाशी संबंधित असावा. क्रमाने एका एका रागाचे स्वरूप पाहाता हीच गोष्ट स्पष्ट होते.

नीलराग (व्याख्या) :—

श्रीगणेशाय नमः । अथ नीलरागस्वरूपवर्णनम् ।

पूर्णब्रह्म चराचरं निगदितं नित्याहितं निष्कलं ।। केचिन्निरालंबनं ।। केचिध्वंसपदं निरंजनपदं शून्यंपदं केपि च ।। नीलं निर्मलशंभु शुद्धबुद्धमुक्त. . . . ध्यानमनन्तं प्रभुः ।। केचिब्रह्मपदां वदन्ति विबुधा

नीलरागात पूर्णब्रह्माचे वर्णन आहे. यातील प्रत्येक पदाचा अर्थ लागतोच असे नाही. काही पदे त्रुटित आहेत. पुढच्या काही लेखात ऱ्हस्व -दीर्घ इत्यादीतही चुका आहेत. परंतु साधारण अर्थ असा की, हे ब्रह्म निष्कल (अखंड) आहे, निर्मल आहे. काही विद्वान याला ब्रह्मपद म्हणतात. काही स्वयंभू (निरालम्बनम्) म्हणतात. काही हंसपद तर काही निरंजनपद म्हणतात, तर कोणी शून्यपद म्हणतात. हे नील स्वरूप कल्याणकारक, (शंभू) ज्ञानपूर्ण, शुद्ध, अनंत असे आहे.

असा हा नीलराग या मालेतील पहिला राग आहे. पहिल्या गोलात मुख्य रागाचे चित्र असून त्याच्या खाली पाच रागिण्यांची चित्रे आहेत. मुख्य रागाची आकृती हिरव्या रंगाची आहे. वर्तुळाच्या आतील रंग निळा आहे. त्याच्या शेजारी चौकटीत लिहिलेल्या श्लोकावरून एक गोष्ट स्पष्ट होते आहे की हा राग हटयोगाशी संबंधित आहे. उन्मनी अवस्था हे त्याचे ध्येय आहे.

श्लोकाचा अर्थ : हटयोगाच्या शेतात परमात्म तत्त्वाचे बीज पेरले आणि औदासिन्याचे पाणी घातले की उन्मनी अवस्थेची कल्पलता सहजी पालवेल.

त्याच्याखाली नीलरागवधूंची चित्रे आहेत. या दोन चित्रामधील लेखात त्या वधूंच्या स्वरूपाची माहिती आहे. वर्णन करताना प्रथम आकृतीचे व नंतर गोलांचे रंग दिले आहेत.

नीलरागवधूस्वरूपवर्णनम् :

रक्तं पीतं शुकतनुनिभं पाटलं काम्यवर्णं । एतत् तत्त्वं परमसदृशं कारणं शक्तिरूपं । क्षेत्रं श्वेतं शोणं पिंगं हरीतं गौरवर्णं सकलबहुवलयोति योगनिर्वाणनूनं ।। १ ।।

लाल, पिवळा, पोपटासारखा हिरवा, लाल-तांबडा (काम्यवर्ण) असे तत्त्वांचे रंग दिले आहेत. आकृतींना तत्त्व म्हटले आहे. गोलांना 'क्षेत्र', 'मंडल' असे नाव दिले आहे. नंतर त्यांचे रंग सांगितले आहेत. हे परमतत्त्व आहे.

वधूंची नावे : निर्मलि, धुनधुनी, हिमकी, थुनथुनी, नीलांतरी. यानंतरच्या चित्रात नीलरागाच्या अष्टपुत्रांची वर्णने आहेत.

नीलपुत्र व्याख्या :

आद्यं रक्तं पीतं गौरं हरीतं पीतं नीलं काम्य श्वेतांतरं च ।
कृष्णं गौरं पीतं पिंगं हरीतं ईर्ष्यात्पिग गौरश्वेतं तथैव ।
एतद्रूपांगुष्ट सकलजगतितं योगिनां योगगम्यः ।
भ्रूयुग्मं मध्यदेशं परपुरपदं व्याप्तवंतं समंतम् ।। ८ ।। इति नीलरागस्य अष्टपुत्रस्वरूपम् ।

येथेही लाल पिवळा असे मंडलाचे व नंतर आकृतीचे रंग दिले आहेत. हे तत्त्व 'अंगुष्टमात्ररूप' आहे. सर्व जगाच्या पलीकडील आहे. योगी योगमार्गाने

ते जाणतो. हे तत्त्व दोन भुवयांच्या मध्ये असून परम अवस्थेला पोहोचलेले आहे. सर्वव्यापी आहे. नीलपुत्रांची नावे : परिमाण, इंद्रिय, धुर्मर, मर्दल, निर्वाण, इंद्रधवल, यौवत, वोलन.

या दोन्ही चित्रात हटयोगाने कुंडलिनी जागृत करताना ज्या क्रमाने मनुष्य उन्मनी अवस्थेप्रत जातो त्या प्रवासाचे वर्णन आहे. यातील नील शब्द परमतत्त्वाला उद्देशून वापरला आहे. चित्रात आपण पाहिलेच आहे की, याला वेगवेगळी नावे आहेत. त्याचे अंगुष्टमात्ररूप दोन भुवयात आहे. दोन भुवयांमध्ये षट्चक्रापैकी आज्ञाचक्राचे स्थान आहे. तेथे प्राणवायू गेल्यावर मनुष्य उन्मनी अवस्थेप्रत जातो. यातील वधूंच्या व पुत्रांच्या सगळया नावांचे अर्थ लावता येत नाहीत. पण थुनथुनी, धुनधुनी या नावासंबंधी इतकेच म्हणता येईल की, ‘अनाहत’ नावाच्या चवथ्या चक्रापासून अनाहत नाद ऐकू येतात, शरीर थरथरते. (त्यातील काही नादांना किणकिणी, चिणचिणी अशा संज्ञा आहेत.) त्या अवस्थांवर रागिणीची कल्पना केली असावी. एरवी त्याची सहज अशी उपपत्ती लावता येत नाही.

या आकृतींना बीज, परमतत्त्व म्हटले असून गोलांना मंडल, क्षेत्र अशा संज्ञा वापरल्या आहेत हे वर सांगितलेच आहे. उन्मनी अवस्थेत नीलबिंदूच्या रूपात आत्मतत्त्व दिसते असे उल्लेख संतवाङमयातही आहेत. तुकारामांनी एका अभंगात मसुराएवढे निळे बिंदुले दिसले व त्यात विठ्ठलरखुमाईचे दर्शन झाले असे म्हटले आहे.

‘हंस’ हा या मालेतील दुसरा राग. त्याचे स्वरूप सांगताना प्रथम गणपती सरस्वतीला वंदन केले आहे.

अथ द्वितीयराग हंसरूपवर्णनम् । हंसो गणेशो विधिरेव हंसो हंसो हरीश्च स्वयंभु हंसः । हंसो ही जीवो गुरुरेव हंस हंसोहि चात्मा परमात्महंसः । इति हंसस्वरूप-वर्णनम् ।। २ ।।

इथे हंस याचा अर्थ जीव किंवा प्राण असा घ्यावा लागेल. अर्थ : हंस हा गणेश. हंस हा ब्रह्मा. हंस हा विष्णू आणि हंस हा शंकर. हंस हा जीव, गुरू म्हणजेच हंस. हंस हा आत्मा व परमात्माही हंसच.

अजपा जपाचा मार्ग यात दिला असावा. अजपा म्हणजे काय ? ‘हंकारेण बहिर्याति सकारेण विशेत् पुनः । षट्शतानि दिवा रात्रौ सहस्त्राणेक विंशतिः अजपानाम गायत्री जीवो जपति सर्वदा’ (घेरंडसंहिता).

श्वास बाहेर टाकताना हकार व आत घेताना सकाराचा उच्चार होतो. त्या दोन वर्णांना जोडणारा ॐकार. म्हणजेच हंस अर्थात प्राण. हा प्राणायाम आपण न मोजता अगणित वेळा करतो. तो अजपाजप. याचा प्रवास शरीरातील कुंडलिनीच्या मूलाधार, स्वाधिष्ठान, मणिपूर, अनाहत, विशुद्ध, आज्ञा व सहस्त्रार या चक्रातून होतो. पैकी मूलाधार चक्राची देवता गणेश, स्वाधिष्ठानाची ब्रह्मा, मणिपुराची

विष्णू, अनाहताची शिव, विशुद्धाची जीवात्मा, आज्ञाचक्राची परमात्मा. तेव्हा प्राण त्या त्या चक्रापर्यंत पोहोचला की, त्या त्या देवतेशी एकरूप होतो. यात एकच गोष्ट म्हणजे विशुद्ध चक्राची देवता जीवात्मा आहे. व नंतर गुरुरेव हंस असे म्हटले आहे. पण 'गुरू' पदाचा या क्रमात कोणत्याही चक्राशी प्रत्यक्ष संबंध नाही. कदाचित गुरुकृपेशिवाय कुंडलिनी जागृत होत नाही. म्हणून गुरूचा उल्लेख असावा. किंवा षट्चक्राऐवजी काहीजण नऊ चक्रांचा उल्लेख करतात. त्यांपैकी 'ललना' हे चक्र विशुद्धचक्रानंतर येते. त्याचा गुरुशी संबंध असावा पण आता तरी या विधानाला सबळ पुरावा देता येत नाही.

यानंतर मुख्य हंस राग व ५ वधू यांच्या रंगाचे वर्णन आहे. मुख्य हंस रागाच्या तत्त्वाचा म्हणजे आकृतीचा रंग 'पांढरा' आहे. पण क्षेत्राचा रंग निळा आहे. (नीलरागाप्रमाणे) पुढे दिलेल्या व्याख्येनुसार :

हंसरागवधूस्वरूपवर्णनम् ।
ईषत्पीतं कृष्णपीतं हरीतं शोणाभासं मंडलं शक्तिक्षेत्रं ।

तत्त्वं पीतं पिंगं हरीतं रक्तं सुकृष्णवर्णं परमसकलविमलनिधीः भाग्यवंतः स संतः ।

किंचित् पिवळा, काळसर पिवळा, हिरवा, लाल असे मंडलाचे रंग असून ती शक्तिक्षेत्रे आहेत. तत्त्वांचे रंग पिवळा, पिंगट, हिरवा, लाल व काळा असे आहेत. ज्याला या सर्वांगीण पवित्र मलरहित तत्त्वाची प्राप्ती झाली आहे तो भाग्यवान् समजावा.

वधू – सावेरी, दरपति, सारणि, खंजारि, दुर्नशांति, या नावाचेही अर्थ लागत नाहीत. पण खंजारी किंवा खंचारी यावरून कदाचित पंचमहाभूतांचा संबंध असावा का काय असे वाटते.

यानंतर हंसरागपुत्रस्वरूपवर्णनम् ।

पीतं रक्तं श्वेतपीतं हरितं ईष्यत्पिंगं कुमुदवर्णं सुकामं । मध्ये रक्तं हरीतं वर्णं च पिंग बीजं कृष्णं श्वेतपीतं च काम्यां । इषत् पीतं परमनीजगं ध्यानमानेन पूर्वं ॥

येथेही पिवळा, लाल, पांढरा, पिवळा, हिरवा, किंचित् पिंगट इत्यादी क्षेत्राचे व किंचित् लाल, हिरवा, पिंगट, काळा, पांढरा, पिवळा इत्यादी बीजांचे रंग (तत्त्वांचे रंग) दिले आहेत. परमपदाला पोहोचलेले हे तत्त्व ध्यानाने जाणता येते.

पुत्रांची नावे : अनिस्कल, हंप्रमाण, हठीलस, हंसोमत, हंधुमत, हंसिरहट, हंहोहण, हंहाहस.

या नावाचेही अर्थ लागत नाहीत. यानंतरचा तिसरा राग ॐकार.

व्याख्या : ॐकार निर्गुणात्मा त्रिवर्णकं । बीजं च त्रिविधं प्रोक्तं मंडलं क्षेत्रमेवच नानावर्णप्रकासेन सृष्टिरुत्पद्यते मया ॥ ॐकार त्रिगुणात्मकं पीतं प्रभामंडलं

ज्ञानं ज्ञेयप्रवीणतं परकलाकालेन संगयिते। तत्त्वं तादृश जादृशी च गतयः संकुडचते केनचेत् प्राप्तोसौ निजकर्मणेन सकलं प्राप्तो महासूरिभिः।

ॐकार निर्गुण आहे. यात अ, उ, म हे तीन वर्ण आहेत. याचे बीज तीन प्रकाराने सांगितले आहे. मनोबीज, प्राणबीज व अहंबीज. हे बीज, क्षेत्र म्हणजे शरीर हेच जणू मंडल. त्यात टाकले आहे. नानावर्णाच्या प्रकाशाने मी सृष्टी उत्पन्न केली, असे ॐकार म्हणतो. याचा अर्थ पाहू. षट्चक्रातील प्रत्येक चक्राला एक एक रंग आहे. त्यापैकी शेवटच्या सहस्रार चक्राला 'नानावर्ण' दिलेला आहे. नानावर्णाच्या प्रकाशाने मी सृष्टी उत्पन्न केली म्हणजे सहस्रार चक्रातून उत्पन्न केली असा अर्थ असावा. कारण मनुष्याचा प्राण डोक्याकडून शरीरात शिरतो व कुंडलिनीचा प्रवास उलट दिशेने म्हणजे चक्रछेदनाचा आहे. ॐकार हा सत्त्व, रजस्, तमस या गुणांनी युक्त आहे. त्याचे मंडल किंवा तेजोवलय पिवळे आहे. व्याख्येत 'परकला कालेन संगीयते' म्हटले आहे. 'परकला' हे ॐकार गणनेचे कालाचे एक प्रमाण आहे असे म्हणतात. पण या विषयी माहिती व सबळ पुरावा मिळाला नाही. जशी गती असेल तसे हे तत्त्व दिसते. प्राणाची गती कधी एका चक्रावर १२ अंगुळे, कधी दुसऱ्या चक्रावर ८ अंगुळे अशी असते. त्या गतीनुसार त्या त्या चक्राचा रंग तत्त्वाला येतो. उदा० तत्त्व ठराविक अंगुळाने मणिपुरावर असेल तर लाल रंगाचे दिसते. स्वाधिष्ठानावर असेल तर पिवळे दिसते. 'संकुडचते' या रूपाऐवजी, 'संकुच्यते' किंवा 'सङ्कुटचते' असे रूप असावे. त्याचा अर्थ 'संकोच करणे' असा होतो. प्राण विशुद्ध तत्त्वापर्यंत आला की, जालंधर बंधाने पूर्व मार्ग बंद होतो, व हटयोग्याचा प्राण पश्चिम मार्गाने वर जातो. जालंधर बंधाने हट-योग्याच्या शरीरातील कान इ० द्वारे बंद होतात. त्या मार्गाचा संकोच होतो. आपापल्या कर्मानुरूप हे तत्त्व प्राप्त होते. विद्वानांनी अशीच याची प्राप्ती करून घेतली आहे.

ॐकार वधू : पीतख्यानं पीतवर्णं सुपिङ्गं हरिताभासं काम्यवर्णं वधू च। मध्यं वर्णं तत्त्व साक्षात्त्रिमूर्ति भावोभूतं वर्तमानं फलज्ञः॥

पिवळा, हिरवा, लाल असे मंडलाचे वर्ण दिलेले आहेत. मधली आकृती तत्त्वाची आहे. ह्या तत्त्वाला 'त्रिमूर्ति' म्हटले आहे. कारण ॐकाराची अ, उ, म ह्या तीन वर्णांची तीन चक्रे व त्यांच्या ब्रह्मा, विष्णू, महेश या देवता म्हणून ॐकार हा त्रिमूर्ती आहे. भूत, भविष्य व वर्तमान यांचे फळ जाणणारा आहे.

ॐकार वधू : ॐ जलपाती, ॐथिरिथिरा, ॐरूपिणी, ॐपतंग, ॐअर्कपति.

ह्या नावांचेही अर्थ कळत नाहीत. या रागिण्यांचे पोषाख म्हणजे अधरीय उत्तरीय असे सारखे आहेत. ॐकार धवल वर्णाचा असल्याने आकृतींचे चेहरे पांढरे आहेत. यानंतर ॐकार पुत्रांची वर्णने येतात.

ॐकार पुत्र : पिंगंवर्ण पीतपिंगं सुपीतं स्वेताभासं सोणपीतं च रक्तं मध्ये भावं ध्यानबोधं विधाय पारावारं केनकेनापि बुद्धं ।

येथेही प्रथम क्षेत्राची व नंतर तत्त्वाची रंगयोजना दिली आहे. हे 'तत्त्व' ध्यानाने जाणता येते. ते सर्वांपलीकडील आहे. ॐकार पुत्रांची नावे चित्त, चैतन, मन, धातू, बिंदु, ज्वाला, ज्योति, आप अशी आहेत.

एकंदर तीनही रागातील चित्रांचे स्वरूप पाहाता कुंडलिनी जागृत होताना प्राणवायू वर चक्रातून वर जातो त्या प्रवासाचे हे वर्णन आहे. असे दिसते वर्तुळांना या चक्राची कल्पना देऊन चक्रांचे लाल, निळा, पिवळा असे जे रंग आहेत त्यांचाच वापर या वर्तुळात केला आहे. फक्त क्रम परिस्थितीनुरूप बदलला आहे. धवल तत्त्वासाठी पांढरा रंग वापरला आहे. स्त्री-पुरुषांची बसण्याची पद्धत, अक्षमाला, पेहराव, जटा या गोष्टी योगमार्गाच्या अभ्यासकाला साजेशाच आहेत. प्रत्येक आकृतीच्या शेजारी पान, फूल आहे. त्याला काही विशिष्ट अर्थ असावा. परंतु आज तो सांगता येत नाही. ही चक्रे म्हणजे षट्कमळे अशी वर्णने आहेत. पण 'कमल' अशा अर्थाचा शब्द या रागात कोठेही आला नाही. पृष्ठभूमी पाण्याची असून पाण्याला ठराविक निळा, काळा रंग वापरला आहे. त्यावरील लाटा पांढऱ्या रेघांनी सुचवल्या आहेत. पाच वधूंच्या नावामागे पाच ज्ञानेंद्रिये, कर्मेंद्रिये किंवा पंचमहाभूते अशी कल्पना असेल. तसेच अनाहत नादातील सूक्ष्म भेदावरूनही ही नावे आली असण्याची शक्यता आहे.

काही ग्रंथांतून 'हं' व 'सं' म्हणजे पुरुष व प्रकृती यांचे अद्वैत असे वर्णन आहे. म्हणून मुख्य रागाची पुरुषाकृती व शक्तितत्त्वासाठी स्त्रीची आकृती काढली असावी.

रागाचे रूपक केलेल्या या चित्रांच्या रेखाटनावरून ही असे वाटते की चित्रे दक्षिणी, विजापुरी कलाकारांनी काढलेली असावीत. उभट चेहरे, बारीक डोळे, रकेवसिळ इ० लक्षणे यात आढळतात. याला आणखी एक पुरावा म्हणजे प्रत्येक ठिकाणी रागचित्राची नावे संस्कृत नावाशेजारीच फारशी लिपीत दिलेली आहेत. या रागचित्रातील काही संस्कृत पदांचे अर्थ लागत नाहीत. म्हणून अनेक जाणकारांशी चर्चा करण्याचा प्रयत्न केला. पण यश आले नाही. कदाचित यात गूढार्थ असेल किंवा जाणून घेणारांची तेवढी पात्रता नसेल किंवा यातील चित्रे व लेख हे एखाद्या लुप्त पंथाशी संबंधित असतील. एकंदर मजकुरावरून ही चित्रे योगमार्गाच्या एखाद्या ग्रंथाशी संबंधित असावीत. यातील काही गूढार्थ समजून घेण्यासाठी जाणकारांचे मार्गदर्शन मिळावे हाच या लेखाचा मुख्य हेतू आहे.

बाजी पासलकर यांच्या घराण्याची माहिती

द. न. पासलकर

जन्मगाव मोसे बु. या गावाचा चव्हाठा वडमाळच्या दक्षिणेस व हटिनाथ गोसाव्याच्या मठाच्या पूर्वेस कुशीमध्ये वसला आहे. या गावाच्या दक्षिणेस मोशी नदी वाहते. ही नदी पानशेतजवळ संगम होऊन खडकवासला धरणातून पुण्याच्या मध्य-भागातून वाहते. या गावाला बाजी पासलकर यांच्या राहत्या वाड्याचा (गढी) चौथरा, आहे. त्याला चारही बाजूने तट व बुरुज होते. समोर देवडी व त्यालगत तुरुंगाची जागा, व पूर्वेस मोंगलाचा वाडा, दिवाण वाडा, सूड माळ, हाडकाचा दांड, उंटांची खळी, मोरांचे टाके ही ठिकाणे आहेत. बुरंभीच्या दांडाच्या पठारावर वऱ्हाडजाई या ठिकाणी वऱ्हाड गुप्त झाले अशा आख्यायिका आहेत. व त्या ठिकाणी खडकावर सुळे ही चिन्हे सध्या शेंदूर लावलेली आहेत. तसेच पश्चिमेला कमळणीचे तळे, हे जमीनदोस्त होऊन त्यांचा पाया फक्त उघड्या अवस्थेत आहे. वाड्याच्या दक्षिणेस श्रीभैरवनाथाचे मंदिर, श्रीगोकर्णेश्वर स्वयंभू लिंग, सतीचा पार, त्या ठिकाणी सतीची शिला, वीरगळ आहेत. हनुमान मंदिर, उत्तरेला कुवळजाई, कोठारजाई, गारजाई, पूर्वेला भैरी वरदानी, मळाचा भैरी, वेताळ, पद्मावती, तळजाई, काळकाई अशी अनेक देवस्थाने आहेत. हटिनाथ गोसाव्याचा मठ व त्यामध्ये जिवंत समाध्या आहेत तसेच चार वीर. परीट, भोई, कुंभार, पोळेकर (प्रधान) अशा गावाला चार वाड्या असून बारा बलुते, पांढरपेशा वस्ती आहे. या गावाला मौजे मोसे बु. असे म्हणतात. हे गाव १९७९ पूर्वी "वीर बाजी पासलकर" धरणात बुडणार आहे. बाजी पासलकरांच्या वाड्याचा हा चौथरा व त्यावरील त्यांचे स्मारक व शिलालेख जतन व्हावे. बाजी पासलकरांच्या राहत्या वाड्याची १९३२ सालात दगड व झाडे झुडुपे काढून सफाई करून तेथे १९५८ मध्ये त्यांचे पुतळारूपी स्मारक उभारले गेले.

जी मराठी घराणी दुर्गादेवीच्या दुष्काळानंतर महाराष्ट्रात येऊन वतनदार बनली, त्यांपैकी पासलकर घराणे एक होय. (पासलकर, हंडे, काकडे, आतकरी ही चार गोत्रे भाऊ आहेत.) त्यापैकी पासलकर हे मोसे खोऱ्यामध्ये ८४ गावांची वसाहत करून राहिले. त्यापैकी ११ गावे निवंगणे ऊर्फ जगताप व ११ गावे कडू ऊर्फ जाधव यांना देऊन बाकीची उरलेली पासलकर यांच्या अमलाखाली असत. ८४ गावांना ३॥ पाटील (१) कातवडीचे व सांगरूणचे मानकर, (२) केळतकर-दापसरे, (३) कुरवठीचा पटवे आणि ॥. साइव बु. चे हनमधर असे ३॥ पाटील या मोसे खोऱ्याला होते.

या घराण्याचा मूळ पुरुष रतनाम, त्याचा पुत्र जोगनाम, त्याचा राजनाम, या राजनामास प्रथम संतान नव्हते, पुढे हटीनाथ गोसावी यांची राजनामाने एकनिष्ठेने सेवा केल्यामुळे गोसाव्याकडून प्रसाद म्हणून दोन खारका मिळाल्या. या प्रसाद-गुणाने राजनाम यास दोन जुळे मुलगे झाले. एकाचे नाव वाघनाम व दुसऱ्याचे राघनाम. पैकी वाघनाम यास हटीनाथ गोसाव्याला वाहिले. दुसरा जो राघनाम त्याचा मुलगा गोरखोजी, त्याचा मुलगा येसाजी आणि याच येसाजीचा मुलगा तो प्रसिद्ध बाजी पासलकर. यशवंतराव हा पासलकर घराण्याचा किताब, तो त्यांना प्राप्त होता. बाजी पासलकरांना सहा भाऊ होते. (१) साबाजीराव, (२) बाजीराव (प्रसिद्ध बाजी, शिवाजीचे सवंगडी), (३) कृष्णाजी, बाजींच्या धाकटा (सवाई बाजी), (४) कान्होजीराव, (५) रामाजीराव, (६) जोगोजीराव व (७) दादाजीराव. या सहा भावांसह बाजी मोसे मुक्कामी व तव् मुक्कामी राहत असत. त्यांची आई लखुमाई व नोकरचाकर पदरी असलेले रजपूत सरदार अशी २००–३०० मंडळी बाजीच्या मोसे मुक्कामी वाड्यात नेहमी वावरत असत. वाडा पै-पाहुण्यांनी गजबजलेला असे. संसार सरदारी थाटाचा. बाजींना दोन बायका होत्या. एक भिमाई व दुसरी अंबाई. मुलगी सावित्री.

बाजीजवळ येल्या मांग, अनंत खुर्चूला व खंडचा महार ही मंडळी जिवाला जीव देणारी होती. शिवाय सावित्रीचा पुत्र बाजी जेधे होता. बाजीजवळ यशवंती घोडी, अजगर ढाल, फिरंगी तलवार ही तीन हत्यारे अप्रतिम होती. विजापूरकरांच्या दरबारात चंद्रराव मोरे यांनी विडा उचलला होता. मोसे खोऱ्याच्या बाजी पासल-करांची यशवंती घोडी मिळवून देतो. त्या वेळेला बाजी पासलकर कुरडुवर राहत होते. बाजींनी चंद्ररावाची डाळ शिजू दिली नाही. चंद्ररावाला बाजींच्या पराक्रमाची पूर्ण जाणीव होती. त्या वेळेला सोनू दळवी व इतर सरदार चंद्ररावांच्या मदतीला होते. त्या लढाईत येल्या मांगाने, अनंत खुर्चूल्याने व खंडचा महाराने शत्रूची दाणादाण केली. इ. स. १६४७ मध्ये हे घडले. इ. स. १६४८ मध्ये फत्तेखान शिवाजीवर चालून आला. त्या मोहीमेवर गेल्यानंतर बाजी सासवड येथे पडले. त्यांच्या वतनाचा व शिक्क्याचा अर्धवट राहिलेला निवाडा शके १५७२ म्हणजे इ. स. १६६१-६२ मध्ये कायमचा निकालात निघाला. पूर्ववादी साबाजी बिनबाजी कृष्णाजी यशवंतराव पासलकर व पश्चिमवादी धर्माजी बिन बाळाजी पासलकर होते. यांचा निवाडा खुद्द शिवाजी महाराजांनी केला. त्याचा सारांश 'साहेबी हाजीर, मजालसा गोत वेसवून निवाडा केला. तानाजी यशवंतराव यांचे घर वडील नांगर निशाण वगैरे मान साबाजीचा. धर्माजीचे घर धाकटे यास वरकडी बापभाऊ जैसे समजाविले आहे ती तैसी त्यांची समजावणीस वडीलपणाचे मान वगैरेस धर्माजीस संबंध नाही.'

बाजींचा तिसरा भाऊ कृष्णाजी ऊर्फ सवाई बाजीराव पासलकर. प्रतापगडच्या मोहिमेत चौकी सांभाळणारा कृष्णाजी हा बाजींचा धाकटा भाऊ होय. इ. स. १६५९

मध्ये पन्हाळयावर शिवाजी अडकले असताना सिद्दीच्या मदतीने काथा सावंताने व हपशेने शिवाजीच्या मुलुखावर हल्ला करून मुलूख घेण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी बाजीचा भाऊ कृष्णाजी हा लढला. त्यामध्ये काथा सावंत मारला गेला; व सवाई बाजी पडला असा उल्लेख आहे. बखरकारांनी ह्या बाजीच्या चेहऱ्याचे, रुबाबाचे रसभरीत वर्णन केले आहे. १६४८ मध्ये जो बाजी पासलकर पडला तो कृष्णाजीचा थोरला भाऊ होता. तोच शिवकालांतील उदयास आलेला प्रसिद्ध बाजी होय. या दोन बाजींपैकी बाजींचा धाकटा भाऊ छत्री निजामपुराजवळ राहात असून खिडीची नाकी सांभाळी. कोकणामध्ये पासलकरांची जी गावे होती त्यांचा खंड जुमला तो घेत असे. मुरुडजवळ समुद्रामध्ये जंजिरा किल्ला आहे त्या ठिकाणी तो काथा सावंताशी लढला. त्यावेळी त्याने काथा सावंताचा व हपशेचा पराभव केला व शिवाजीच्या मुलुखाचे रक्षण केले. पुणे जिल्हा व कुलाबा जिल्हा सह्याद्रीचे तिठ्यावर विश्रामगड ऊर्फ कुरडू किल्ला वसला आहे. त्या ठिकाणी इ. स. १६४७ मध्ये प्रसिद्ध बाजी पासलकरांचा पोवाडा यमाजी शाहीराने रचलेला आहे. यमाजी शाहीर हा बाजींचा आश्रित होता. शिवकालीन तीन पोवाडे आहेत. प्रतापगडचा वेढा, कोंडाणा, विश्रामगड ऊर्फ कुरडू किल्ला. हे तीन पोवाडे ऐतिहासिक मानले जातात. बाजी पासलकरांचे जावई कान्होजी जेधे हे कर्नाटकमध्ये शहाजीराजांच्या पदरी होते. सोनाजीने व भिवजीने कान्होजीस लहानपणी पाळण्यात मारण्याचा प्रयत्न केला. परंतु दाईने आपली मुलगी पाळण्यात ठेवली ती मारली गेली. व छोट्या कान्होजीला देवा महालाने (महालाचा आजा) मोसे खोऱ्यातच नेले. तो लहानाचा मोठा होऊन पुन्हा करीस आला. व शिक्क्यांचा कारभार पाहू लागला. यापूर्वी कान्होजीचे वडील असेच मारले गेले. कान्होजीची आई अनसावा, हिने पोटात कान्होजी तीन महिन्यांचा असताना आपल्या कारभारी मंडळींना पोटगी म्हणून सोन्याच्या कांबी कोयत्याने तोडून दिल्या. रोहिडेश्वराच्या किल्लेदारांनी अनसावास धीर दिला व तिची खणानारळाने ओटी भरून तिचे समाधान केले व म्हणाले, "ईश्वरीकृपेने तुला मुलगा होईल."

अवचित गड – रोहा व पुंडली नदीच्या पिंगळसर गावाच्या उत्तरेला वसलेला आहे. अवचितगड हा मोसे खोऱ्यामधल्या धडवलीच्या बाबुराव पासलकरांनी बांधला असावा. या किल्ल्यात जो शिलालेख आहे, त्यावर बापूजी पासलकर हवालदार असे लिहिले आहे. हा किल्ला कोकणामध्ये मुरुड जंजिरा मार्गावर आहे. इ. स. १६४५ मध्ये रायरेश्वरावर स्वराज्याच्या शपथा घेणाऱ्या शिवाजीच्या सहकाऱ्यापैकी बाजी पासलकर एक होत. त्यांच्या वास्तूच्या अवशेषांचे रक्षण होणे अगत्याचे आहे.

♠ ♠ ♠

युसूफ -- जुलैखा : एक सचित्र हस्तलिखित

म. श्री. माटे

चौदाव्या शतकापासून दक्षिणेवर राज्य करणाऱ्या बहमनी सुलतानांनी अनेक परकीय तज्ज्ञ, कलाकार यांची आयात केलेली होती. ही गोष्ट सर्वविश्रुत आहे. सैन्य आणि राज्यकारभार यांच्या जोडीला समाजजीवनाच्या इतर क्षेत्रातही आफ्रिकेतून आणि मुख्यत्त्वे इराणमधून सतत लोक येत गेले. बहमनींच्या राज्याचा नाश होऊन ज्या पाच सल्तनती उत्पन्न झाल्या त्यांच्या वेळेपर्यंत दक्षिणच्या संस्कृतीला स्वत:चे असे 'दख्खनी' नावाने संबोधता येण्यासारखे स्वरूप प्राप्त झाले होते. वास्तुशिल्प, चित्रकला, भाषा या सर्व बाबतीत 'दख्खन'चे स्वतंत्र स्थान निर्माण झाले होते. राज्यकर्त्या मुसलमानातच परदेशी आणि स्थानिक असे तट पडून त्याचा परिणाम बहमनी राज्याच्या नाशात झाला. इतके सगळे असूनही जवळ जवळ अठराव्या शतकाच्या शेवटापर्यंत इराणातून कलाकार व तज्ज्ञ आणविण्याची, त्यांना आश्रय देण्याची प्रथा बंद झालेली नव्हती. अहमदनगर, विजापूर आणि गोवळकोंडा ही दख्खनी चित्रकलेची मुख्य केंद्रे. त्यांतील गोवळकोंड्यानजीक – हैद्राबादेत –– सर्वथैव इराणी शैलीचे एक हस्तलिखित तयार झाले. प्रख्यात संशोधक पारसनीस यांच्या संग्रहाबरोबर ते डेक्कन कॉलेजच्या मराठा हिस्ट्री म्युझियमकडे आले. या विभागाचे प्रमुख माझे मित्र डॉ. गो. त्यं. कुलकर्णी यांनी ते मला दाखविले व त्याच्या अभ्यासातही मदत केली. याचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख येथे करावयास हवा.

या ठिकाणी पुस्तकाच्या मजकुरासंबंधी चर्चा कर्तव्य नाही, फक्त त्यातील चित्रांचा संदर्भ ध्यानात यावा एवढ्यापुरतीच त्याची माहिती द्यावयाची आहे. युसूफ आणि जुलैखा यांच्या कथेचा उगम फार प्राचीन काळी म्हणजे बायबलमध्ये सापडतो. या कथेचे सूत्र पकडून निरनिराळ्या कवींनी काव्ये रचलेली आहेत. या सर्वांत सुप्रसिद्ध इराणी कवी जामी याचे महाकाव्य अत्यंत लोकप्रिय आहे. याचा काळ इ. स. चे १५ वे शतक म्हणजे १४१४ ते १४९२ असा आहे. मुळामध्ये हे एक प्रीतिकाव्य असले तरी जामीने त्याला एक अध्यात्मिक आशय प्राप्त करून दिलेला असल्याने त्याचे महाकाव्य जास्त लोकप्रिय झाले असावे. त्याच्या या काव्याच्या हस्तलिखित प्रती इंग्लंड, अमेरिका, रशिया येथील संग्रहालयात उपलब्ध आहेत. त्यातील बहुतेक सचित्र आहेत. भारतातही काही प्रती उपलब्ध आहेत, त्यातल्या काही सचित्रही आहेत. बडोद्याच्या संग्रहात असे एक हस्तलिखित आहे. मात्र डेक्कन कॉलेजच्या संग्रहालयातील प्रस्तुत हस्तलिखित कलागुणांनी नि:संशयच सरस आहे.

जुलैखा ही कथानकाची नायिका. एक राजकन्या. तिने स्वप्नात एक अत्यंत रूपसुंदर तरुण पाहिला, एकदा नव्हे तर तिनदा. स्वप्नातच तिला असेही समजले की हा तरुण ईजिप्तचा वजीर आहे. तिच्या बापाने तिच्या मनाप्रमाणे तिचा विवाह ईजिप्तच्या वजिराशी ठरविला. विवाहाच्या आधी तिने वजिराला पाहिले तेव्हा स्वप्नातील तरुण तोच नव्हे हे तिला कळले. पण आता इलाज नव्हता, उशीर झाला होता. कालान्तराने गुलामांच्या बाजारातून जाताना जुलैखाला एक तरुण मनुष्य गुलाम म्हणून विक्रीला उभा केलेला दिसला. हाच तिच्या स्वप्नाचा नायक होता. तिने फार मोठी किंमत देऊन त्याला खरेदी केले. तिच्या पतीचीही या तरुणावर मर्जी बसली. व तो त्याच्यावर पुत्रवत् प्रेम करू लागला. इकडे जुलैखाने त्याला वश करून घेण्यासाठी हरप्रकारची खटपट केली, परंतु हा तरुण म्हणजे युसूफ आपल्या मालकाशी प्रतारणा करण्यास तयार होईना. वजीराला आपल्या पत्नीचे मन कळले, कालान्तराने तो मेला आणि जुलैखा देशोधडीला लागली. मात्र आपल्या स्वामिनिष्ठेमुळे व कर्तबगारीमुळे युसूफला ईजिप्तची वजिरी मिळाली. पुढे एकदा रस्त्याने जाताना, अंध झालेली जुलैखा रस्त्याच्या कडेला एका खोपटात हीनदीन होऊन बसलेली त्याला दिसली. तिची दया येऊन युसूफने परमेश्वराची करुणा भाकली. त्याच्या पुण्याईमुळे तिला परत तारुण्य प्राप्त झाले आणि त्यांचे मीलन झाले. मूळ कथानकाच्या जोडीला, युसूफच्या भावंडांनी त्याचा केलेला छळ, जुलैखाच्या वर्तनाची ईजिप्तच्या राजस्त्रियात होणारी चर्चा अशासारखे अनेक प्रसंग येतात. आपल्या हस्तलिखितात ह्या सगळ्या लहानमोठ्या प्रसंगांचे चित्रण आहे. एकूण सत्तेचाळीस चित्रे या पुस्तकात काढलेली आहेत. (आकृती ७).

हस्तलिखित इ. स. १७९२ मध्ये लिहून व चितारून पूर्ण झाले. त्याच्या मुखपृष्ठावर पुस्तकाच्या मालकाचे नाव आणि काळ दिला आहे. लेखनिकाचे किंवा चित्रकाराचे नाव मात्र दिलेले नाही. पानाचा आकार ६।। × ४।। इंच असा असून त्याच्या तीन बाजूला वेलपत्तीची किनार आहे. मधल्या भागात साधारणपणे ३।। × २।। इंच या आकाराची चित्रे आहेत. एक सोनेरी रंग सोडला तर बाकी सगळे रंग फिकट, काहीसे शांत म्हणता येतील असे आहेत. यात आकाशी, गुलाबी व पोपटी यांचा मुक्त हस्ते वापर आहे. क्वचित ठिकाणी गडद निळा किंवा जांभळा शेंदरी (व्हरमिलियन) हे रंग स्त्री-पुरुषांच्या पोषाखासाठी किंवा जमिनीवर पसरलेल्या गालीच्यासाठी वापरले आहेत. पण हे रंग थोड्याच भागांना दिलेले असल्याने सबंध रंगसंगतीचा होणारा परिणाम शांत राहतो. ही गोष्ट दख्खनी कलमाशी विसंगत आहे हे मुद्दाम सांगावयास हवे.

चित्रसंयोजनाच्या दृष्टीने या सत्तेचाळीस चित्रांचे तीन प्रमुख गट पडतात. चौथा संकीर्ण चित्रांचा, कोणतीच एक पद्धत न अनुसरणारा. पहिल्या गटामध्ये

घरासमोर किंवा तंबूसमोर काही माणसे बसलेली दिसतात. त्याच्या डाव्या किंवा उजव्या हाताला ही इमारत दिसते. ती बहुधा अर्धवट दिसते. तेथपासून दुसऱ्या कडेपर्यंत कठड्याचा आडवा पट्टा दिसतो. यात जुलैखा व समोर तिची दासी किंवा आया, युसूफ व वजीर अशी दोन, फार तर तीन माणसे एकमेकांकडे तोंड करून बसलेली दिसतात. दुसऱ्या गटात कमानीचा आकार बरोबर मध्यभागी रेखाटलेला असून त्याच्या दोन्ही अंगाला कठडे किंवा लहानमोठी फुलझाडे असतात. या कमानीच्या किंवा मेहरपीच्या समोर बसलेली किंवा निजलेली आकृती, दोन्ही बाजूला दासी किंवा नोकर दिसतात. मधोमध कथानायक दिसतो. जुलैखाच्या स्वप्नांचा प्रसंग या तऱ्हेने रंगविलेला आहे. घराच्या समोर किंवा अंतर्भागात, असणाऱ्या बगीच्यात घडलेले प्रसंग रंगविण्यासाठी पहिल्या प्रकारची योजना आहे. दुसऱ्या प्रकाराचा उपयोग घराच्या, प्रासादाच्या, प्रत्यक्ष आतील दालनात झालेल्या घटनांच्या चित्रिकरणासाठी केलेला आहे. आता सांगावयाचा तिसरा प्रकार, बाहेरच्या बाजूला घडलेल्या देखाव्यांसाठी, (out-door scenes) योजलेला आहे. एक मोठे टेकाड किंवा उंचवटा हा सगळ्यात ठळक भाग, त्याच्या पुढे आणि मागे मानवी आकृती, आणि झाडेझुडे रेखाटली आहेत. जुलैखाला लग्नासाठी घेऊन जाणाऱ्या वऱ्हाडाचे चित्र या प्रकारचे आहे. पुढे एक-दोन ठिकाणी व्यापाऱ्यांचा तांडा याच पद्धतीने दाखविलेला आहे.

संकीर्ण गटात जी चित्रे आहेत, त्यापैकी एकाचीच नोंद येथे घ्यावयाची आहे. युसूफला वश करून घेण्याचे सर्व प्रयत्न असफल झाल्यावर निर्वाणीचा उपाय म्हणून जुलैखाने एक सात चौकी वाडा बांधून त्याच्या सर्व भिंतीवर त्या दोघांच्या मीलनाची चित्रे रंगविली आहेत. या चित्रात खालच्या बाजूला, या मोहजालातून निसटू पाहणारा युसूफ, त्याला अडविणारी जुलैखा व कोपऱ्यात तिच्या रोजच्या पूजेतील देवमूर्ती दिसत आहे. येथेच एक गोष्ट सांगावयास पाहिजे. ही मीलन-- चित्रे अत्यंत निर्जीव यांत्रिक वाटतात. त्याच्या हालचाली मोठ्या कष्टाने होत आहेत असे वाटते. निदानपक्षी या प्रसंगाचे सजीव चित्रण करण्याचा कलाकाराला संकोच वाटत असावा एवढे तरी निश्चित. ही निर्जीव यांत्रिकता, हा संकोच भारतीय कला परंपरेत बसत नाहीत. स्त्री-पुरुष मीलनाची शिल्पे चित्रे भारतीय कलाकारांनी कित्येक शतके निर्मिली होती. त्यांचे वैशिष्ट्य कोणते असले तर त्यातील सजीवपणा, निःसंकोच तादात्म्य. प्रस्तुतचे चित्रीकरण या परंपरेत न बसणारे. देवमूर्ती चार हाताची, बैठी, कालानुरूप आहे. पण बाकी सर्वच गोष्टी भारतीय कलेशी न जुळणाऱ्या आहेत. निसर्गदृश्ये किंवा Landscapes मध्ये, मोठ्या उंचवट्याचा उपयोग इराणी चित्रात मोठ्या संख्येने आहे. अशा प्रकारची स्वतंत्र निसर्गदृश्येही इराणी कलाकारांनी रंगविली आहेत. दुसरी एक अशीच लकब आहे. एखादा मनुष्य डोंगराच्या गुहेत, विवरात आहे असे दाखवावयाचे असल्यास तो आडात पडला असावा असे दाखवितात. त्याच्या

कठड्यावरून माणसे डोकावून आतमध्ये किंवा खाली पाहतात. Horizontal Strain ऐवजी Vertical Space दाखवितात. युसूफच्या भावांनी त्याला गुहेत लोटले व काही फिरस्त्या व्यापाऱ्यांनी त्याला बाहेर काढले हा प्रसंग असाच रेखाटला आहे. पोषाख विशेषत: शिरस्त्राणे, तत्कालीन भारतात प्रचलित असणाऱ्या प्रकारची नसून इराणी परंपरेतील आहेत. याहीपेक्षा निर्णायक गोष्ट म्हणजे चेहरे. या काळातल्या भारतीय चित्रात चेहरे एकचष्म म्हणजे Profile मध्ये दाखवितात. समोरून दाखविलाच तर तो आपद्धर्म. येथे मात्र सर्वांचे चेहरे समोरून, किंचित तिरपे पाहिले असता दिसतील असे आहेत. त्यांचा आकार कपा सारखा, डोळे काहीसे बारीक, भुवया लहान व सरळ ,नाक फारसे धरधरीत नाही, जिवणी लहान असाच सर्व चेहऱ्यांचा घाट आहे. नाक, भुवई व डोळे यांतील अंतर आणि किंचित फुगीर गाल यांमुळे सर्व चेहरे काहीसे बालीश वाटतात. हा अजाणतेपणाचा, कोवळेपणाचा भाव सर्वच माणसांच्या तोंडावर आहे. मग ती स्त्री असो की पुरुष. या चेहऱ्यांचे इराणी चित्रांतील चेहऱ्यांशी विलक्षण साम्य आहे. भारतात सोळाव्या शतकात मुगलांच्या आश्रयाने उत्पन्न झालेल्या इराणी चित्रात या प्रकारचे चेहरे दिसतात. पण केवळ पन्नासच वर्षांत त्यांना स्वतंत्र, वैशिष्टचपूर्ण रूप येते. तसे येथे झालेले नाही. प्रस्तुत हस्तलिखितातील चित्रशैली निव्वळ इराणी आहे. दक्षिणेमध्ये इराणी कलाकार येत होते हे वर सांगितलेच आहे. वास्तुशिल्पामध्ये बिदरच्या महमूद गावानच्या मद्रेशाकडे, इराणी कामाचा नमुना म्हणून बोट दाखविता येते. तसे या हस्तलिखिताकडे चित्रकलेच्या बाबतीत दाखविता येईल. हे पुस्तक येथे आलेल्या कोणा इराणी चित्रकाराने रंगविले असावे. ते इराणी शैलीचे आहे आणि चित्रकाराला भारतीय परंपरांचा फारसा स्पर्श झालेला नव्हता एवढे नक्की सांगता येते. दख्खनच्या चित्रकलेच्या अभ्यासात हे पुस्तक महत्त्वाचे ठरेल इतके त्याचे स्थान असल्याने येथे थोड्या विस्ताराने चर्चा केली आहे.

अक्षधुर् व अक्षपालि यांचे संस्कृत साहित्यातील स्वरूप

हरि गोविंद रानडे

सध्या उपलब्ध असलेल्या संस्कृत कोशामधून अक्षधुर् व अक्षपालि या शब्दांचे स्वरूप व अर्थ या विषयी एक प्रकारची गोंधळाची परिस्थिती आहे. काही महत्त्वाच्या शब्दकोशांमधून अक्षधुर् या शब्दाला संपूर्णपणे वगळण्यातच आले असल्याचे आढळून येते. अशा कोशांमध्ये संस्कृत-जर्मन हा रोथ व ब्योह्ट्लिंक या गेल्या शतकातील कोशाचा व त्यापूर्वीच्या अमरादि संस्कृत कोशांचा उल्लेख करावा लागेल. ज्या कोशांमधून हा शब्द समाविष्ट करण्यात आला आहे, त्यामध्येही त्याच्या अर्थाविषयी मतभेद दिसून येतात. काही वैदिक विद्वानांनी या शब्दाचे भाषांतर मात्र वैदिक ग्रंथाच्या विशेषतः श्रौतसूत्रांच्या आपल्या भाषांतरामधून जरूर केले आहे. परंतु तिथेही अटकळींची बरीच गर्दी झाल्याचे दिसून येते. अशा परिस्थितीत या शब्दांचा सर्व उपलब्ध उल्लेखांच्या आधारे पुनर्विचार होणे आवश्यक असल्याने तसा प्रयत्न प्रस्तुत लेखात केलेला आहे.

श्रौतविषयक संदर्भ

संस्कृत साहित्यात अक्षधुर् हा शब्द विशेषकरून श्रौतग्रंथात आढळतो. अग्निष्टोम यज्ञामध्ये अक्षधुरोपाञ्जन नावाचा एक विधि असून त्यामध्ये सोमशकटाच्या अक्षधुर् या भागाचे अञ्जन म्हणजे एक प्रकारचे वंगण करण्याची प्रक्रिया आयोजित करण्यात येते. अग्नीषोमीय प्रणयनाचे दरम्यान यजमानपत्नी हे अक्षधुरोपाञ्जनाचे काम करते. अक्षधुर् या शब्दाचा दुसरा संदर्भही अग्निष्टोम यज्ञामधीलच आहे. पण त्या ठिकाणी वसतीवरी[1] ठेवण्यासाठी स्थलनिर्देश करण्याकडे त्याचा विनियोग करण्यात आला आहे. पहिल्या संदर्भात ज्याप्रमाणे अक्षधुर् या भागाचा प्रत्यक्ष क्रियेशी संबंध आहे तसा दुसऱ्या संदर्भात नसल्यामुळे अक्षधुर् विषयक स्पष्ट कल्पना येण्याच्या दृष्टीने पहिल्या संदर्भाचाच अधिक विचार करणे योग्य ठरेल.

अक्षधुरोपाञ्जनविषयक विचार हे साधारणपणे एकाच प्रकारच्या शब्दावलीने विविध श्रौतसूत्रांमधून दिलेले असल्याने फक्त एकाच श्रौतसूत्राचा मूळ उतारा संदर्भ म्हणून या ठिकाणी उद्धृत केला आहे. हिरण्यकेशी श्रौतसूत्रात खालील प्रकारचे वर्णन पाहण्यात येते. (आकृती ८).

देवश्रुताविति पदतृतीयस्य एकदेशेन पत्नी दक्षिणस्य हविर्धानस्य दक्षिणाम् अक्षधुरन् उपानक्ति । (पहा— आपस्तंब श्रौतसूत्र ११.६.५; भारद्वाजश्रौतसूत्र १२.६.२; वैखानस श्रौतसूत्र १४.५; बौधायनश्रौतसूत्र भाग १, पृष्ठ १८४,

ओळ १७, १.१८५.५ व २.१५५.१ पैकी प्रथम दोन बौधायन संदर्भात हा शब्द पुल्लिंगी असल्याचे दिसून येते; अग्निष्टोम पद्धती (कर्कानुसारी आध्वर्यवासह) वामनाचार्य, भगवतप्रसाद शर्मा द्वारा संपादित, वाराणसी, १९३४, अग्नीषोमीय प्रणयन प्रकरण; मानव श्रौतसूत्र २.२.२.१५) देवश्रुतौ इत्यादी मंत्र म्हटले जात असता यजमानपत्नी सोमक्रयणी गायीच्या तृतीय पदावर केल्या गेलेल्या आहुतीच्या एका भागाच्या साहाय्याने हवी: शकटाच्या दक्षिण किंवा उजव्या अक्षधुर् भागाचे अंजन म्हणजे वंगण करते असा या सूत्राचा सरळ अर्थ आहे.

'अक्षधुर्'ला देण्यात आलेले विविध अर्थ

आपस्तंबश्रौतसूत्रातील अक्षधुरोपाञ्जनाचे भाषांतर करीत असता कलान्द याने अक्षधुर् या शब्दाचा अर्थ Achsenloch म्हणजे हवि:शकटाच्या आसाच्या टोकाकडील खुंटी लावण्याचे छिद्र असा केला आहे. गेल्डरच्या मते मानवश्रौतसूत्रात त्याचा अर्थ linch pin किंवा आसाच्या दोन्ही भागास चाक जाऊ नये म्हणून लावलेली खुंटी असा आहे. कीथ् व मॅक्डोनल् यांनी अक्षधुर्चा विचार त्यांच्या 'वेदिक इंडेक्स' (१९१२, लंडन) या ग्रंथात 'धुर्' शब्दाचा ऊहापोह करीत असता प्रस्तुत केला आहे. त्यांच्याही मते अक्षधुर् म्हणजे खुंटी असाच अर्थ प्रतीत होतो. आणि या अर्थाशी रोथ् आणि ओल्डनबर्ग हे सहमत असल्याचेही कीथ्–मॅक्डोनल्नी स्पष्ट केले आहे. कलान्द व हेन्री या विद्वान वैदिक पंडितांनी या शब्दाचा अर्थ le bout de l'essieu[२] म्हणजे आसाचे शेवटचे टोक असा मानला आहे. आणि हाच अर्थ पुढे दांडेकर यांनी श्रौतकोशाच्या (वैदिक संशोधन मंडळ, पुणे) इंग्रजी भागात बौधायनश्रौतसूत्राच्या भाषांतरात स्वीकृत केला असल्याचे दिसून येते. भारद्वाजश्रौतसूत्राचे भाषांतरकार काशीकर यांनीही यालाच पुष्टी दिलेली आहे.

संस्कृत वृत्तिकारापैकी आपस्तंब श्रौतसूत्रावरील आपल्या टीकेत धूर्तस्वामींनी या शब्दाचा अर्थ अक्षशल्य असा केला असल्याचे भगवत्प्रसाद शर्मा यांनी स्वसंपादित अग्निष्टोम पद्धतीमध्ये नमूद केले आहे. अक्षशल्य म्हणजे वरील गेल्डर व कीथ आदींनी मान्य केलेली खुंटी असण्याचा संभव आहे. पण नेमके तसेच गृहीत धरता येईल असे मात्र नाही.

मल्लिनाथ यांनीही शिशुपालवधावरील[३] आपल्या टीकेत अक्षधुर्चा पर्यायवाची शब्द म्हणून अक्षाग्र म्हणजे आसाचे शेवटचे टोक असा दिला आहे. पण हाही अर्थ दिलेल्या संदर्भात तितकासा बरोबर नाही असे प्रस्तुत लेखकाचे मत आहे. याचा खुलासा खाली योग्य ठिकाणी करण्यात आला आहे.

सुचविलेला अर्थ

वरील संदर्भात अतिशय प्रकर्षाने जाणवणारी गोष्ट म्हणजे शतपथ ब्राह्मणातील एक महत्त्वाचा उल्लेख व अन्य अनेक श्रौतसूत्रावरील टीकाकारांची या विषयावरील

मते वर उल्लेखिलेल्या अर्थाला पोषक न ठरणारी अशी असून त्यांनी सुचविलेला अर्थ हा वरील अर्थापेक्षा सर्वथा भिन्न असल्याचे दिसून येते. या स्पष्टीकरणावरून अक्षधुर् हा आसाचा तो भाग आहे जो शकटाच्या चाकातील नाभिपृष्ठावर टेकलेला असतो व ज्याच्या भोवती चाक फिरण्याची क्रिया घडत असते. चाकाची नाभी व हा आसाचा भाग यांच्यामध्ये घर्षण झाल्यामुळे एक प्रकारची उष्णता निर्माण होते. शतपथ ब्राह्मणात (३.५.३.१६) या भागाला 'संताप' असे संबोधण्यात आले आहे. अक्षधुरोपाञ्जनाच्या संदर्भात या ग्रंथात आलेल्या "यत्पत्न्यक्षस्य संतापमुपानक्ति" याचे एग्लिग्ने केलेले इंग्रजी भाषांतर पाहिले असता ही गोष्ट लक्षात येऊ शकते. तो म्हणतो, "And in that the wife anoints the burning (part) of the axle." या वरून हा भाग म्हणजे आसाचे टोक किंवा तेथील छिद्र किंवा त्यातील खुंटी नव्हे हे सांगावयास नको.

शतपथावरील आपल्या भाष्यामध्ये सायणाचार्यांनी हा विषय अगदी स्पष्ट करून सांगितला आहे. हविर्धानस्य दक्षिणचक्ररेखायाम्। संतप्यते चक्रसंघर्षणेनेति संतापः चक्रवलसंस्पर्शप्रदेशः। अर्थात अक्षाचा संताप म्हणजे चक्रनाभी व असा यांच्या संपर्काचा आसाचा भाग होय. अग्निष्टोमपद्धतीच्या तळटीपेमध्ये भगवत्-प्रसाद शर्मा यांनी नेमका हाच अर्थ देण्याचा प्रयत्न केला आहे. "यस्मिन् प्रदेशे घृष्यमाणः संतप्यते चक्रस्य धुरिकायाः (? याश्च) संतापः।

हिरण्यकेशी श्रौतसूत्रावरील गोपीनाथ भट्ट यांच्या ज्योत्स्ना या व्याख्येत अक्षधुरोपाञ्जन या विधिविषयी विस्तृत माहिती देण्यात आली असून त्यावरूनही वरील शतपथाचा 'संताप' म्हणजेच अक्षधुर असल्याचे निर्विवाद सिद्ध होते. त्या व्याख्येतील वर्णन पुढे दिल्याप्रमाणे आहे :

एतादृश्यस्य हविर्धानस्य चक्रं निष्काश्य दक्षिणामक्षधुरं दक्षिणेन हस्तेन उप समीप उपविश्यानक्ति। अञ्जनानन्तरं तस्य तच्चक्रं योजयति। एवमुत्तरस्य हविर्धानस्य कृत्वा चक्रं योजयति। ....अक्षचक्रयोर्मध्यतनं तिर्यक्काष्ठं तस्मिन् यत्र चक्रं प्रोतं भवति स प्रदेशो अक्षधुरित्युच्यते।

अशा प्रकारच्या हविशकटाचे चाक बाहेर काढून घेऊन उजव्या बाजूच्या अक्षधुर् म्हणजे चक्रनाभि व आस यांचा संपर्क जेथे होते, त्या आसाच्या भागास (यजमान-पत्नी) उजव्या हाताने अंजन करते. अंजन झाल्यावर आसावर पुन्हा चाक जोडण्यात येते. हाच प्रकार डावीकडील चाक बाहेर काढून केला जातो. अक्ष म्हणजे दोन्ही चाकाच्या मधून जाणारे आडवे लाकूड व त्यावर ज्या ठिकाणी चाक ठेवलेले असते त्या भागास अक्षधुर् असे म्हणतात.

ही अक्षधुर् शब्दाची व्याख्या आपस्तंबश्रौतसूत्राचे व्याख्याकार रुद्रदत्ताने मान्य केले आहे. "यत्र चक्रं प्रोतं भवति स प्रदेशोऽक्षधुरा" असेच तोही म्हणतो.

कलान्द् व तेन्री यांनी रंगनाथ दीक्षितांच्या सोमपञ्चकामधील (Ms Burnell 100. India Office Library) शब्द आपल्याला अग्निष्टोमामध्ये उद्धृत केले आहेत. तेही अक्षधुर्चा हाच अर्थ अधिक बोलका करतात. " चक्रमपनीय चक्र-सुषिरसम्बन्धप्रदेशम् (उपानक्ति) ".

हे सर्व अक्षधुरचे स्पष्टीकरण पाहिल्यावर अक्षधूर्चे आसछिद्र, खुंटी व आसटोक हे अर्थ अर्थहीन भासू लागतात. मोनियट् विलियम्स् व आपटे यांनी दिलेला खुंटी-व्यतिरिक्त yoke attached to the fore-part of the pole of the car हा अर्थही विचित्र भासू लागतो.

मल्लिनाथाने अक्षधुर्चा अक्षाग्र म्हणजे आसटोक हा अर्थ शिशुपाल वधात घेतला आहे तो किंचित् दिशाभूल करणारा आहे असे म्हणावे लागेल. कारण १८.७ मध्ये प्राजितृ म्हणजे रथाचा चालक स्वत: घोड्यांना हाहाकार करून हाकलीत आहे. व त्याच्या या आवाजाला अक्षधुर्मधून येणाऱ्या आवाजाचे अनुमोदन मिळत आहे. असा श्लोकाचा एकंदर तात्पर्यार्थ आहे. अशा परिस्थितीत अक्षधुर् म्हणजे आसटोक मानण्यात ध्वनिनिर्मिती कशी होणार हा प्रश्न आहे. त्यामुळे अक्षधुर् म्हणजे चक्र-नाभीशी संबंधित आसाचा भाग हे स्पष्ट आहे. व हा भागच घर्षणामुळे आवाज निर्माण करू शकतो. व तोच या ठिकाणी अभीष्ट असावा असे वाटते.

अशा प्रकारे अक्षधुर् शब्दाचा अर्थ निश्चित केल्यावर आसावरच असलेल्या दुसऱ्या भागाचा म्हणजे अक्षपालि या शब्दाचा अर्थही निश्चित होऊ शकतो. अक्षपालि हा शब्द बौद्धायनश्रौतसूत्रात दर्शपूर्णमास इष्टीच्या संदर्भात दोनदा आलेला असून (कलान्द् सम्पादित आवृत्ती, भाग १, पृ. ७, ओळ ७ व भाग ३, पृ. १५, ओळ १०) इतरत्र हा शब्द आढळत नाही. या शब्दाचा अर्थ दांडेकर यांनी श्रौतकोश (वैदिक सं. मं., पुणे) इंग्रजी भाग १ मध्ये edge of the axle असा केलेला आहे. परंतु बहुधा अक्षपालि म्हणजे आसाच्या टोकाकडील खुंटी असा त्याचा अर्थ असण्याची दाट शक्यता आहे. कारण बौ. श्रौ. सूत्राच्या पहिल्या संदर्भात ' अक्षपालीं क्रमित्वा अभ्यारुह्य ' अशी शब्दरचना आहे. यावरून हविर्निर्वाणासाठी शकटावर चढणारा अध्वर्यु अक्षपालिला पार करून चाकाच्या आऱ्यावर पाय ठेवून शकटावर चढत असल्याचे स्पष्ट होते. कलान्द् व हेन्री यांनीही ' अक्षपालि 'चा अर्थ अक्षाग्रकील म्हणजे आसाच्या टोकावरील खुंटी असा मानला असल्याचे दिसून येते. आपल्या "अग्निष्टोमल ' मधील एका तळटीपेतही गोष्ट त्यांनी नमूद केली आहे. (foot-note 87.17 on page 87) ते म्हणतात, " L'aksagrakilah elant la clavette de l'essieu, les deux mots कर्णातर्द et अक्षपालि pouraint donc etre synonyones. अक्षाग्रकील अर्थात आसावरील खुंटी ही आसावरील (चाकाची) अवरोधक असल्यामुळे कर्णातर्द व अक्षपालि हे त्याचे पर्यायवाची शब्द होऊ शकतात. "

अक्षधुर्‌च्या व्युत्पत्तिसंबंधाने पहाता हा शब्द अक्ष व धुर् या दोन शब्दांच्या षष्ठी समासाने तयार झालेला आहे. पाणिनी सूत्र ५.३.७४ विषयक चर्चेत टीकाकारांनी अक्षस्य धूर् अशी समास विभागणी मान्य केली असून समासान्त अकार या समासास प्राप्त होऊ शकत नाही हे सूत्रार्थावरून स्पष्ट आहे. परंतु बौद्धायन-श्रौतसूत्राच्या अग्निष्टोमचंद्रिका या व्याख्येत 'यत्र चक्रं प्रोतं भवति सः प्रदेशः अक्षधुरः' असे म्हटले आहे. यावरून पाणिनिसूत्राचे उल्लंघन येथे झाले आहे असे म्हणावे लागते. वर पाहिल्याप्रमाणे आप-श्रौतसूत्राच्या टीकेत रुद्रदत्ताने याच संदर्भात 'अक्षधुरा' असा आकारान्त स्त्रीलिंगी प्रयोग केला आहे हेही पाहाण्यासारखे आहे.

धुर् शब्द हा 'धृ' धारण करणे या धातूपासून निर्माण झाला असावा असे म्हणता येईल. जो भाग बैलाच्या मानेवर ठेवला जातो व ज्याच्याशी घर्षणामुळे सन्ताप निर्माण होतो त्या भागास धुर् मानता येईल. युगधुर् शब्दामध्ये 'जू' म्हणून वापरलेल्या लाकडी दांड्याचे उजवी धुर् व डावी धुर् असे भाग करण्यात आल्याचे दिसून येते. शतपथब्राह्मणामध्ये "अग्निदग्धमिवैषां वहं भवति" बैलाची मान घर्षणनिर्मित अग्नीमुळे जळल्यासारखी होते (१.१.२.९) असे म्हटले आहे यावरून धुर्‌चा वरील अर्थ अधिक स्पष्ट होतो. धुर्‌चा मूळ अर्थ नंतर दोन बैलांच्या जागी एकच बैल गाडीच्या जूला जुंपण्यात आल्यामुळे म्हणा किंवा अर्थपरिवर्तनाच्या सिद्धान्तास (tranfer of meaning) अनुसरून अन्य कारणांमुळे संपूर्ण जू (युग) या अर्थाचाच वाचक झाला असावा असे वाटते.

संदर्भ :

१. मानवश्रौतसूत्र २.३.२.३६; 'ला अग्निष्टोम', कलान्द् व हेन्री पॅरीस, १९०६, पृ. १४६, तळटीप.

२. 'ला अग्निष्टोम', पृ. ८२.

३. शिशुपालवध, सर्ग १८, श्लोक ७.

श्री सोमवंशीय सहस्रार्जुन क्षत्रिय समाजातील आठघर प्रकरण

दत्ता वाळवेकर

सोळाव्या शतकातील या सोमवंशीय सहस्रार्जुन क्षत्रिय समाजाचा उल्लेख जुन्या ग्रंथातून आढळतो. रेशीम, सूत, चमक यांची विक्री करणे, रेशमी वस्त्र तयार करून त्यावर खास उत्तम भरतकाम करणे, हे त्यांचे त्या वेळचे प्रमुख व्यवसाय होते. त्या काळातील युरोपियन लोकांच्या बेसुमार मागणीमुळे हे लोक कलाकुसरीच्या वस्तू त्यांना पुरवीत असत. नंतर या लोकांनी तेथेच वास्तव्य केले. सिंधू नदीकडून मध्यभारत, गुजरात आणि नंतर दक्षिण भारताकडे हे लोक आपल्या व्यवसायाच्या निमित्ताने आणि त्या काळातील मुसलमानी आक्रमणामुळे ठिकठिकाणी पांगलेले आढळतात. सध्या हा समाज सर्व भारतात ठिकठिकाणी अनेक वेगवेगळ्या व्यवसायाच्या निमित्ताने पांगलेला आढळतो. त्यांची प्रमुख वस्ती म्हैसूर राज्य, मध्यप्रदेश, तामीळनाडू व महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात आढळते.

भाषा व्यवसाय आणि धार्मिक चालिरीती यातून या लोकांचे खास असे वेगळेपण आढळन येते.

या समाजात इ. स. १८११ मध्ये सुरु झालेले एक 'आठघर प्रकरण' चांगले गाजले. या संपूर्ण प्रकरणाबाबत कोणाही एका व्यक्तीस संपूर्ण माहिती नसल्यामुळे मी हे प्रकरण ज्या गदग–बेटगिरीस गाजले, तेथे व त्यात भाग घेतलेले लोक ज्या ठिकाणी होते त्या ठिकाणी म्हणजे हुबळी, धारवाड, बेळगाव, कराड आदि अनेक ठिकाणी फिरून या संबंधीचे सर्व कागदपत्र गोळा करून, तोंडी माहिती विचारून सर्व आधार तपासून मी हे प्रकरण सविस्तर तयार केलेले आहे.

हे आठघर प्रकरण उद्भविण्यास पुढील तात्कालिक कारण प्रथम घडले.

विजापूर येथे इ. स. १८११ साली श्री. तुळजणसा अरसिद्दी ऊर्फ गड्डद नावाचे क्षत्रिय जातीचे एक सरदार होते. हे सरदार क्षत्रिय समाजात कोणी मरण पावल्यास त्या अंत्यक्रियेस घोड्यावर बसून येत असत. हा प्रकार कित्येक दिवस चालू होता. याबद्दल समाजातील अनेक लोक आपापसात नापसंती व्यक्त करून चर्चा करीत असत; पण प्रत्यक्षात अशा दुःखद प्रसंगी त्यांना कोणी विरोधही केला नव्हता, किंवा याबद्दल जाबही विचारला नव्हता. नंतर कालान्तराने या सरदाराच्या घरीच त्याच्या मुलाचा–हिरणसाचा-मृत्यू झाला. ही बातमी तेथील सर्व जातिबांधवांना कळताच

सर्वानुमते असे ठरले की, आपणही आज सर्वांनी तुळजणसा यांचे घरी अंत्ययात्रेस घोड्यावरून जावे. थोड्याच वेळात सर्वजण घोड्यावरून तुळजणसाच्या घरासमोर हजर झाले. तुळजणसाने ही फौज पाहून आश्चर्याने पंचांना विचारले की, " आपण अंत्ययात्रेला आला आहात की, कुठल्या गावाला निघाला आहात ? " तेव्हा तेथे जमलेल्या घोड्यावरील पंचानी सांगितले की, " आपण स्वतः ज्यावेळी अंत्ययात्रेला घोड्यावरून येत होता, त्यावेळी कोणत्या गावाला जात होता ? " साहजिकच अशा या प्रश्नाने तुळजणसा चांगलाच वरमला. त्याने अंगावरचे धोतर त्वरित फेकून दिले आणि खाली मान घालून सर्वांची माफी मागितली. सर्वांनी लगेच घोडे सोडून दिले व पुढील सर्व क्रियाकर्म पार पाडले.

तुळजणसाने बाराव्या दिवशी सर्व पंचांना आमंत्रण देऊन जेवण्यास बोलाविले. जेवणाच्या प्रसंगी पुन्हा तोच विषय निघून तुळजणसा व पंच यांच्यातील बोलणे विकोपाला गेले आणि तेथे जमलेल्या अठ्ठेचाळीस घराण्यांतील लोकांपैकी चाळीस घराण्यातील लोक रागाने निघून गेले. राहिलेले आठ घराण्यातील लोक अर्थातच तुळजणसाच्या बाजूचे होते. त्यांच्यावर या चाळीस घराण्यातील लोकांनी बहिष्कार घातला. हीच ती आठघर प्रकरणाची सुरुवात होय.

या बहिष्कारातून या आठ घराण्याबाबत फारच द्वेषाचे वातावरण तयार झाले. चाळीसघरवाल्यांनी उघडउघड विरोधी प्रचार सुरू केला. त्यांच्या मते—

— या आठ घरवाल्यांशी रोटी-बेटी व्यवहार संपूर्ण बंद करावा.

— या समाजात लग्न, मुंज आदीसारख्या मंगल व मृत्यूसारख्या अमंगल प्रसंगांची बातमी समाजातील एका निरोप्यामार्फत कळविण्याची पद्धती आजतागायत रूढ आहे. घरी आलेल्या निरोप्याने तोंडातून शब्द काढेपर्यंत त्याने मंगल बातमी आणली आहे का दुःखद निधनाची बातमी आणली आहे हे मुळीच कळत नाही. तेव्हा अशी कोणतीही निमंत्रणे या आठ घरवाल्या लोकांना पाठवावयाची नाहीत.

— या आठघरवाल्या लोकांशी संबंध ठेवणारासही जातिबाहेर काढले जाईल असे सांगण्यात आले.

याचा परिणाम फार काळ चालू होता. पुढील काळात तर, एखाद्या मुलाच्या वडिलांचा मृत्यू झाला तर त्या मुलाला तशा दुःखद प्रसंगीही वडिलांच्या तोंडात अखेरचे पाणी घालताना शपथ घ्यावी लागे की, " मी आठघरवाल्याशी कोणताही, कसलाही संबंध ठेवणार नाही. " इतका हा वाद पराकोटीला गेल्याचे कळले.

— समाजातही अशा आठघरवाल्यांची शक्य होईल तेथे कुचेष्टा केली जात जात होती.

हा वाद मिटावा म्हणून जे काही लोक प्रयत्न करीत होते, त्यात श्री. धोंडूसा पवार, सातारा यांचा उल्लेख करावा लागेल. नंतर नंतर काही लोक आठघरवाल्यांचे बाजूने बोलू लागले. हुबळीचे श्री. पवार मास्तर यांनीही अशीच आठघरवाल्यांची बाजू जोरदार रीतीने मांडली. तेव्हा चाळीस घरवाल्यांच्या बाजूने श्री. फकीरसा मामर्डी यांनी श्री. पवार मास्तरांना सरळ सरळच विचारले. ते त्यांच्या भाषेतच (खत्री) पाहा—

" तुमने आठ घरवालेनो लई पुळको आयी अशी तर तुमारीं सोतानी छोकरीच दीकन देकाडो की आठ घरवाला वन्न ! "

म्हणजे, " तुम्हाला आठ घरवाल्यांचा फार पुळका आला असेल तर तुमची स्वतःची मुलगीच आठ घरवाल्यांच्या घरी देऊन दाखवा ना ! "

या प्रश्नाला श्री. पवार मास्तरांनी शाब्दिक उत्तर न देता खरोखरच आपली मुलगी श्री. सज्जनसा आरसिद्ध यांच्या मुलाला देऊन धडाक्याने विवाह समारंभ पार पाडला. याचप्रमाणे हरिहरचे गुरुनाथसा भुते हेही आठघरवाल्यांच्या बाजूनेच होते. त्यांनीही आपली स्वतःची मुलगी आठ घरवाले बाबासा आरसिद्ध यांच्या मुलास दिली. राणेबेन्नूरमधील सर्व लोकांना जेवण दिले. या लग्नास खास हुबळीहूनही लोक आले होते. अशा अनेक विवाहांची नोंद देता येईल. पण त्यातील गदग येथील एक विवाह अटीतटीने साजरा झाला. श्री. बुरबुरे यांची मुलगी मुळगुंद आठ घरवाल्यांना देण्याचे ठरले. लग्न समारंभात काही गोंधळ होईल अशी भीती वाटत होती. पण लग्न समारंभही नीट पार पडला. आता मिरवणुकही नाकावर टिच्चून काढली पाहिजे म्हणून ती निर्विघ्न पार पडावी म्हणून खास पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला व मिरवणुकीच्या वेळी फटाक्याच्या आवाजाप्रमाणे पोलिसांनी मधूनमधून बंदूक उडवून बंदोबस्तात मिरवणूक पार पाडली.

आठ घरवाल्यांनी हे प्रकरण १८ सप्टेंबर १८२७ मध्ये धारवाड येथील कोर्टात नेल्याचा उल्लेख सापडतो. वादी बाबासा पुरके व नारायणसा नाकोड वगैरे इसम आठघरवाले. प्रतिवादी– झंबासा हबीब वगैरे इसम अकरा. हे चाळीस घरवाले. यात धर्मशास्त्राप्रमाणे योग्य प्रायश्चित्त देऊन श्री. सन्निधानी तीर्थप्रसाद देवबून शुद्ध करून यादीत लिहिल्याप्रमाणे फैसला लिहवून वादीस एक प्रत देऊन, प्रतिवादीस एक दिली असता, प्रतिवादींनी मुडदारपणा करून एक फैसला घेतला नाही, म्हणून हुजुरास पाठविण्याचा फैसला एक व प्रतिवादीस देण्याचा फैसला एक, असे दोन्ही फैसले रुजूमोहोरप्रमाणे चालविण्याचा बंदोबस्त केला. त्या खाली त्या वेळचे ॲक्टिंग जज्ज श्री. ह्यूबर्ड यांची सही आहे.

पुढे याही निर्णयाची अंमलबजावणी व्हावी तशी झालेली दिसत नाही. म्हणून वादी–प्रतिवादी लोकांनीच हे प्रकरण श्रीमत् जगद्गुरू शंकराचार्यांकडे पाठवून

त्याचा योग्य निकाल करावा व ते जो निर्णय देतील त्याप्रमाणे आम्ही चालावे, असे कबूल केल्यावर हा मुकादमा श्री. शंकराचार्यांकडे गेला. श्री. शंकराचार्यांनी वादी-प्रतिवादी यांना बोलावून घेऊन पंडित मंडळी, कारभार मंडळी आणि स्थानिक ब्रह्मसभा या सर्वांसमक्ष प्रस्तुत जातिवादाची चर्चा केली. धर्मशास्त्राप्रमाणे युक्त प्रायश्चित्तासहित तीर्थप्रसाद देऊन त्यांनी आज्ञापत्र दिले (इ. स. १८३२) व त्यात प्रामुख्याने ' वादी-प्रतिवादी ह्यांनी एकोदर असल्याप्रमाणे चालावे ' असा निर्णय दिला.

काही काळपर्यंत रोटी-बेटी व्यवहार इत्यादी गोष्टी परस्परांत चालू झाल्याही ! पुन्हा क्षुल्लक कारणावरून भांडणे होऊन आठ घरांशी पुन्हा व्यवहार बंद पडला. या वेळपर्यंत आठघर लोकांची संख्या कितीतरी वाढलेली होती. तरी मागील ठराव धाब्यावर बसविण्यात आले व पुन्हा कोर्ट प्रकरण सुरू झाले. त्यात ' हे चाळीसघरवाले आठघरवाल्यांना त्रास देत आहेत असे सांगितले. तसेच आठ-घरवाल्यांनी दाव्याचा खर्च रु. ३,०००।– मागितला व श्री. शंकराचार्यांच्या निकालाचे त्यांना पालन करावयास भाग पाडावे, अशी विनंती केलेली होती.

या मागणीनंतर सर्वश्री रामासा नाकोड, बाबासा आरसिद्ध, नरसिंगसा आरसिद्ध, तुळजासा आरसिद्ध व गदग, बेटगिरी येथील समस्त पंच मिळून जाति-रिवाजाप्रमाणे आम्हांस शिरमुंडण वगैरे करवून दैवाचारात घेतल्याबद्दल आम्ही तुम्हावर यापूर्वी फिर्याद वगैरे केलेली ती सर्व रद्द करून घेतली आहे. आम्ही आज-पासून मागील जिकेरी वगैरे काढणार नाही. मागील नुकसानीबद्दल फिर्याद करणार नाही. आमच्या तुमच्या जातिसंबंधी खटला काही एक राहिला नाही. आम्ही-तुम्ही सर्व एक झालो म्हणून लिहून दिले (१९ जानेवारी १८३६) आणि या प्रीत्यर्थ आठघरवाल्यांनी चाळीसघरवाल्यांना आणि आजूबाजूचे लोकांना मोठे ' इच्छाभोजन ' दिले. ते चांगले चार-सहा दिवस चालले होते.

अशा या सामाजिक कार्यात निरनिराळ्या लोकांनी या ना त्या रीतीने भाग घेतलेला आढळतो. एकीकडे असा समेट होत चालला तरी मधेच कोणीतरी मागील पैशाच्या व्यवहारावरून आणि या ना त्या वैमनस्यावरून इ. स. १८३९ मध्ये कोर्टात रु. २८०।– चा दावा उभा केलेला आढळतो. हे पाहून फारच आश्चर्य वाटते. एकूण हा द्वेषाग्नी संपूर्ण विझलेला नाही हे पुन्हा एकदा सिद्ध झाले.

इ. स. १९१६ मध्ये उमरावती येथे सोमवंशी सहस्रार्जुन क्षत्रिय समाजाची पहिली परिषद भरली. त्याचे अध्यक्ष होते श्री. केशवसा विठ्ठलसा भंडारी. या परिषदेत आपल्या ज्ञाति-बांधवांनी आपआपसातील द्वेष भाव विसरून आपल्या धर्माने राहून, धर्माविरुद्ध कोणतीही क्रिया न करता एकीने राहून कौशल्य चांगल्या तऱ्हेने वाढवावे असा विचार मांडला गेला.

इ. स. १९१७ मध्ये नागपूर येथे दुसरी परिषद भरली. त्याचे अध्यक्ष होते श्री. गोविंद बळवंत बाकळे, सोलापूर. याही परिषदेत समाज बांधवांनी एकीने वागण्यासंबंधीचे विचार मांडण्यात आले व मागील उमरावतीच्या परिषदेतील ठराव घेऊन एकत्र पुस्तकरूपाने प्रसिद्ध केले.

इ. स. १९१८ च्या एप्रिल महिन्यात बेळगाव–शहापूर येथे ज्ञातीमध्ये चांगल्या सुधारणा व्हाव्यात, आपणातील द्वेषभावना विसरून एकीने राहावे याच विचारार्थ परिषद भरली. या सभेचे अध्यक्षस्थान श्री. भवानसा धर्मासा कबाडी, बेटगिरी यांनी स्वीकारले होते. या परिषदेत श्री. तम्मणसा अरसिद्दी ऊर्फ गड्डद यांनी केलेली विनंती त्यांच्या कागदपत्रांचे परिशीलन करून विचारात घेण्यासाठी व हे कार्य सुगम करण्यासाठी ५३ लोकांची एक सब-कमिटी नेमण्यात आली. या कमिटीचे सदस्य वेगवेगळ्या गावचे होते. यांना सोईचे व्हावे म्हणून हुबळी येथे कमिटी बोलविण्याचा प्रयत्न करण्यात आला. श्री. तम्मणसा अरसिद्दी यांनी परिषदेस खालीलप्रमाणे निवेदन सादर केले—

"माझ्या जातिबांधवात विद्यावंत, ज्ञानसंपन्न, वंशवृद्धीकडे लक्ष देणारे, मत सुधारण्याच्या कामात निपुण, नवीन कला संपादण्याच्या कामात मग्न असणारे लोक, सरकारी कागदपत्रातील निर्णय वाचून न्यायनिवाडा करणारे लोक, तसेच व्यासादि पूर्वजांनी लिहून ठेवलेल्या ग्रंथांच्या आधारावरून धर्मोपदेश करणारे अनेक लोक असून सरकारात सिद्ध झालेल्या कागदपत्रांचा सारांश पाहता आता असा द्वेष वाढविणे योग्य नाही. हे माझ्या जातीच्या लोकांना पटून माझ्या पक्षाच्या लोकांना होणारी पीडा दूर करणे तुम्हा सर्वांना शक्यप्राय गोष्ट असून तसे करण्यास आपण सर्व समर्थ आहात.

माझ्या पक्षाचे बहुतेक लोक दरिद्री असून लक्ष्मीच्या कटाक्षापासून दूर असल्यामुळे हे जाहीर विनंती-पत्रक लवकर प्रकट करणे झाले नाही. माझ्या पक्षातील आठ घराण्यांतील लोक आद्य श्रीमत् जगद्गुरू शंकराचार्यांकडून प्रायश्चित्त मिळविते झाले. पुन्हा चाळीस घराण्याचे पक्षाचे व आठ घराण्याच्या पक्षातील लोक पूर्वजाप्रमाणे एकोप्याने राहण्याप्रमाणे प्रायश्चित्त मिळविते झाले. याप्रमाणे दोन वेळा प्रायश्चित्त मिळवूनही आमच्या ज्ञाति-बांधवांच्या अनुमोदनास पात्रता मिळाली नाही. तर शेवटचे प्रायश्चित्त म्हणून माझे मतस्थ असे जे तुम्ही लोक आहात, त्यांनी एक मोठा खंदक खणून, त्यात मोठा अग्नी करून, त्यात माझ्या पक्षाच्या सर्व लोकांना स्वतःच्या हाताने ढकला, म्हणजे त्या चितेत पडून तडफडत मरत असलेले पाहून तुम्हांस आनंद मिळविता येईल. म्हणजे द्वेष कीर्तीचा कळस तिसऱ्या प्रायश्चित्तालाच समाप्ती झाल्याप्रमाणे होईल. माझ्या प्रिय ज्ञाति-बांधवांनो, तसे होऊ नये म्हणून मी प्रार्थना करीत आहे की पशु-पक्ष्यांच्या ठिकाणीसुद्धा किती जाती अभिमान असतो,

म्हणून माणूस संपन्न असल्याकारणाने अभिमान कधीही सोडणार नाही. पण आम्ही सर्व श्री सोमवंशी सहस्रार्जुन क्षत्रिय मातांचे नव्हे असे सिद्ध झाले असते तर पूर्वज लोकांनी प्रायश्चित्तादि कार्ये कशी केली असती? शरीरसंबंध कसा वाढविला? याशिवाय अन्नोदक व्यवहार एकोप्याने कसे केले? इत्यादी प्रश्नांचा खल कागदपत्रांवरून आपण करणारच आहात. तेव्हा माझ्या पक्षाच्या लोकांना आपल्या जातीचा पाठीचा कणा दुसऱ्याच्या हाती जाऊ न देता आम्हास प्राप्त झालेल्या तीव्र वेदनांपासून मुक्त करावे.

राजा लुटे जरी प्रजाजनाला। माता मारी निजबाळाला।
बंधु विकती जरी निज बहिणीला। शरण कोणा जावे?

अशा संकटग्रस्त लोकांनी ईश्वराशिवाय कोणाला शरण जावयाचे? तेव्हा मी माझ्या सर्व ज्ञातिबांधवांच्या चरणी माझ्या पक्षातील सर्व लोकांच्यासहित शरण आलो आहे."

सही— तम्मणसा अरसिद्दी
२०–८–१९१८

यानंतर पुणे येथे १९३२ मध्ये क्षत्रिय समाजाची परिषद भरली. त्याचे अध्यक्ष होते डॉ. अंबादास नारायणदास दाणेज, क्षत्रिय, मु. यवतमाळ (प्रांत वऱ्हाड) व स्वागताध्यक्ष होते पुण्याचे श्री. बाबुरावजी वाळवेकर, एम्. एल्. ए. अध्यक्षीय भाषणात डॉ. दाणेज यांनी आठघर प्रकरणाबाबत पुढील विचार मांडले—

"गदग येथे असे ठरले होते की ४० घरवाले व आठ घरवाले यांनी आपापली कैफियत जाहीर करावी. त्याची शहानिशा करण्यासाठी एक कमिटी नेमली. परंतु त्यात फक्त आठ घरवाल्यांनीच आपली बाजू मांडली. पण ४० घरवाल्यांनी आपली कैफियत मुळीच जाहीर केली नाही. आठ घरवाल्यांनी कमिटीकडे येरझारा घालून थकले. यानंतर मी स्वतः (डॉ. दाणेज) 'एक कैफियत' म्हणून एक पुस्तक छापून ते गावोगाव प्रसिद्ध केले. परंतु फक्त श्री. गो. ब. बाकळे, सोलापूर यांचेशिवाय कोणीही उत्तर पाठविण्याची तसदी घेतली नाही.

वऱ्हाड (सी. पी.) मध्ये सर्व गावच्या पंचांच्या लेखी संमतीने त्या लोकांशी रोटी-बेटी व्यवहार केला आहे. कर्नाटक प्रांतातील काही लोक अद्याप यासंबंधी तक्रार करतात व आमच्याकडील कोणी तिकडे गेल्यास निराळे जेवावयास देतात. म्हणून यासंबंधीचा शेवटचा निकाल या अखिल भारतीय सोमवंशी सहस्रार्जुन क्षत्रिय समाज परिषदेत लावून घ्यावा व या विषयी पुन्हा कोणी अडथळा केल्यास तोच बहिष्कृत समजला जावा."

याचा निकाल लावून घेण्यासाठी कर्नाटक येथील चाळीसघरवाल्यांसमोर डॉ. दाणेज यांनी १० प्रश्न मांडले त्यांची उत्तरे त्यांनीच द्यावीत व या परिषदेत बहुमताने जो निकाल होईल तो सर्वांनी मान्य करावा असे सांगितले.

हे प्रश्न खालीलप्रमाणे होते—

(१) आठघरवाले आपल्या जातीचे आहेत किंवा नाही ?

(२) जुने देवीचे देऊळ त्यांच्या ताब्यात आहे किंवा नाही ?

(३) ते इतकी वर्षे जाति-बहिष्कृत राहण्यासारखा त्यांचा गुन्हा कोणता ?

(४) त्यांचा कितीही गुन्हा असला तरी त्यांना काही शासन करून आपण मिळवून घेऊ शकत नाही काय ?

(५) त्यांच्यासंबंधी श्रीजगद्गुरु शंकराचार्यांनी काही आज्ञापत्र दिले होते किंवा नाही ? व ते दिले असल्यास ते तरी तुम्ही मानण्यास तयार आहात काय ?

(६) तुम्ही सर्व गावांच्या पंचांस यांच्यासंबंधी कधी कळविले आहे काय ?

(७) दुसऱ्या गावाच्या लोकांनी यांच्याशी व्यवहार केल्यास तुमचे काय बिघडले ?

(८) या महासभेत जे ठरेल ते तुम्ही मान्य करण्यास तयार आहात काय ?

(९) येथे जे ठरले ते अखेर ठरून याच्यापुढे यासंबंधी काहीही तक्रार राहिली नाही हे मानण्यास तुम्ही तयार आहात काय ?

(१०) तुमच्या पठडीत यांच्या मुली व यांच्या पठडीत तुमच्या मुली अजून हयात आहेत हे खरे किंवा खोटे ?

याप्रमाणे या प्रश्नांचा निकाल लागल्यास अनेक लोक आज बरीच वर्षे यातना भोगत आहेत ते मुक्त होतील असे अध्यक्ष डॉ. दाणेज यांनी सांगितले.

शेवटी सभेचा सूर "आठघरवाल्यांना जातीत घ्यावे" असा दिसताच सर्व सभाच उधळली गेल्यासारखे झाले. काही लोक लगेच सभात्याग करून निघून गेले. पैकी काहीजण हुबळीचे श्री. निरंजनसा मल्हारसा यांच्या पुण्यातील दुकानात येऊन राहिले. काही लोक या भानगडी नकोच म्हणून स्वतः हाताने स्वयंपाक करून जेवले. स्वागताध्यक्ष श्री. बाबुराव वाळवेकर स्वतः तेथे आले आणि त्यांनी, "सर्व चर्चा करूया. जेवण करून घ्या." असे सांगितले तरी लोकांनी विनंती अमान्य करून ते हुबळीला निघून गेले.

यानंतरच्या काळात आठघराण्यांतील लोकांनी, चाळीसघराण्यातील लोकांशी रोटी-बेटी व्यवहार केलेले आढळतात. त्यांच्या नावानिशीवार पुरावा मजकडे आहे. ती सर्व नामावळ आता स्थलाभावी मी येथे देत नाही. या आधारावरून पाहता आमच्या चाळीस घराण्यातच गदग–बेटगिरी, हुबळी, सोलापूर, पुणे, बेळगाव, शहापूर, यवतमाळ वगैरे गावातच (कर्नाटक, महाराष्ट्र, गुजराथ) व्याहीपण झालेले आढळते.

या संबंधीचा शेवटचा विचार गदग येथे सब-कमिटीने केलेला आढळतो. त्यात १७ गावांतील ५३ सभासद होते. ३–९–१९६४ रोजी गुरुवार सायंकाळी ६ वाजता श्री. चंदुलालसा चव्हाण कल्याण मंडपात स्पेशल जनरल सभेत चर्चा झाली. त्यात वरील वृत्तान्त समजून घेऊन यानंतर आठ घराणी व चाळीस घराणी नावाचा कित्येक दिवसांपासून असलेला भेदभाव आजच्या प्रगतिपर काळात असता कामा नये, अशा सद्‌भावनेने रोटी-बेटी व्यवहार करण्यास सर्वानुमते कबुली देऊन ठराव पास केला. ठरावानंतर तीन गल्लीतून फेरी करावी. मुख्य भाषेच्या दिन-पत्रिकेत प्रसिद्धी द्यावी व समाजाच्या सर्व पंचांना पत्रद्वारे हा महत्त्वपूर्ण निर्णय कळवावा असा ठरावही पास झाला. या ठिकाणी आयत्या वेळच्या भाषणात ठरावास पाठिंबा देणारी पुढील व्यक्तींची थोडक्यात भाषणे झाली. त्यात सर्वश्री हनुमंतसा नरसिंगसा काबाडी, यल्लोसा कृष्णासा खटवटे, शंकरसा शिदलिंग, बाळकृष्णसा नागेंद्रसा काटिगर, व्यंकोसा बाबासा बाकळे, आर्. एन्. कबाडी, व्ही. डी. बद्दी, एस्. टी. चव्हाण या सर्वांनी ठरावास पाठिंबा देताना पुराणातील अलंकारयुक्त दाखले देऊन ट्रस्ट कमिटीस धन्यवाद दिले. शेवटी जगदंबेच्या नावाचा जयघोष केला व सभा बरखास्त झाली.

यानंतर बदलत्या काळाचा इतिहास पाहता गदग, बेटगिरी या भागातील क्षत्रिय समाजातील लोकांनी आपली जात सोडून ख्रिश्चन झाल्याची उदाहरणेही आहेत. मात्र हा प्रकार त्यांच्या अत्यंत बिकट परिस्थितीमुळे घडला असावा असे म्हणतात.

आता आठघराचा वाद पुन्हा उद्‌भविण्याची शक्यताच नाही. कारण कायद्यानेच तशी बंदी घातलेली आहे. अगदी अलीकडच्या काळाचा आढावा घेतला तर, सोमवंशी सहस्रार्जुन क्षत्रिय समाजात खत्री–गुजराथी, खत्री–सिंधी, खत्री–ब्राह्मण असे आंतरजातीय विवाह होत आहेत. यावर आठ घराप्रमाणे एखादे प्रकरण उभे राहणे तर दूरच. पण साधा विरोध करण्याइतपतही कोणी विचार करणे अशक्य झाले आहे असा हा आठघर प्रकरणाचा इतिहास !

वैदिक विज्ञान

ग. उ. थिटे

विज्ञान शब्दाने मराठीत ज्याला कौल लावणे किंवा शकुन पाहणे असे म्हणता येईल ह्याप्रकारचे विधी बोधित होतात. "प्रिमिटिव्ह" धर्मामध्ये शकुन पहाणे[1] ह्या विधीला महत्त्वाचे स्थान असते. सामान्य अवलोकनाने न कळू शकणाऱ्या किंवा भविष्यातील गोष्टींचा शोध घेण्यासाठी विज्ञान हा विधी केला जातो. अशा प्रकारचे विधी, युद्ध, विवाह, सत्र, इमारत बांधणे ह्यांसारख्या महत्त्वाच्या प्रसंगांच्या आधी केले जातात.[2] विज्ञान ह्या प्रकारचे विधी मुख्यत्वेकरून गृह्यसूत्रांमध्ये (आणि विशेषत: अथर्ववेदाचे जे गृह्यसूत्र कौशिकसूत्र[3] त्यात) आढळत असले तरी गृह्यसूत्रांच्या आधीच्या काळातील वैदिक साहित्यातही विज्ञानविधींचे उल्लेख आढळतात.

विज्ञान ह्या अर्थी इतरही काही शब्द वापरले जातात. उदाहरणार्थ, सामविधानब्राह्मणात (३.४.१) **अदृष्टदर्शन**, भारद्वाजगृह्यसूत्रात (१.११), **ज्ञान**, अग्निवेश्यगृह्यसूत्रात (३.५.८) **उत्प्रेक्षा**, हे शब्द आणि काठकगृह्यसूत्रात (३.२.४) **परीक्षयेत** हे क्रियापद वापरले आहे. मात्र तैत्तिरीय संहिता (३.३.८.५), शतपथब्राह्मण (३.३.४.११), मानवगृह्यसूत्र (१.७.४) आणि कौशिकसूत्र (सर्वत्र) **विज्ञान** हा शब्द वापरलेला आढळतो. आणि ह्या शब्दाच्या वापराचे परिमाण एकंदरीत जास्त आहे.

बरेचसे विज्ञान-विधी केवळ योगायोगावर आधारलेले आढळतात.

कोणत्या दिशेला विजय प्राप्त होईल ते जाणण्यासाठी पुढील विधी करावयाचा असतो. पुरोहित अथर्ववेद ४–३१ आणि ३३ ह्या सूक्तांनी दर्भांवर इङ्गिड-तेल टाकतो आणि ते पेटवतो. मग ज्या दिशेला धूर जाईल त्या दिशेचा शत्रू पराभूत होतो; म्हणजे आपण त्या दिशेला हल्ला केल्यास विजयप्राप्ती होईल. (कौ. सू. १४.३० व पुढे). युद्धात कोण विजयी होईल ते जाणण्यासाठी पुरोहिताने तीन दोऱ्या अभिमंत्रित करून त्या पेटत्या निखाऱ्यावर टाकाव्यात. मनातल्या मनात तो मधली दोरी म्हणजे मृत्यूचे आणि इतर दोन म्हणजे युद्धातील दोन्ही बाजूंच्या सैन्यांची प्रतीके समजतो. निखाऱ्यावर टाकल्यावर जी दोरी मधल्या दोरीच्या पातळीत येईल त्या दोरीने सूचित होणाऱ्या बाजूचे सैन्य पराभव आणि मृत्यू पावते. जी दोरी मधल्या दोरीच्या पातळीपेक्षा वरच्या पातळीवर जाईल त्या दोरीने सूचित होणाऱ्या बाजूचे सैन्य विजयी होईल. तसेच त्या दोऱ्या निखाऱ्यावर टाकल्यावर जर त्यांची वरची टोके वर आली तर सैन्यातील श्रेष्ठ माणसे, मधली बाजू वर आल्यास मध्यम दर्जाची माणसे आणि खालची टोके वर आल्यास कनिष्ठ दर्जाची माणसे मरण

पावतील. (कौ. सू. १५.१५–१७). एखाद्या युद्धात विजय मिळेल का नाही ते जाणण्यासाठी युद्धाच्या आदल्या दिवशी एक वेदी तयार करावी. त्यावेळी अथर्ववेद १.४ हे सूक्त वापरावे. दुसऱ्या दिवशी ही वेदी समच राहिल्यास विजय मिळेल आणि विषम झाल्यास पराभव जाणावा. आपला शत्रू मरेल का नाही हे जाणण्यासाठी एखाद्या उंच जागेवरून माती घ्यावी आणि ती पलाशाच्या पानात गुंडाळून भट्टीत टाकावी. जर तडतड आवाज झाला तर शत्रू मरेल असे समजावे. (कौ. सू. ४७.२९).

दोन किंवा अधिकांच्या समूहापैकी कोण विजयी होईल ते सामविधानब्राह्मण ३.४.१० येथे दिलेल्या विधीवरून जाणून घेता येईल. जितक्या व्यक्ती असतील तितके जळत्या अंगारांचे ढीग करावे व प्रत्येकाच्या नावाने एकेक ठेवावा. मग उद्गात्याने श्रुष्टचग्ने... (ग्रामगेय ३.११.१६६.१) हे साम म्हणत सर्व ढिगांवर तूप ओतावे. ज्याचा ढीग आधी प्रदीप्त होईल आणि उजवीकडे ज्वाला जाईल तो विजयी होईल.

गायी-बैलांची वाढ व्हावी ह्यासाठी काही यातुधर्मात्मक विधी करावयास सांगितले आहेत. दर्श किंवा पौर्णिमासी इष्टीच्या आधी तीन दिवस पुरोहित एखाद्या बैलाचे शेण, गुग्गुलु आणि मीठ ह्या गोष्टी जिचा वत्स तिच्याच रंगाचा आहे अशा गायीच्या दुधात टाकतो. आणि त्या दुधात भात शिजवतो. नंतर तो भात तो अग्नीच्या पश्चिम दिशेला पुरतो. मग चौथ्या दिवशी दर्श किंवा पौर्णमासी इष्टी करून त्यातील मुख्य आहुती अथर्ववेद ३.२६; ३.१४; ७.७५ किंवा ९.१ ह्या सूक्तांनी देतो आणि उरलेले आज्य त्या भातावर टाकून तेच सूक्त म्हणतो. त्या भाताचा वास चव किंवा रंग ह्यामध्ये काही फरक झालेला आढळला तर गायी-बैलांची वाढ होईल असे समजावे (कौ. सू. १९.१९ व पुढे).

पुढील विधीवरून चांगला पाऊस पडेल किंवा नाही ते जाणून घेता येते. सोमयज्ञातील आदित्यग्रहग्रहणाच्या वेळी सोमरस दह्यामध्ये मिसळला जातो. हे मिश्रण करताना सोमरस जर चटकन गळाला तर पाऊस चांगला पडेल; पण जर मंदपणे गळाला तर चांगला पाऊस पडणार नाही असे समजावे. (तैत्तिरीय संहिता ६.५.६.५; काठकसंहिता २८.६; कपिष्ठलकठसंहिता ४४.६; बौधायन श्रौतसूत्र ८.९; मैत्रायणी संहिता ४.६.६).

त्रिरात्र ह्या यज्ञात नऊशेनव्याण्णव गायी दक्षिणा म्हणून दिल्या जातात. आणि एक हजारावी गाय देण्याआधी एक विज्ञानविधी होतो. त्यात ती गाय मोकळी सोडली जाऊन ती कोणत्या दिशेने जाते ते पाहिले जाते. ती जर पूर्वेला गेली तर यजमान हा विजयी झाला. त्याला चांगला परलोक मिळणार असे समजावे. ती जर उत्तरेला गेली तर यजमान ह्याच जगात अधिक प्रगत होईल असे समजावे. ती

जर पश्चिमेला गेली तर यजमान श्रीमंत होईल असे समजावे. आणि ती जर दक्षिणेला गेली तर यजमान लवकरच मरणार आहे असे सूचित होते. (शतपथब्राह्मण ४.५.८.११; तुलना करा आपस्तम्बश्रौतसूत्र २२.१६.८).

घर बांधण्याच्याआधी जेथे घर बांधावयाचे ती जमीन चांगली आहे की नाही हे विज्ञानविधीच्या साहाय्याने जाणले जाते.[४] गुडघ्याएवढ्या खोलीचा एक खड्डा खणून त्यातून बाहेर काढलेली माती त्यात पुन्हा टाकावी. ही माती खड्ड्याच्या पातळीहून जास्त भरली तर जमीन चांगली आहे; खड्ड्याच्या एवढी भरली तर मध्यम; आणि खड्ड्याहून कमी भरली तर अधम आहे असे समजावे. (आश्वलायन-गृह्यसूत्र २.८.१ व पुढे; मानवगृह्यसूत्र २.११.५).

अग्नी जळत असता त्याच्या जळण्याच्या पद्धतीवरून शकून पाहता येतो. जर अग्नीच्या ज्वाळा सरळ असतील तर ते शुभ आहे. (अथर्ववेदाचे ज्वालालक्षण हे परिशिष्ट १.४). पण ज्वाला डाव्या बाजूला वळत असल्यास ते अशुभ (तोच ग्रंथ २.१).

हरवलेली गोष्ट कुठे सापडेल ते जाणण्यासाठी पुढील विधी करावा. सर्व दिशा अथर्ववेद २.१ ह्या सूक्ताने अभिमंत्रित करून पाच पेशी असलेला बाण आकाशात टाकावा. ज्या दिशेला वस्तू असेल असा अंदाज केला होता त्याच दिशेला बाण पडल्यास त्याच दिशेला वस्तू सापडेल असे जाणावे (कौ. सू. ३७.३). हरवलेली वस्तू शोधण्याकरिता करावयाच्या दुसऱ्या विधीमध्ये अंदाज करणे हा घटक नाही. त्यामध्ये पुरोहिताने एक कुंभ नव्या वस्त्राने वेष्टावा. तो पलंगावर ठेवावा. मग त्यावर अथर्ववेद २.१ ह्या सूक्ताने दिलेल्या आहुतीतून उरलेले आज्य टाकावे. मग ऋतू प्राप्त न झालेल्या कन्यांना तो घट नेण्यास सांगावे. ह्या वेळी त्यांचे डोळे बांधलेले असावेत. त्या तो कुंभ जिकडे नेतील त्या दिशेला हरवलेली वस्तू सापडेल (कौ. सू. ३७.४ व पुढे).

कौ. सू. ३३.१७ व पुढे येथे दिलेला विधी करून एखाद्या गर्भवती स्त्रीला मुलगा होईल का मुलगी होईल ते जाणता येते. त्या विधीत पुरोहिताने तिच्या हातावर चार उमाफले द्यावीत. आणि अथर्ववेद १.११ ह्या सूक्ताने त्यावर अभिमंत्रण करावे. मग त्याच्यावर पाणी ओतले असता ती फळे जर चिकटली तर मुलगा होईल असे समजावे.

प्रसूती सुखाने होईल का नाही आणि मुलगा होईल का मुलगी हे जाणण्यासाठी इतर काही विधी कौ. सू. ३३.१ व पुढे सांगितले आहेत. अथर्ववेद १.११ ह्या सूक्ताचा विनियोग करून पुरोहिताने एक आहुती द्यावी आणि आहुती देऊन उरलेले आज्य पाण्याने भरलेल्या कुंभात टाकावे. मग गर्भवतीच्या डोक्यावर मुंज नावाचे

गवत धरून ते फाडावे. ते गवत न तुटता फाडता आले तर अनुकूल आणि तुटले तर प्रतिकूल उत्तर समजावे.

एखाद्या मुलीला कोणत्या दिशेला वर प्राप्त होईल हे जाणण्यासाठी पुरोहिताने एखाद्या नव्या वस्त्रावर अथर्ववेद २.३६ ह्या सूक्ताचा विनियोग करून दिलेल्या आहुतीतील उरलेले आज्य टाकावे. मग ते वस्त्र एखाद्या बैलावर टाकावे. तो ज्या दिशेला जाईल त्या दिशेहून भावी वर येईल (कौ. सू. ३४.१८).

काही विज्ञानविधी कोणत्याही उद्देशाने करता येतात. उदाहरणार्थ अथर्ववेद १.४ ह्या सूक्ताचा बापर करून दुधात भात शिजविण्यास प्रारंभ करावा. मग मनात अंदाज करावा की आता भात शिजला असेल. त्यावेळी तो खरोखरीच शिजला असेल तर कोणत्याही कामात अनुकूल फळ मिळेल असे समजावे. (कौ. सू. ३७.१). ह्याच सूक्ताचा बापर करून हातात काही दर्भ घ्यावेत. मग ते मोजावेत. ते जर विषम संख्येत असतील तर अशुभ फल आणि सम संख्येत असतील तर शुभ फल समजावे (कौ. सू. ३७.१).

काही विज्ञानविधी केवळ योगायोगावर आधारलेले नसून त्यात काही कृत्रिमता असण्याची शक्यता आहे. उदाहरणार्थ, वधूपरीक्षेच्यावेळी पुरोहिताने अथर्ववेद २.१ हे सूक्त म्हणून मुलीच्या हातात पाणी द्यावे. ते तिने पूर्वेला टाकले तर ती चांगली मुलगी म्हणून समजावी (कौ. सू. ३७.११). येथे मुलीला आधीच पढवून ठेवले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. कौ. सू. ३४,.१४ मध्ये सांगितलेल्या पुढील विधीमध्येही हीच शक्यता आहे. तेथे पुरोहित अथर्ववेद २.३६ ने एक आहुती देऊन त्यातून उरलेले एक आज्य सात दोऱ्यांवर टाकतो. मग तो एकेका दोरीला एकेक वासरू बांधतो. आणि मग उपवर मुलीला ती वासरे सोडण्यास सांगतो. तिने जर डावीकडून उजवीकडे अशी सुरुवात केली तर ती मुलगी चांगली समजावी. येथे त्या मुलीला तिच्या बाजूचे लोक आधीच काही पढवून ठेवण्याची शक्यता आहे. त्यामुळे असे विज्ञानविधी केवळ योगायोगावर अवलंबून नसून कृत्रिम असावेत असे वाटते.

दीर्घायुष्य आहे का नाही ते पाहण्यासाठी केल्या जाणाऱ्या विज्ञानविधींमध्ये-सुद्धा कृत्रिमता आढळून येते. म्हणजे ज्या योगे दीर्घायुष्य सूचित होईल अशा प्रकारे विज्ञानविधी करण्याचा प्रयत्न होतो. अग्निष्टोमयज्ञामध्ये भातात तूप ओतून तो उद्‌गात्यांकडे आणला जातो आणि त्यांना त्या तुपात आपले प्रतिबिंब पाहाण्यास सांगतात. ह्या संदर्भात असे म्हटले आहे की, ज्याचे आयुष्य संपत आले आहे त्याला आपले प्रतिबिंब दिसत नाही.[५] (मैत्रायणी संहिता ४.७.२; तुलना करा कपिष्ठलकठ-संहिता ४५.३; तैत्तिरीय संहिता ६.७.२; आपस्तम्बश्रौतसूत्र १३.१४.३ व पुढे; कात्यायनश्रौतसूत्र १.२०; आश्वलायनश्रौतसूत्र ५.१९). पण पुढे असेही

सांगितले की जर प्रतिबिंब दिसत नसेल तर आणखी खूप तूप ओतावे व ज्यायोगे प्रतिबिंब दिसेल असा प्रयत्न करावा (तैत्तिरीय संहिता ६.७.२). म्हणजे दीर्घायुष्य आहे का नाही ते जाणण्याचा हा साधा विज्ञान-विधी नसून तो दीर्घायुष्य प्राप्त करून घेण्याचा यात्वात्मक विधी आहे.

पुढील विधीही केवळ विज्ञानविधी नसून अनुकूल परिणाम घडवून आणण्यासाठी केले जाणारे यात्वात्मक विधी आहेत. उदाहरणार्थ, सोम ही वनस्पती आणताना ती ज्या गाडीमधून आणावयाची त्या गाडीच्या बैलांच्या रंगावरून विज्ञान पाहावे. त्या बैलांपैकी एक किंवा दोन्ही काळ्या रंगाचे असल्यास पाऊस चांगला पडेल (शतपथब्राह्मण ३.३.४.११). येथे मुद्दाम एक किंवा दोन्ही बैल काळे जोडून चांगला पाऊस पडावा ह्यासाठी यात्वात्मक विधी अभिप्रेत दिसतो.

सोमयज्ञ करतानाही एक कृत्रिम पद्धतीचा विज्ञानविधी होतो. त्यात उपरव खणून झाल्यावर अध्वर्यू आणि यजमान एकमेकांना स्पर्श करतात. मग अध्वर्यू विचारतो, " यजमाना, येथे काय आहे ? " त्यावर यजमान उत्तर देतो, " येथे कल्याण आहे ". मग अध्वर्यू म्हणतो, " ते आपणा दोघांस एकदम प्राप्त होवो." मग ते दोघे जागांची अदलाबदल करतात. त्यानंतर अध्वर्यूला यजमान विचारतो, " येथे काय आहे ? " त्यावर अध्वर्यू उत्तरतो, " येथे कल्याण आहे ." त्यावर यजमान म्हणतो, " ते मला मिळो." (शतपथब्राह्मण ३.५.४.१६ व पुढे). कौशिकसूत्र २०.१६ व पुढे येथील विज्ञानविधीनुसार नांगरणीच्या वेळी यजमानाने उत्तरेकडील नांगरणीमधून एक ढेकूळ हातात घ्यावे. मग त्याच्या पत्नीने त्याला विचारावे, " हे काय आणले आहे ? " त्यावर उत्तर देताना यजमानाने विचारावे, " वित्ति, भूति, पुष्टि, प्रजा, पशू, आणि अन्नाद्य (आणले आहे.)" अशा रीतीने वित्ति वगैरे अनुकूल गोष्टी मिळवण्याचा हा यात्वात्मक विधी आहे. कौशिकसूत्र ५०.१५ व पुढे वर्णिलेला प्रवासाच्या वेळचा विज्ञानविधीही प्रवास सुखकर व्हावा म्हणून करावयाचा एक यात्वात्मक विधीच वाटतो. त्यामध्ये प्रवासाला निघणाऱ्याने एखाद्या अनुकूल अशा ब्राह्मणाच्या सांध्यावर गोमय ठेवून दिवस शुभ आहे का ते विचारावे. त्या ब्राह्मणाने मग दिवस चांगला व शुभ आहे असे उत्तर द्यावे. ह्या विधीमध्ये अथर्ववेद ६.१२८ ह्या सूक्ताचा वापर होत असतो.

अशा रीतीने विज्ञानविधीमध्ये आपणास काही ठिकाणी यात्वात्मक विधींचे रूप आढळून येते. तसेच त्यामध्ये काही क्रीडात्मक[५] आणि स्पर्धात्मक अंशही दिसून येतात. विज्ञानविधीमध्ये लोकांची करमणूक होत असावी आणि त्यांच्याकडे खेळ म्हणून पाहिले जात असावे. पण प्रिमिटिव्ह समाजामध्ये खेळांना काही यात्वात्मक अर्थ असतो. खेळामुळे जगातील शक्तींना गती दिली जाते असा समज असतो. त्यायोगे अनुकूल परिणाम घडून यावेत अशीही श्रद्धा असते. उदाहरणार्थ, वाजपेय

यज्ञात रथांची शर्यत हा खेळ होतो. त्या शर्यतीत यजमान विजयी व्हावा अशी व्यवस्था असते. तेथे यजमान विजयी झाला (पाहा आपस्तम्बश्रौतसूत्र १८.४.१७; कात्यायनश्रौतसूत्र १४.४.६) की तो प्रत्यक्ष जगातही विजयी होईल असा विश्वास असतो. तसेच राजसूय यज्ञामध्ये द्यूत हा खेळ असून त्यातही यजमानाला विजयी केले जाते (कात्या. श्रौतसूत्र १५.७.१८ व पुढे) तेथेही हाच हेतू आहे. त्याचप्रमाणे राजसूय यज्ञात एक लुटुपुटीची लढाई होते. आणि त्या लढाईत यजमान आपल्या शत्रूच्या गायी जिंकतो (लाटचायन श्रौतसूत्र ९.१.१४ व पुढे; तुलना करा शतपथ-ब्राह्मण ५.४.३.१ व पुढे). येथेही खेळातील विजयामुळे प्रत्यक्ष जगात विजय मिळतो ही समजूत आहेच. विज्ञान विधीमध्येही हाच उद्देश दिसतो. अनुकूल रीतीने कौल मिळवून त्याच्या यात्वात्मक शक्तीच्या योगे प्रत्यक्ष यश मिळेल अशी समजूत विज्ञानविधींमध्ये अंतर्भूत दिसते. विज्ञानविधीमध्ये स्पर्धेचाही अंश अध्याहृत आहे. युद्धाच्या वेळी दोन्ही बाजूंकडील पुरोहित आपल्या राजाला विजय मिळेल हे सूचित करणारा विज्ञानविधी करणार. आणि ज्या बाजूला पुरोहित अधिक चांगला त्या बाजूला होणाऱ्या अनुकूलतासूचक विज्ञानविधींचा परिणाम म्हणजे जय अशी समजूत होती. त्यामुळे अधिकाधिक व चांगला पुरोहित मिळविण्याची स्पर्धा राजांमध्ये आणि अधिकाधिक अनुकूल असा विज्ञानविधी करण्याबाबत पुरोहितांमध्ये स्पर्धा होत असावी. अशा रीतीने विज्ञानविधींमध्ये क्रीडात्मक (ludic) आणि स्पर्धात्मक (agonistic) अंश असून त्यांचा उद्देश, केवळ अज्ञात गोष्टी जाणून घेणे हा नसून अज्ञात गोष्टी आपल्याला अनुकूल घडाव्यात अशा रीतीचा यात्वात्मक प्रयोग करणे हा असावा असे म्हणता येईल.

टीप आणि संदर्भ :

(१) शकुन पाहणे म्हणजे divination ह्या विषयासाठी पाहा : *J. Hastings*, *Encyclopaedia of Religion and Ethics*, IV, New York, 1959 (Reprint) p. 775 ff.; वैदिक विज्ञान विधीसाठी त्यातील पा. 827 ff. तसेच *A. Hillebrandt*, *Rituallitteratur*, Strassburg, 1897, p. 186 ही पाहा. सर्वसामान्य माहितीसाठी *A. Caquet, M. Leibovici*, *La divination*, Paris, 1968 ही पाहा.

(२) पाहा. *La divination*, p. VI.

(३) ह्या निबंधातील कौशिकसूत्राचे संदर्भ घेतांना *W. Caland Altindisches Zauberritual*, Wiesbaden, 1967 (reprint) ह्या पुस्तकातील कौशिकसूत्राच्या जर्मन अनुवादाचा उपयोग केला आहे.

(४) तुलना करा : शिवतत्त्वरत्नाकर, ६.१.३१ (म्हैसूर आवृत्ती)

(५) तुलना करा : *H. Oldenberg, Die Religion des Veda*, Berlin, 1894, p. 526, n. 4. आयुर्वेदीय ग्रंथामध्ये मरण जवळ आलेल्या माणसाला आपले प्रतिबिंब दिसत नाही असा विश्वास नोंदविला गेला आहे. पाहा : चरकसंहिता, इंद्रियस्थान ७. ३ व पुढे.

(६) खेळ याविषयासाठी पाहा : *J. Huizinga, Homo Ludens* (trans. *R. F. C. Hull*) London, 1949. पान. २४ वर खेळाची पुढील लक्षणे दिली आहेत. " खेळ ऐच्छिक क्रिया असते. ती काही विशिष्ट काल व स्थल ह्यांच्या मर्यादांमध्ये स्वेच्छेने स्वीकारलेल्या नियमांनुसार केली जाते. मात्र हे नियम खेळणाऱ्यांना पाळावेच लागतात. खेळाचा उद्देश करमणूक हा असून खेळ हे सामान्य जीवनाहून वेगळे असतात. ह्याची जाणीव खेळणाऱ्यांना असते. " मात्र येथे हेही सांगितले पाहिजे की, खेळांना यातुधर्मात्मक असाही अर्थ असू शकतो.

श्री ज्ञानदेवांच्या नावावरील काही ‘ तोतया ’ प्रकरणे

डॉ. म. प. पेठे

(भारत इतिहास संशोधक मंडळाच्या ६३ व्या वार्षिक संमेलनाच्या निमित्ताने दि. ३०–५–७५ रोजी वाचलेले टिपण).

ज्या ग्रंथाचे ज्ञानदेव-कर्तृत्व संशयातीत आहे असे ज्ञानदेवांच्या नावावरील दोन ग्रंथ म्हणजे ज्ञानेश्वरी व अमृतानुभव हे होत. वारकरी संप्रदाय या दोन ग्रंथाखेरीज चांगदेवपासष्टी, हरिपाठ व अभंगगाथा हे ज्ञानदेवांचे मानतो. मात्र अभंगगाथ्यातील काही अभंगांच्या ज्ञानदेव-कर्तृत्वाबद्दल मतभेद आहेत.

ज्ञानदेव अथवा ज्ञानेश्वर या नावाचे किंवा हे नाव धारण करणारे तीन चार कवी वेगवेगळ्या काळात होऊन गेले व त्या सर्वांच्या काव्याची सरमिसळ झालेली आहे आणि एकाच ज्ञानदेवांच्या नावावर अशा सर्व प्रकरणांची नोंद केली जाते हे चिकित्सक व भाविक अभ्यासकांना मान्य झालेले आहे.

ज्ञानेश्वराच्या नावावरील विविध ग्रंथाची व प्रकरणांची माहिती वि. ल. भावे,[१] गो. का. चांदोरकर,[२] शं. दा. पेंडसे,[३] अ. का. प्रियोळकर,[४] के. वा. आपटे[५] आदींनी दिली आहे. या ग्रंथांची व प्रकरणांची संख्या शंभराचेवर[६] जाते.

ज्ञानदेवांच्या नावावर असलेल्या प्रस्तुतच्या काही प्रकरणांसंबंधी चर्चा करून त्यांचे अ-ज्ञानदेव कर्तृत्व सिद्ध करण्याचा प्रयत्न शं. वा. दांडेकर, शं. दा. पेंडसे, अ. का. प्रियोळकर आदींनी केलेला आहे. ग्रंथकर्तृत्व ठरविण्याच्या खालील काही कसोटयांच्या आधारे त्यांनी चर्चा केलेली आहे :

(१) निर्विवादपणे ज्ञानदेवांच्या म्हणून मान्य असलेल्या एखाद्या ग्रंथात पूर्वकृत किंवा पुढे योजिलेल्या ग्रंथाचा स्पष्ट निर्देश केलेला आहे काय अथवा सूचित केले आहे काय ?

---

१. महाराष्ट्र काव्यग्रंथ शके १७४० पर्यंतचे.
२. महाराष्ट्रीय संतकविकाव्यसूचि, ११०० ते १७४० (१९१५).
३. श्री ज्ञानेश्वरांचे तत्त्वज्ञान, १९४१ अ. १२ (पृ. ३९७–४०७).
४. ज्ञानदेवांचे शंकास्पद वाङ्मय म. सं. प. ऑक्टोबर ६२ (पृ. ८९–१०६).
५. श्रीज्ञानेश्वर महाराजांची ग्रंथसंपदा, म. सं. प. जुलै ४२ (पृ. २५१–२६५)
६. श्रीज्ञानदेव वाग्यज्ञ दर्शन – १९७३ (पृ. २५८–२६१).

(२) समकालीन ग्रंथकाराने स्वतंत्रपणे अथवा ज्ञानदेव चरित्रात प्रकरणांचा उल्लेख केला आहे काय ?

(३) संबंधित ग्रंथ वा प्रकरण मूळ स्वरूपात उपलब्ध आहे काय ?

(४) ग्रंथाअखेरी ज्ञानदेवांची नाममुद्रा, कालनिर्देश आहे काय ?

(५) ज्ञानदेवांच्या ज्ञानेश्वरी अमृतानुभव या सर्वमान्य ग्रंथाशी विवादात्मक ग्रंथातील विचार, मांडणी, तत्त्वज्ञान व्यक्त करण्याची भाषा या दृष्टीने काही साम्य आहे काय ?

(६) अन्तःप्रमाण म्हणजे ज्ञानदेवांच्या ग्रंथांचे दीर्घकालीन परिशीलन करून सूक्ष्मदर्शी झालेल्या बुद्धिमंतांचे मत विवादात्मक ग्रंथाविषयी काय आहे ?

(७) एखाद्या विवादात्मक ग्रंथाबद्दल परंपराप्रामाण्य काय आहे ?

ज्ञानदेवाच्या नावावरील प्रकरणासंबंधी उलटसुलट चर्चा होऊनही मतभेद शिल्लक राहण्याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे मूळ स्वरूपात वरीलपैकी कोणताही ग्रंथ आज उपलब्ध नाही. ज्ञानेश्वरी, अमृतानुभव या सर्वमान्य ग्रंथांची मूळ हस्तलिखितेही आज उपलब्ध नाहीत व नजिकच्या काळात उपलब्ध होण्याची शक्यता नाही. अशा स्थितीत उपलब्ध होणाऱ्या हस्तलिखितांचा अभ्यास करूनच प्रकरणांचे ज्ञानदेवकर्तृत्व वा अकर्तृत्व सिद्ध करावे लागते. या अभ्यासात प्रामुख्याने जाणवणारी आणखी एक अडचण म्हणजे ज्ञानदेवांच्या नावावर सांगितली जाणारी सर्व लहानमोठी प्रकरणे, अभंग अद्यापि मुद्रित झालेले नाहीत. त्यामुळे विविध ग्रंथालयात ज्ञानदेवाच्या नावावर नोंदविल्या गेलेल्या प्रकरणांची संख्या विनाकारण वाढत गेलेली आहे. अशा काही प्रकरणांची माहिती प्रस्तुत टिपणात द्यावयाची आहे.

ज्ञानदेवांच्या नावावरील सर्व ग्रंथ व प्रकरणे यांची संगतवार यादी केली तर खालील गोष्टी लक्षात येतात.

(१) ज्ञानदेवाच्या एकाच ग्रंथाला वेगवेगळी नावे दिली गेली आहेत. ही वैकल्पिक नावे म्हणजे स्वतंत्र ग्रंथ नव्हेत, हे उघड आहे.

(अ) ज्ञानदेवी, ज्ञानेश्वरी, भावार्थदीपिका.

(आ) अनुभवामृत, अमृतानुभव.

(इ) भक्तराज, भक्तिराज.

(ई) लिखित, लेखणी, कल्याणपत्र.

(उ) अर्जुनगीता, गीतासार, प्राकृतगीता, भगवद्गीता.

(ऊ) तूर्याप्रकरण, ज्ञानदेवतेहतिशी, कृत्या, अरूपप्रकाश, ज्ञानदेवयोगमार्ग,

अपराधिष्ठान. ३४–३५ ओव्यांच्या एकाच ओवीसंग्रहाला भाविक भक्तांनी ही वेगवेगळी नावे दिलेली आहेत.

(ए) ज्ञानप्रकाश, चतुर्विधामुक्तिलक्षण.

(२) मोठ्या ग्रंथातील एखादे प्रकरण स्वतंत्रपणे लिहिले जाऊन त्याचे स्वतंत्र प्रकरण बनणे :

'योगवासिष्ठ' या ज्ञानदेवाच्या नावावरील ग्रंथातील 'प्राणसाखळी' या नावाचे प्रकरण स्वतंत्रपणे लिहिले जाऊन त्याची नोंद स्वतंत्र प्रकरण म्हणून झालेली आहे.

(३) ज्ञानदेवांच्या नावावरील काही प्रकरणांचा नुसता उल्लेख केलेला आढळतो. परंतु प्रत्यक्षात ते प्रकरण मुद्रित व हस्तलिखित स्वरूपात कुठेही आढळत नाही. उदा० परमप्रकाश, गुरुपट, अमृतसंजीवनी, अन्वयव्यतिरेक इत्यादी.

(४) नामदेवांच्या अभंगांचा चुकीने ज्ञानदेवाच्या नावावर केलेला उल्लेख. उदा० 'तीर्थयात्रा अभंग'.

(५) नामदेवांच्या 'समाधि' अभंगात ज्ञानदेवांनी नमन म्हटले अशा आशयाचे अभंग एकत्र देऊन त्याला ज्ञानदेवांचा स्वतंत्र ग्रंथ अशी संज्ञा मिळते. उदा० 'नमन'.

(६) ज्ञानदेवांच्या काही अभंगांचे संकलन करून संकलनकाराने दिलेल्या वेगळ्या नावामुळे ज्ञानदेवांच्या नावावरील स्वतंत्र ग्रंथाचे स्वरूप प्राप्त होणे. उदा० 'खेळ', 'अद्वैतनिरोपण'.

वरील प्रकरणापैकी काहींची तपशीलवार माहिती पुढे दिली आहे.

(१) अद्वैतनिरोपण :

अद्वैतनिरोपण एक लहानसे प्रकरण आहे. त्याची मूळ हस्तलिखित प्रत तंजावर येथे असून (क्र. ४०५) त्या हस्तलिखिताची केलेली नक्कलप्रत मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय (क्र. ४६८) व पुणे विद्यापीठाच्या जयकर ग्रंथालयात (क्र. ३०५३) आहे.

हस्तलिखिताची माहिती :

सुरुवात:

श्री तुलजा भवान्यै नमः अविघ्नमस्तु ।।
अवघा संसार सुखाचा करीन । आनंदे भरीन तीन्ही लोक ।। ११ ।।
जाईन गे माये तया पंढरपुरा । भेटेन माहेरा आपुलिये ।।
सर्व सुकृताचे फल लाहीन । क्षेम देईन पांडुरंगी ।। २ ।।

शेवट :

नयन तान्हेले पाजावे काई मनासि ।। खत जाले फोडावे कवणे ठाई ।। ११ ।।
औसा कोण्ही वैधामि लोकापुरता जो सुखरूप काटिया मनाचि वेथा ।। धृ ।।
निडळीची अक्षरे चुकली कान्हामात्रें ते केवि लीहिणारे शुद्ध ल्याहावी ।। २ ।।
मनाचिया बुवला पडल आले अंजन सुदले केवि राहे ।। ३ ।।

।। इदं पुस्तकं अद्वैतनिरोपण ।।

लेखकाचे नाव— दिलेले नाही, ओवी संख्या ४४.

काल दिलेला नाही. परंतु हस्तलिखित दोनशे वर्षांहून जुने नसावे.

इतर माहिती— पहिल्या २७ अभंगांनंतर 'इति श्रीगुरुशिष्यसंवादे निवृत्ती-ज्ञानदेवविरचिते अद्वैतनिरोपण संपूर्णमस्तु ।। श्री अनंत गोपाळ एकनाथ जनार्दन दत्त सदगुरु नाथार्प णमस्तु: ।।' असा उल्लेख आहे.

या प्रकरणातील ओव्या वरवर जरी चाळल्या तरी एक गोष्ट सहजपणे लक्षात येते. ती म्हणजे ज्ञानदेवांच्या नावावरील अद्वैतनिरोपण हे प्रकरण म्हणजे स्वतंत्र ग्रंथ नसून त्यांच्या अन्यत्र आढळणाऱ्या अभंगांचे व निवृत्ती व सोपानदेव यांच्या अभंगांचे संकलन आहे. या सर्व अभंगांच्या सुरुवातीला 'अनंत गोपाळ' अशी नाममुद्रा आहे.

या प्रकरणात ज्ञानदेव व निवृत्तिनाथ संवादाचे २७ अभंग व ज्ञानदेव व सोपानदेव यांच्या संवादाचे ९ अभंग आहेत. यातील ८–१० अभंगाखेरीज सर्व अभंग सकलसंत-गाथ्यात प्रसिद्ध झालेले आहेत. प्रत्येक अभंगाच्या प्रारंभी असलेली अनंत गोपाळ ही नाममुद्रा संकलनकाराची निदर्शक असून त्याने एकनाथ-जनार्दन दत्त अशी आपली गुरुपरंपरा दिलेली आहे. अद्वैताचे विवेचन करणारे ज्ञानदेव, निवृत्तिनाथ व सोपानदेव यांचे काही अभंग निवडून त्याला निवृत्ती व ज्ञानदेव कृत 'अद्वैतनिरोपण' असे नाव दिलेले दिसते. हे अभंग ज्ञानदेवांचे असले तरी या प्रकरणाचे कर्तृत्व ज्ञानदेवांकडे देण्यापेक्षा संकलनकाराकडे दिले पाहिजे.

(२) प्राणसाखळी :

ज्ञानदेवांच्या नावावरील प्राणसाखळी या प्रकरणाचे एकमेव हस्तलिखित सरस्वती महाल ग्रंथालय, तंजावर (क्र. ४०४) येथे आहे. व त्याची नक्कल प्रत मुंबई मराठी ग्रंथसंहालयात (क्र. ४७१) आहे.

हस्तलिखिताची माहिती :

सुरुवात : "हे श्रीगुरू निवृत्ती सांगती तैसा"

शेवट : ८० व्या ओवीत 'आता म्हणे ज्ञानदेव' असा उल्लेख असून 'तव ज्ञानदेव म्हणे' असे ९४ व्या ओवीत म्हटले आहे.

समाप्ती लेख : तत्सदिति योगवासिष्ठ राम संवादे प्राणसाखळीं प्रावरणनाम नवमोध्याय: ।। ईश्वर संवत्सर कार्तिक मासे । चंदाऊर ग्रामे रामजी गोपाळराये लिखित ग्रंथसमाप्त ।

लेखकाचे नाव : रामजी गोपाळ.

काल : पूर्णपणे दिलेला नाही.

ओवी संख्या ९४.

हस्तलिखिताच्या समाप्तीलेखनाचे अवलोकन केल्यानंतर एक गोष्ट लक्षात येते की, हे स्वतंत्र प्रकरण नसून योगवासिष्ट या ज्ञानदेवांच्या नावावरील ग्रंथांचा वेगळा लिहिलेला असा भाग आहे. एखाद्या भाविक भक्ताने त्याला आवडलेले हे योगवासिष्ठातील प्रकरण स्वतंत्र लिहून ठेवले असावे. निवृत्ती ज्ञानदेव संवादात्मक अध्यात्म असे या प्रकरणाचे वर्णन रामजी गोपाळ या लेखकाने केलेले असून त्याचे 'प्राणसाखळी' असे नामकरण केले असावे व ते ज्ञानदेवांच्या नावावरील स्वतंत्र प्रकरण म्हणून नोंदले गेले.

(३) ज्ञानदेवकृत तीर्थावळी :

या नावाच्या एका प्रकरणाची हस्तलिखित प्रत सरस्वती महाल ग्रंथालय, तंजावर (क्र. २४२) येथे असून त्याची नक्कल पुणे विद्यापीठाच्या जयकर ग्रंथालयात (क्र. ३०५१) आहे.

हस्तलिखिताची माहिती :

सुरुवात : श्री पांडुरंग विठ्ठल नमः । श्री गुरुभ्योनमः ।।
परंब्रह्मस परंधाम । सच्चिदानंद विग्रहं ज्ञानेश्वर इति ख्यातं प्रणमाभि गुरुं परं ।। १ ।।
नामयाचे भेटी ज्ञानदेव आले । लोटांगण घातले नामदेवे ।

शेवटची ओळ–ओवी :

हे सात्वीकाचे साधन । भोक्ते संतजन । ज्ञानदेवे पूर्ण ग्रंथ केला ।। १४ ।।

इति श्री ज्ञानेश्वर विरचितं तीर्थावळी संपूर्ण ।।

श्रीमदज्ञानेश्वरार्पणमस्तु

अनाद्यनंते वहु शांतरूपं साक्षात्परं ब्रह्मपरंपरेश श्रीमदगुरु केवल तत्वमूर्ति नमामि नित्यं शिवरामनाथ ।।

लेखकाचे नाव : दिलेले नाही.

काल : दिलेला नाही. परंतु २०० वर्षातील असावे.

ज्ञानेश्वरविरचित अशी या हस्तलिखिताची नोंद केलेली असली तरी हे ज्ञानदेवांनी लिहिलेले प्रकरण नव्हे. नामदेवांच्या तीर्थावळीचे अभंग चुकून ज्ञानदेवांच्या

नावावर नोंदले गेले असावेत. सकलसंतगाथ्यात (भाग १, आ. २, १९६७) पृ. १३६–१५७ वर क्रमाने अभंग ' नामदेवाची तीर्थावळी ' या सदरात दिलेले आहे.

(४) ज्ञानदेव–नामदेव कथा – ज्ञानदेव व नामदेवकृत :

वरील प्रकरणाचे हस्तलिखित सरस्वती महाल ग्रंथालय, तंजावर (क्र१५८२) येथे असून त्याची नक्कल प्रत पुणे विद्यापीठाच्या जयकर ग्रंथालयात (क्र. ३०५२) आहे.

हस्तलिखिताची माहिती :

सुरुवात : सुरुवातीचे पृष्ठ नाही.
४ था अभंग
हासोनी पंढरीनाथ पाहे नाम्याकडे – इत्यादी.

शेवटचा अभंग :

जे वेदाचे सार, वैराग्याचे जीवन
चिदाकासि खुण परिसा गुह्य
हे सात्विकाचे धन ।। मावले संतजनेक
केले ग्रंथ कथन ज्ञानदेवे ।। ७ ।।
।। श्रीपांडुरंगार्पणमस्तु ।।

लेखकाचे नाव : दिलेले नाही.

काल : दिलेला नाही.

या प्रकरणाचे नाव ज्ञानदेव–नामदेव कथा असे असले व ते ज्ञानदेव व नामदेवकृत असे नोंदविले गेले असले तरी हे ज्ञानदेवकृत स्वतंत्र प्रकरण नाही. हे अभंग नामदेवांच्या तीर्थावळीतील असून सकलसंतगाथ्यात छापलेले आहेत.

(५) ज्ञानदेवकृत नमन :

वरील प्रकरणाचे हस्तलिखित सरस्वती महाल ग्रंथालय, तंजावर (क्र. १६१) येथे असून त्याची नक्कल प्रत पुणे विद्यापीठाच्या जयकर ग्रंथालयात (क्र. ३०५५) आहे.

हस्तलिखिताची माहिती :

सुरुवात : श्रीगणेशायनमः नमन प्रारंभ
नमन काल कौतूहला नमो चक्र चाल गोपाळा. . . . . .

शेवटची ओवी :

बापरखुमादेवी वर । समाधि देऊनिया स्थिर ।
वरि ठेउनि अभय करु ।। वर देउनि राहिला ।। १०८ ।।
इति नमन समाप्त

लेखकाचे नाव : दिलेले नाही.

काल : दिलेला नाही.

ओव्या : १०८.

या प्रकरणाचे नाव ज्ञानदेवकृत नमन असे दिलेले असले तरी हे ज्ञानदेवकृत स्वतंत्र प्रकरण नव्हे. नामदेवकृत 'ज्ञानदेव समाधि अभंगा'चा हा भाग असून नामदेव अभंगगाथ्यात छापलेले आहे. ज्ञानदेवांच्या नावावर हे अभंग का मानले जातात हे समजणे कठीण आहे. परंतु परंपरेप्रमाणे तसे मानले जाते हे खरे. समाधी घेण्यापूर्वी ज्ञानदेवांनी नमन म्हटले ते या अभंगात नामदेवांनी वर्णन केले असून या अभंगांचे कर्तृत्व ज्ञानदेवांपेक्षा नामदेवाकडे दिले पाहिजे.

(६) खेळ ज्ञानोबा :

ज्ञानदेवांच्या नावावरील 'खेळ' या प्रकरणाचे हस्तलिखित पुणे विद्यापीठाच्या जयकर ग्रंथालयात (क्र. ४३) आहे.

हस्तलिखिताची माहिती :

सुरुवात : श्रीविठ्ठल, मृत्युलोका माझारी पायेक सद्‌गुरू साचार त्याचे दरुषणे त्रुटला हा संसार

शेवट : बापरुक्मादेवीवरे वीठलेसी भेटी आपुल्या सवेसाठी करूनी ठेली इति श्री ज्ञानोबाचे अभंग

पृष्ठे : ११.

काल : काल दिलेला नाही. परंतु वॉटरमार्क असलेल्या कागदावर हे लिहिलेले असल्यामुळे या हस्तलिखिताचा काळ दीडशे वर्षातलाच असावा.

यात ज्ञानदेवांचे १० अभंग दिलेले असून ते सर्व डॉ. प्र. न. जोशी यांच्या सार्थ श्री ज्ञानदेव अभंग गाथा (१९६९) यात छापलेले आहे. ज्ञानदेवांचे हे स्वतंत्र प्रकरण नाही हे स्पष्ट आहे. परंतु या दहा अभंगांच्या संकलनाला संकलनकाराने 'खेळ ज्ञानोबा' असे नाव का द्यावे हे लक्षात येत नाही.

ज्ञानदेवांच्या नावावर गणल्या गेलेल्या काही प्रकरणांची माहिती वर दिली आहे. अशी प्रकरणे म्हणजे तोतया प्रकरणेच होत. हस्तलिखित स्वरूपात असलेली सर्व प्रकरणे उपलब्ध होऊन ती मुद्रित स्वरूपात अभ्यासकांपुढे आली तर आद्य ज्ञानदेवांच्या नावावर असलेल्या स्फूट प्रकरणांची संख्या कितीतरी कमी होईल. आणि 'साच', 'लटिके' ओळखले जाऊन ज्ञानदेव वाङ्मयाचे खरे स्वरूप प्रगट होण्यास मदत होईल.

♠ ♠ ♠

तीन ठिकाणच्या दप्तरांतील कागदपत्रांची माहिती

सौ. सु. ना. शास्त्री

सातारा जिल्ह्यात वाई नजीक मेणवली येथे फडणीस दप्तर नाना फडणिसांच्या वाड्यात होते हे सर्वश्रुत आहे. त्यातील काही महत्त्वाची कागदपत्रे शोधून निवडून द. ब. पारसनिसांनी साताऱ्यास आपल्या संग्रही नेऊन ठेवली. त्यातील १०१ रुमाल डेक्कन कॉलेजच्या संग्रहात हलविण्यात आले. ते आज मितीस तेथेच आहेत. बाकीचे सुमारे १७,००० कागद साताऱ्यास पारसनिसांच्या संग्रही आहेत.

मेणवली येथील दप्तर :

१९७१ पर्यंत मेणवली येथे नाना फडणिसांचे दप्तर होते. त्यांची संख्या सुमारे २५० रुमाल इतकी भरेल. हे दप्तर त्यांची निगा राखण्याकरिता व संशोधकांस अभ्यासण्याकरिता नाना फडणिसांचे हल्लीचे वंशज श्री. बाबूराव फडणीस यांनी महाराष्ट्र शासनाच्या पुराभिलेख विभागाकडे कायम जतन करण्यासाठी सुपूर्द केलेले आहे. हे सर्व रुमाल सध्या मुंबई पुराभिलेखागार येथे तळमजल्यावर ठेवलेले आहेत.

बनारस येथील नाना वाड्यांतील दप्तर :

इतिहासाभ्यासूंस माहीतच असेल की, नाना फडणिसांनी आपल्या हयातीत श्रीक्षेत्र काशी येथे वाडा बांधला होता. तो आजही तेथे उभा असून तो नाना फडणिसांचा वाडा म्हणन ओळखला जातो. हा वाडा दुर्गाघाटावर दुर्गादेवीच्या मंदिरासमोर उभा आहे.

या वाड्यात जे दप्तर सापडले त्या दप्तराचे एकूण सहा रुमाल सुमारे (६ ते ७ हजार कागदपत्रे) श्री. बाबूराव फडणीस यांनी या खात्याच्या स्वाधीन केले आहेत. हे कागदपत्र 'नाना फडणीस संग्रह' म्हणून पुराभिलेख विभागाच्या अभिलेखागारांत संग्रहित केले असून ते संशोधकांना संशोधनासाठी उपलब्ध आहेत.

या माहितीवरून हे लक्षात येईल की सध्या नाना फडणिसांचे दप्तर तीन ठिकाणी आहे. पुण्याचे डेक्कन कॉलेज, साताऱ्चे पारसनीस व मुंबईस पुराभिलेख विभाग येथे हे दप्तर आहे.

पैकी डेक्कन कॉलेजमधील १०१ रुमालातील कागदपत्रांची माहिती इतिहास-संशोधक कै. आबा चांदोरकर यांनी दिलेली आहे. ती पुराभिलेख विभागाचे सध्याचे संचालक श्री. वि. गो. खोबरेकर यांनी एकत्र करून आपल्या 'महाराष्ट्रातील दप्तरखाने, या पुस्तकात पृष्ठे ७४ ते ७८ वर दिलेली आहेत.

या कागदपत्रांच्या आधारे डॉ. सासवडकर यांनी काही लेख लिहिले आहेत. प्रा. शेजवलकर यांनी या कागदपत्रातून 'नागपूर अफेअर्स' या शीर्षकाखाली दोन भाग छापले आहेत. त्यावरून या कागदांचा आशय लक्षात येतो. म्हणून साताऱ्यातील पारसनीसांच्या संग्रही असलेल्या कागदपत्रांकडे वळते.

साताऱ्च्या पारसनिसांकडील डेक्कन कॉलेजमधील कागदाशिवाय पारसनिसांच्या संग्रही मेणवली दप्तरातील कागदांचे ४२ रुमाल असून त्यातील कागदपत्रांची संख्या सुमारे १७,००० च्या वर भरेल. या कागदपत्रांचा आशय खालीलप्रमाणे :

रुमाल क्र. १ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांसंबंधीच्या चिटणीस बखरीची नक्कल, तसेच साताऱचे प्रतापसिंह महाराज यांची वंशावळ, मिळून एकंदर कागद संख्या (६६), छत्रपती शाहू महाराज व कोल्हापूरकर संभाजी यांच्यामध्ये झालेला तह, मलवडीकर घाटगे यांची कैफियत, शिवाजी महाराजांसंबंधीची सभासद बखर, तसेच औरंगजेब आणि शिवाजी महाराज यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकणारी पत्रे, औरंगजेबाचे फर्मान छत्रपती शाहू महाराज या विषयीचे कागदपत्र २ ते ४ रुमालात पहावयास सापडतात. त्यातील कागदसंख्या ३४१ भरेल. बाळाजी बाजीराव, आंग्रे, धुळप, शेख मिरा व घोरपडे घराण्यासंबंधीची पत्रे, तसेच सातारा राजा दप्तर, ग्रँट मालकम, स्मिथ, नाना फडणिसांची विधवा पत्नी जिऊबाई हिची पत्रे, तसेच बाळाजीपंत नातू यांची पत्रे रूमाल क्रमांक ५, ६ मध्ये आढळतात.

रुमाल क्रमांक ७–८ या सातारा राजा दप्तरात लॉडविक, ब्रिग्ज, रॉबर्टसन, मालकम यांचा तसेच अक्कलकोटकरांचा पत्रव्यवहार आहे. प्रतापसिंह महाराजांचे दिवाण महाजन यांची बळवंतराव भोसले यांस पत्रे, प्रतापसिंह महाराजांनी महाजनांना दिलेली सनद, अली बहाद्दर आणि विठ्ठल हरी यांची ग्वाल्हेरच्या राजकारणावरील पत्रे यांची संख्या सुमारे ७५० इतकी होईल.

बाजीराव पेशवे, चिमाजी आप्पा, आंग्रे, प्रतिनिधी, शिंदे व होळकर इत्यादींचा पत्रव्यवहार रुमाल क्रमांक ९ मध्ये असून यासंबंधी २३२ पत्रे आढळतात.

रुमाल क्रमांक १० मध्ये ५९४ कागदपत्रे असून त्यामध्ये सवाई माधवरावांची रोजनिशी (सर चार्लस् मॅलेटची रोजनिशी) आणि दुसऱ्या बाजीरावासंबंधीची पत्रे यांचा समावेश होतो. तर रुमाल क्रमांक ११ ते १३ मध्ये नाना फडणिसांचा वैयक्तिक स्वरूपाचा पत्रव्यवहार व वैयक्तिक खर्चाच्या नोंदी तसेच त्यांच्या संग्रहातील वस्तूंच्या नोंदीसंबंधीच्या कागदपत्रांची संख्या १५०० च्याही वर होईल.

राघोबादादाचे प्रकरण, इंग्रजांशी झालेले पहिले युद्ध याबद्दलचे कागदपत्र रुमाल क्रमांक १३ ते १६ मध्ये असून त्यांची संख्या २,२६०, तर रुमाल क्रमांक १८ ते २१ मध्ये परशुराम भाऊ पटवर्धन यांची पत्रे, त्यांचा सरंजाम, हरीपंत फडक्यांची

कर्नाटक मोहीम इत्यादीबद्दलचा पत्रव्यवहार पहावयास सापडतो. या सर्वांची कागदसंख्या सुमारे २,०५० च्या वर भरेल. रुमाल क्रमांक २२ ते २६ मध्ये होळकरांसंबंधीचे कागदपत्र असून त्यात त्यांच्या घराण्याची वंशावळ, यशवंतराव होळकरांचा दंगा, मल्हारराव, तुकोजी, अहिल्याबाई होळकर यांचा अस्सल पत्रव्यवहार, अहिल्याबाईंच्या संबंधी टिपणे, तसेच हरीपंत फडके, हरी रामचंद्र, विसाजी अप्पाजी, महादजी व हरी बल्लाळ, आनंदराव गंगाधर यांची विपुल पत्रे या रुमालात आहेत.

हरिपंत फडक्यांची इ. स. १७९१–९२ मधील टिपूवरील स्वारी व त्यासंबंधी वेळोवेळी केलेला पत्रव्यवहार, निजाम आणि टिपू यांचा एकमेकांवरील शह, प्रतिशह, कर्नाटक मामल्यासंबंधी टिपू, फिरंगोजी, कृष्णराव नारायण जोशी, निंबाजी माणकोजी, माधवराव सोयराजी, रामकृष्ण वासुदेव, हरीपंत फडके, महादजी चितामण इत्यादींचा पत्रव्यवहार रुमाल क्रमांक २८ ते ३२ मध्ये असून त्यांची संख्या अंदाजे २,८०० भरेल.

निजामाची गोविंदराव काळे, जयराम गोविंद, गणपतराव व्यंकटेश, सोयराजी अवधूतराव, लिंबाजी माणकोजी इत्यादींना पाठविलेली पत्रे, धोंडाजी वाघाचा दंगा, गायकवाड, आनंदराव धुळप, रघोजी आंगरे, निंबाळकर, यांचा पत्रव्यवहार तसेच पहिले मराठा-इंग्रज युद्ध यासंबंधीचा पत्रव्यवहार रुमाल क्रमांक ३३ ते ३६ मध्ये पहावयास सापडतो.

रुमाल क्रमांक ३७ मध्ये अली बहाद्दर, रघुनाथराव निंबाळकर, होळकर, नाना फडणीस, हरीपंत फडके यांनी केलेला पत्रव्यवहार व शिर्के घराण्याची वंशावळ आहे. (कागद संख्या २५६).

रुमाल क्रमांक ३८–३९ हे लेले दप्तर असून प्रतापसिंह महाराजांसंबंधीची टिपणे, वाई येथील शेख मिरा, सातारा महाराजांचा रेसिडेंटबरोबर झालेला पत्रव्यवहार, ज्ञाती प्रकरण इत्यादींवर प्रकाश टाकणारी पत्रे यात आहेत. यांची संख्या सुमारे ६०० एवढी भरेल.

बुंदेलखंड प्रकरण, झाशी संबंधीचे कागदपत्र, राजा चेतनसिंगची पत्रे, धारचे पवार, बडोद्याचे गायकवाड यांच्या संबंधीचा तसेच पोर्तुगीजाच्या दरबारी असलेला पेशव्यांचा वकील घुमे यांच्या संबंधीची मिळून सुमारे ४०० पत्रे रुमाल क्रमांक ४० ते ४२ मध्ये आहेत.

काशीच्या वाड्यातील कागदपत्रे :

ही सात रुमालात असून त्यांची संख्या ६ ते ७ हजार भरेल. ती सर्व मुंबईस आहेत हे वर सांगितले आहे. त्यातील हिशेबाचे कागद बाजूस काढता बाकीचा जो पत्रव्यवहार हाती आला त्यावरून नाना फडणिसांनी उत्तरेस श्रीक्षेत्र काशी येथे जो वाडा बांधला त्याच्या बांधकामाचे नकाशे व हिशेब कारभाऱ्याने जतन करून

ठेवलेले सापडले आहेत. तसेच श्रीक्षेत्र काशीपासून ४० मैलांवर कर्मनाशी[१] नदीवर नानांनी एक पूल बांधला. हे लोकोपयोगी काम जे केले त्या संबंधीचीही माहिती या कागदपत्रात सापडते.

दुर्गा घाटावर जो फडणिसांचा प्रचंड वाडा आजही उभा आहे त्या वाड्याचे बांधकाम शके १७१४ इ. स. १७९२–९३ मध्ये सुरू केले. नानांनी आपण श्रीक्षेत्र काशीस वाडा बांधणार आहोत असे मॅलेट या इंग्रज रेसिडेंटला कळविले होते. मॅलेटने त्या वेळचे बनारस येथील रेसिडेंट जोनाथन डंकन यांना त्याप्रमाणे कळवून वाडा बांधण्याचे काम ज्यावर सोपविले ते नानांचे काशी येथील कारभारी श्री. भास्कर कुंटे यांना कोणत्याही प्रकारच्या तक्रारीस जागा राहू नये अशी वागणूक द्यावी असे कळविले होते.[२]

हा वाडा बांधण्यासाठी नाना फडणीस स्वत: गेले असतील व आपल्या देखरेखीखाली त्यांनी हे काम पुरे करून घेतले असावे असे वाटणे साहजिकच आहे. तथापि ते खरे नव्हे. त्यावेळच्या पत्रव्यवहारात व ह्या कागदपत्रात नानासाहेब फडणीस वाडा बांधताना काशीस आले होते याबद्दलचा उल्लेख सापडत नाही. नानांना त्यांच्या कारभाऱ्यांनी दुर्गा घाटावरील जागा वाडा बांधण्यास उतम स्थळ आहे असे कळविले. जागेचा नकाशा पाठविला. आजही तो नकाशा काशी दप्तरात राखून ठेविला आहे. तेव्हा ती जागा मुक्रर करून खरेदी करविली. या जागेवर पूर्वी एक दगडी तळे व घर होते. ते खरेदी केले. तळ्यानजीकचे घर पाडले व तळे व घराचे जागेवर हा वाडा स्वत: पुण्यात बसून बांधविला. त्यासाठी त्यांनी पुण्यात त्या संकल्पित इमारतीचे नकाशे तयार करून ते आपल्या काशी येथील कारभाऱ्याकडे पाठविले. तसेच आणखी एक घर दशाश्वमेध घाटावर बांधावयाचे ठरविले. ही दोन कामे एकावेळी करावयाची ठरल्यावर नानांच्या कारभाऱ्यांनी आणखी एका प्रामाणिक विश्वासू माणसाची नेमणूक करावी असे लिहून पाठविले. त्यावरून नवीन जागेवर श्री. घांगुर्डे यांची नेमणूक करण्याची शिफारस झाली.

इमारतीचे काम सुरू झाले. ते स. १७९४ अखेर संपूर्ण झाले असे म्हणावयास हरकत नाही. या कागदपत्रात हिशेबाचे ताळेबंद इ. स. १९९३–९४ पासूनचे दरवर्षीचे राखून ठेवलेले आढळतात. तसेच सिलकबंदी, नदी कर्मनाशी, खासगत हिशेब स. १७९३ अशा शीर्षकाखाली कागद पुडक्यामध्ये बांधून ठेवलेले आहेत. तसेच भिकाजी अनंत पटवर्धन याने १७९८ मध्ये काशी मुक्त करण्यासाठी नानांस जी अनेक पत्रे लिहिली त्यांच्या नकला यांत आहेत. वाडा व पूल बांधण्यासंबंधीची बाळाजी जनार्दन यांच्या सुमारे २५ पत्रांच्या नकला या दप्तरात पहावयास सापडतात.

१. श्री. गंगामाहात्म्य, पृ. २३, कवी परशुराम बल्लाळ गोडबोले, संपादक : अ. का. प्रियोळकर.

२. P. R. C. Vol. II, L. 195.

रुमाल २ मधील कागदपत्रात विशेष माहिती मिळते ती अशी. इ. स. १७९९ मध्ये इंग्रजांनी वाड्यास भेट दिली. त्यावेळी भिकाजीपंत पटवर्धन हे नानांचे कारभारी होते. ते नानांना लिहितात की, इंग्रजांनी वाडा पहाण्याची इच्छा व्यक्त केली. वाडा पाहून ते खूष झाले. त्यांना मेजवानी दिली. त्यावर त्यांनी वस्त्रे दिली. ती घेतली नाहीत. इंग्रजांकडून बागेसाठी जागा घ्यावी असे नानांनी पटवर्धनास पत्रद्वारे सुचविले आहे.

यानंतर दक्षिणेतून काशीयात्रेस जाणाऱ्या यात्रेकरूंची व्यवस्था करणे, तसेच हुंड्या पटविणे, लोकांकडील येणे वसूल करणे, घराच्या कारखान्याच्या ताळेबंद व हिशेब ठेवणे, वगैरेसंबंधीचे कागद व हरिवंश पुराण, आर्याभारत, गदापर्व इत्यादी पोथ्यांची यादी या संग्रहात आहे.

इचलकरंजीकर, पंत सचीव यांनी केलेल्या काशीयात्रा, तसेच त्यांची उत्तर खंडाची यात्रा, ज्वालामुखी, खलेश्वर व बद्रिकेदार, गंगोत्री करून श्रीकाशी क्षेत्री १६ महिन्यांनी परत आल्याचे इ. स. १८२५ च्या पत्रात नमूद केले आहे. तसेच गंगोत्री कावड आणली ती रामेश्वरास अर्पण करावी असा आपला मनोदय त्यांनी पत्रात व्यक्त केलेला आढळतो.

इ. स. १८४७ च्या एका यादीमध्ये काशीहून अष्टमुखी रुद्राक्ष, मूर्ती करण्याकरिता शालिग्राम शीळा, स्फटिकाची शिळा इ० जिन्नस आणण्याकरिता लिहिले आहे.

इ. स. १८४८ मध्ये गंगाबाई माई इचलकरंजीकर या महायात्रेस आल्या असून चार्तुर्मासात श्रीक्षेत्र काशी येथे राहणार असल्याने त्यांना वाड्यात रहावायची व्यवस्था करण्याबद्दल, गंडकी व स्फटिक शिळा पाठवून देण्याबद्दल जे पत्र उद्धृत केले आहे त्या जिनसा मिळाल्याचे २१ एप्रिल १८४४ चे पत्रही यात आहे. त्या पत्रात कारभारी गोखले लिहितात की, श्रींच्या अभिषेकार्थ स्वामीकरिता श्रीगंगाजल भरून मणिकर्णिका पाठविली आहे. अशा प्रकारचा तुरळक पत्रव्यवहार असलेली सुमारे २०० पत्रे व खासगत खर्चाच्या हिशेबाचे ताळेबंद या दप्तरात आहेत.

मेणवली येथील दप्तर

नाना फडणिसांना एकंदर इनाम गावे २८ होती. त्या इनाम गावासंबंधीच्या हिशेब, याद्या वगैरे त्यांच्या वंशजांनी राखून ठेवलेला आढळतो. मेणवलीहून जे सुमारे २५० रुमाल मुंबई येथील दप्तरखान्यात निरंतर राखण्याकरिता सूपूर्द केले गेले त्यात त्यांच्या या इनाम गावाच्या उत्पन्नाच्या हिशेबाचे कागद जास्त आहेत. त्यात महत्त्वाचा पत्रव्यवहार असण्याचा संभवही आहे. तो शोधून काढण्याचा प्रयत्न नजीकच्या काळात होईल आणि या विभागासंबंधीची सविस्तर माहिती पुढील खेपी मी ठेवण्याचा प्रयत्न करीन.

♠ ♠ ♠

लीळाचरित्राचा शब्द-संग्रह : काही विशेष

सु. श्री. कानडे

चक्रधरांचा निष्ठावंत भक्त म्हाइंभट याने लिहिलेल्या लीळाचरित्राचे महत्त्व अनेक दृष्टींनी आहे. प्राचीन मराठीतील आद्य गद्यचरित्रग्रंथ म्हणून लीळाचरित्राला अनन्यसाधारण अशी थोरवी लाभलेली आहे. तत्कालीन समाज-जीवनाशी बारीकसारीक अंगोपांगे तपशीलवार नमूद करणारा वाङमयीन आधार म्हणूनही लीळाचरित्राचे स्थान एकमेवाद्वितीयम् असेच आहे. धार्मिक आणि सामाजिक या क्षेत्राप्रमाणेच लीळाचरित्रामुळे प्राचीन मराठीच्या भाषिक अभ्यासासाठीही विपुल आणि विश्वसनीय अशी सामग्री उपलब्ध झालेली आहे. या काळातील विविध पंथीय लेखकांनी जे ग्रांथिक किंवा स्फुट स्वरूपाचे लेखन केले त्यांच्या अस्सल संहिता आज आपल्या हाती नाहीत. वाङमयाच्या भाषिक अभ्यासात ही एक फार मोठी उणीव आहे. लीळाचरित्राची रचना ज्या काळात झाली त्यावेळची मूळ संहिता नष्ट झाली तरी नंतरच्या काळात लीळाचरित्राचे जे पुनर्लेखन झाले तेही पंथीय भक्तमंडळींनीच केलेले असल्याने त्या संहितेचेही भाषिक दृष्टींनी अपार महत्त्व आहे. या गद्यशैलीची जी अनेक वैशिष्टचे आहेत ती आजच्या रसिक वाचकालाही तन्मय करणारी आहेत. याचबरोबर लीळाचरित्राची भाषिक पहाणीही भाषाशास्त्राच्या अभ्यासकाला उपयुक्त ठरल्याशिवाय राहत नाही. प्रस्तुत टिपणामध्ये लीळा-चरित्राच्या शब्दभांडाराचे अध्ययन केल्यानंतर त्याची जी वेगवेगळी वैशिष्टचे दृष्टीस पडतात त्यातील काहींचा विचार केलेला आहे.

यादवकालीन मराठीत जे गद्य-पद्य ग्रंथ निर्माण झाले त्यापैकी ज्ञानदेवलिखित ज्ञानेश्वरीच्या शब्द-भांडाराचे आजवर अनेक पंडितांनी संकलन आणि समीक्षण केलेले आहे. लीळाचरित्राची शब्दसंपत्ती समृद्ध असूनही तिचा मात्र ज्ञानेश्वरीप्रमाणे चिकित्सक दृष्टीने सांगोपांग अभ्यास झालेला नाही. डॉ. शं. गो. तुळपुळे यांनी लीळा-चरित्राचे पाच भागात संपादन केलेले आहे. आणि या भागाच्या प्रस्तावनांतून लीळाचरित्रातील शब्दांची काही उल्लेखनीय अशी वैशिष्टचे सांगितली आहेत. शब्दांची पद्धतशीर वर्गवारीही या प्रस्तावनातून केलेली आहे. परंतु हा शाब्दिक अभ्यास मुख्यत: वाङमयीन दृष्टीने केलेला आहे. भाषाशास्त्रीय भूमिकेतून यादव-कालातील शब्दसंग्रहाचा परामर्श घेण्याचा प्रयत्नही डॉ. तुळपुळे[१] यांनीच आपल्या 'यादवकालीन मराठी भाषा' या ग्रंथात तपशीलवारपणे केलेला आहे. डॉ. तुळपुळे

---

१. भाग १.१९, यादव मराठीचा शब्दसंग्रह, पृ. ६७-११७.

यांचा हा शब्दसंग्रहविचार साधार व चिकित्सक स्वरूपाचा असला तरी समग्र यादवकालाचा व्याप त्यांच्या नजरेसमोर असल्याने केवळ लीळाचरित्राच्या सूक्ष्म अभ्यासाला त्यात स्थान मिळणे शक्य नव्हते आणि ते अपेक्षितही नव्हते.

लीळाचरित्रात तत्सम, तद्‌भव आणि इतर अशा शब्दांचे जे प्रमाण त्यांची पहाणी करून डॉ. तुळपुळे[2] यांनी असा निष्कर्ष काढला की, त्यात तत्सम शब्दाचे प्रमाण शे. २२, तद्‌भव शब्दांचे प्रमाण शे. ८० आणि इतर शे. ३ असे आहे. हेच प्रमाण सामान्यतः ज्ञानेश्वरीसारख्या नागर पद्यग्रंथात असल्याचे दिसून येते.[3] याचा अर्थ असा की, लीळाचरित्राचे लेखन झाले त्या काळातील मराठी गद्य-पद्य ग्रंथाचे स्वरूप हे खऱ्याखुऱ्या मऱ्हाटी वळणाचे होते.

तत्सम शब्द

संस्कृत शब्द-संग्रह हा मराठीने नेहमीच आपला मानलेला आहे. निरनिराळ्या शास्त्रातील पारिभाषिक शब्दांची योजना करताना मराठी अभ्यासकांनी संस्कृतचाच मागोवा घेतलेला आहे. अगदी आजच्या काळातही संस्कृतचे हे ऋण मान्य केले पाहिजे. लीळाचरित्रातील लीळांचे संग्रह विविध थरातील चक्रधर-शिष्यांच्याकडून गोळा झालेला असला तरी त्याला अखेरचे रूप देताना नागदेवचार्यांचा हात त्यावरून फिरला असावा. स्वतः म्हाइंभट ही चांगला व्युत्पन्न होता. या दोघांचा परिणाम होऊन लीळाचरित्रात तत्सम शब्दांना भरपूर स्थान प्राप्त झालेले आहे. त्यातील काही शब्द आजच्या ग्रांथिक मराठीत किंवा पांढरपेशांच्या व्यवहारात प्रचलित असले तरी काही शब्द आता लुप्तप्राय झालेले आहेत हेही ध्यानात ठेवले पाहिजे. उदा०—

संध्यावंदन (पू. २६), पृथकाकार (पू. ४४), संहिताक्रम (पू. ७३), भांडारी (पू. ७५), प्रसाददान (पू. १७६), उष्णोदक (पू. २३२), उपविष्ट (पू. २५५), सेवादास्य (उ. २६), ज्वर (उ. ७५), दुखरूप (कष्टपूर्वक, ३. ७५), तिर्यंचत्व (पशुत्व, उ. ९७), उपन्यास (उ. ११३), अनृत (उ. १९९).

तद्‌भव शब्द

तत्सम शब्दातून प्राकृत अपभ्रंशाच्याद्वारा मराठीत तद्‌भव शब्दांचा एक मोठा वर्ग निर्माण झाला. सोपेपणाकडे प्रवृत्ती असणे हा प्रत्येक भाषेचा एक सहजधर्म आहे. त्याचाच परिणाम म्हणून मूळ शब्दांची रूपे भ्रष्ट होऊन त्यांचे उच्चारण्यास सुलभ असे पर्याय मराठी भाषेत निर्माण होत असतात. लीळाचरित्राचे संकलन आणि नंतर लेखन झाले त्यावेळी मराठी गद्यरचनेला नुकताच कोठे प्रारंभ झाला होता. कोरीव लेख किंवा ताम्रपट यातून गद्य रचना आढळली तरी ग्रंथरचना सुरू झाली

२ व ३. यादवकालीन मराठी भाषा (दुसरी आवृत्ती) पृ. ६८, ६९.

म्हणजेच भाषेला स्थैर्य प्राप्त झाले असे म्हणता येते. मराठी गद्याचे असे आद्यतमस्वरूप लीलाचरित्रातच प्रथमतः दृष्टीस पडते. डॉ. तुळपुळे[४] यांनी काढलेला याबाबतचा निष्कर्ष पाहिला म्हणजे यादवकालीन ग्रंथात तत्सम शब्दापेक्षा तद्‌भव शब्दांना जवळजवळ चौपट स्थान मिळाल्याचे दिसून येते. तद्‌भव शब्दांची काही उदाहरणे :

वहाण (सं. उपानह् पू. १), तांबोळ (सं. तांबूल, पू. ११), पसीम (सं. पश्चिम, पू. १९), पुरुख (सं. पुरुष पू. ९८), कशमळ (सं. कश्मल, पू. १२६), ईखीत (सं. ईषत् पू. १४८), रान (सं. अरण्य, पू. १७३), भीतरी (सं. अभ्यंतर, पू. १८८), टिळा (सं. तिलक, पू. २६२), अग्रर (सं. अग्रहार उ. ६), क्रीमी (सं. क्रमि उ. ६४), रगत (सं. रक्त, ३. १०८), अखतीज (सं. अक्षयतृतीया, उ. १२०).

देशी शब्द

ज्या शब्दांचे व्युत्पादन संस्कृत वा अन्य भाषांच्या द्वारा होऊ शकत नाही अशा प्राचीन शब्दांना "देशी" म्हटले जाते. देशी शब्दांची निश्चिती करणे मात्र अवघड आहे. कारण हेमचंद्राने आपल्या "देशीनाममालेत" प्रचलित देशी शब्द एकत्रित करण्याचा उल्लेखनीय असा प्रयत्न केलेला असला तरी त्या यादीतील अनेक शब्दांचे मूळ संस्कृत किंवा द्रविडी या वर्गात शोधण्याचे प्रयत्न झालेले आहेत.[५] तथापि निर्विवादपणे ज्यांना देशी म्हणता येतील असे घोडा (पू. २१०), डाहाळी (पू. २३१), बोट (पू. २३३), पोट (पू. २३६) काही शब्द लीळाचरित्रात दाखविता येतात.

फारसी शब्द

महाराष्ट्रात मुसलमानी अंमल प्रस्थापित होऊन फारसीचे जोखड १४ व्या शतकापासून मराठीच्या मानगुटीवर बसण्यास प्रारंभ झाला हे ऐतिहासिक सत्य असले तरी व्यापारी दळणवळणाच्या निमित्ताने अरब आणि इतरांचा महाराष्ट्राच्या किनाऱ्यालगतच्या लोकांशी संबंध आलेला होता. आणि त्यांच्या संपर्काने प्राचीन मराठी शिलालेखातून मुसलमानी व्यक्तिनामे आणि इतरही शब्द येण्यास सुरुवात झालेली होती. पुढील कालखंडातील काही महानुभाव पद्य ग्रंथातून फारसी शब्द आलेले आहेत. शब्द स्वरूपातील फारसीचे ऋण अत्यल्प असले तरी त्या परकीय भाषेनें मराठी भाषेच्या गद्य पद्य ग्रंथातून चंचुप्रवेश केलेला होता. ही गोष्ट नजरेआड करता येत नाही. लीळाचरित्र मात्र ज्ञानेश्वरीप्रमाणेच या फारसी संपर्कापासून अलिप्त राहिलेले दिसते.

---

४. यादवकालीन मराठी भाषा, पृ. ६९.

५. यादवकालीन मराठी भाषा, पृ. ७७.

कानडी शब्द

मराठीच्या उदयापासूनच भाषाभगिनी म्हणून कानडीचा तिच्याशी संबंध आलेला आहे. राजकीय दृष्टीने मराठी भाषिक आणि कन्नड भाषिक अनेक वर्षे एकाच राजवटीचे प्रजाजन असल्याने या भाषांची विविध प्रकारे देवाणघेवाण चालू झालेली होती. साहजिकच यादवकालीन ग्रंथात कन्नड शब्द बऱ्याच संख्येने प्रविष्ट झालेले दिसतात. हे शब्द स्वाभाविकपणे आणि मंद गतीने आलेले असल्यामुळे कन्नड शब्दांच्या अतिरेकामुळे मराठीचे शब्द-क्षेत्र दूषित झाले असे मात्र कधीच वाटले नाही. निसर्गनियमाचे दोन शेजारभाषेत जी देव-घेव चालू असते तेवढचाच या दोन भाषांच्या सहज-संबंध आलेला आहे. या संबंधातूनच लीळाचरित्रात टोपर (पू. १), गुढी (पू. ३०४), मुडी (पू. ३०९), गुंडा (उ. ७२), असे कानडी शब्द आलेले दिसतात. हाट (कन्नड हट्ट) या तद्‌भव शब्दाच्या साहाय्याने हाटदार (पू. २२१) हाटद्वार (पू. २१९) किंवा हाटग्रह (पू. २२१) असे संयुक्त शब्द तयार झालेले दिसतात.

समकालीन शब्द

लीळाचरित्राचा शब्दसंग्रह पाहिला आणि त्याच काळात आगेमागे निर्माण झालेल्या मराठी ग्रंथातील शब्द संपत्तीशी त्याची तुलना केली म्हणजे दोन विशेष लक्षात येतात. पहिला विशेष म्हणजे लीळाचरित्रातील काही शब्द हे त्या काळातील सर्वमान्य असे शब्द आहेत. त्या शब्दांचा प्रसार हा सर्वत्र झालेला आहे ते शब्द जसे गद्य ग्रंथात येतात तसेच पद्य-ग्रंथातून आढळतात. तत्त्वज्ञानात्मक ग्रंथात जसे दिसतात, तसेच ते चरित्रात्मक ग्रंथातूनही आढळतात. याउलट काही शब्द हे मुख्यत: लीळा-चरित्रातच आलेले दिसतात. समकालीन अन्य ग्रंथातून ते आढळत नाहीत. याचे कारणही सहज समजू शकेल. पारमार्थिक स्वरूपाच्या ग्रंथाचा आशय ठरलेला असतो. तो व्यक्त करण्याची आणि समजावून सांगण्याची पद्धतही विशिष्ट प्रकारची असते. आणि मुख्य म्हणजे त्यात प्रतिबिंबित होणाऱ्या समाजजीवनाचा व्याप केवळ पार-मार्थिक अंगापुरता मर्यादित असतो. याउलट चरित्रग्रंथातून समाजाच्या सर्व थरातील कमी अधिक योग्यतेच्या स्त्री-पुरुषांच्या आठवणी येत असल्याने त्यातील जीवनदर्शन सर्वस्पर्शी स्वरूपाचे असते. पारमार्थिक अंगाबरोबरच व्यावहारिक जीवनाच्या अंगोपांगांनाही त्यात स्थान मिळते. साहजिकच त्यातील शब्दसंग्रह सर्व क्षेत्रातील असणे अपरिहार्य असते. अशा दोन्ही प्रकारची काही उदाहरणे :

लीळाचरित्राखेरीज इतरत्र न आढळणारे शब्द

कुटणे (लंगडत चालणे, उ. १५३, ४१९)
कुणकुणणे (थंडीने कुडकुडणे, उ. २०४).
कोर (तुकडा, पू. ५६, ३.२७)

खडखांवुला (एक खेळ, पू. ३१)
थिवणे (ठिवकणे, पू. १७६)
दुनवंगी (दुहेरी घडी, पू. १८९)
देवस्व (देवविषयक आचार, पू. १५८)
धिडरे (पू. २८७)
नीसूर (स्तब्ध, उ. २९)
परिच्छेद (इंद्रियनिग्रह, उ. ४५६)
परिपळ (धावपळ करणारा, उ. २१९)
पाउडे (फावडे, ए. ११)
पाराखोळा (शौचकूप, उ. ४०६)

इतरत्र आढळणारे शब्द

आरोगण-णा (ए. ९, वछा. २४६, ज्ञा. ९.२२९)
कापडी (पू. ३५१, ज्ञा. ६.१५३)
कुचि–टाळे (किल्ली व कुलूप, शिशु. ४२०, नरुस्व. ५०६)
कुपी (३.३४८, नरुस्व. ४६, मूर्ति ६२०)
गुळ्ळा (चूळ, मू. ५, ज्ञा., मूर्ति. २२९४)
गोमटे (ए. ४४. स्मृ. १२५, उद्धव. ५१९, शिशु ४०२, ज्ञा. १४.२६)
दांडी (पालखी, ए. १५, शिशु. २३४, ज्ञा. ७.१६६)
नाचणी (नर्तिका, पू. २०, नरुस्व. १०५, ज्योपि. १८४, ज्ञा. ९.३२०)
पढिया (आवडता, पू. १३४, वछा. ४७, ज्ञा. ६. ११३)
पत्रशाक (पालेभाजी, पू .६३ स्मृ. १०७, मूर्ति. २२७५)
पहुडणे (ए. ३६, शिशु. ११२, मूर्ति १४११, ज्ञा. १५, ४५७.)

शब्दांचे सातत्य

भाषेतील काही शब्दांचा वापर हा सार्वकालीन असतो. एकदा तो शब्द भाषेत प्रविष्ट झाला म्हणजे नंतरच्या सर्व अवस्थातून व त्याचे अस्तित्व कायम राहिलेले नसते. भाषेतिहासात ठराविक काळातच प्रचलित असणाऱ्या शब्दांच्या तुलनेने या शब्दांना एक प्रकारे अढळपद प्राप्त झालेले दिसते. नवीन भाषांच्या संपर्काने नवीन शब्द भाषेत येतात, तरी अशा शब्दांचे स्थान सदैव कायम राहिलेले दिसते. घरातील नित्याच्या वापराच्या काही वस्तू, खाद्य पदार्थ, नातेवाचक शब्द, शरीरावयवदर्शक शब्द, संख्यावाचक शब्द, वस्त्रे इ० वर्गातील अनेक शब्द हे लीळाचरित्राच्या काळापासून म्हणजे तेराव्या शतकापासून आजच्या विसाव्या शतकापर्यंत मराठीत अव्याहत रुळलेले असल्याचे दिसून येते. उदा०,

तूप, कणिक (पू. २७), तेल (पू. ३२४), दूध, भात, लाडू, पोळी, भाकर, वरण (पू. २८७), लोणिचे (उ. ८२).

पायपुसणे (पू. २), झोळी (३.१११)

हनुवटी (पू. १९) गुडघा (३.९), तोंड, पोट (उ. १०), हात (३.११), कोपर (३.१५), कपाळ (३.२४), जीभ (३.६८०).

भाऊ (पू. १०८), (लेकी ३.७६)

पासोडी (पू. १२), लुगडे (पू. २१), घोंगडे (पू. ९१), चोळी (३.८३), धोत्र (३.३७५).

संकीर्ण शब्द

आंगण (३.५४), देऊळ (पू. २९), वड, पिंपळ (पू. ४०), डोंगर (पू. ४७), वासरू (पू. २०२), केळे, बोर (३.१२), उन्हाळा (३.१४).

वरील शब्द ज्या स्वरूपात रूढ होते त्याच स्वरूपात ते आजच्या मराठीतही रूढ आहेत. परंतु काही शब्दांच्या बाबतीत मात्र थोडाफार फरक झाल्याचे आढळून येते. म्हणजे भाषेने हे शब्द आजही जपून ठेवले आहेत. परंतु त्या शब्दांचे तत्कालीन बहिरंग थोडेसे पालटलेले अर्थ तोच आहे. रूप मात्र किंचित बदलले आहे. उदा०,

नारळ (नारीएळ, पू. १८), चार (च्यारि, पू. ३०), वाळवंट (वाहाळुवंट, पू. ९१), प्रसिद्धी (प्रसिध, पू. १३४), शिवी (सवी, पू. १७६), ओंजळ (आंजुळी, पू. १८६), शेतकरी (सेतकरी, पू. १९९), दिरडे, (धीरडे, पू. १९९), बिऱ्हाड (बीढार, पू. २००), शिंक (सिंक, २३८), शेगडी (सगडी, पू. ३१७), चवाढा (चोहटा, ३.२०), शिंपी (सी.पा, ३.३०), वीट (इट, ३.५५). बाभळ (बाबुळ, ३.७८), अडीचशे अढैचशे (३.१०७), अजून (आझुइं, ३.१०९), नातवंड (नातोंड, ३.१९०), भावंड (भावांड, ३.१९०).

काही शब्दांच्या बाबतीत आणखी थोडासा वेगळा प्रकार आहे. ते शब्द आजच्या ग्रांथिक मराठीतून किंवा सुशिक्षितांच्या बोलण्यातून लुप्त झालेले आहेत. मात्र ग्रामीण समाजाच्या बोलीत मात्र हे शब्द अद्यापी टिकून राहिलेले दिसतात. म्हणजे त्यांचे क्षेत्र भिन्न व विशिष्ट असले तरी त्यांचे अस्तित्व आजच्याही मराठी भाषेत आहे असे निश्चितपणे म्हणता येते.

दीठी (पू. २), जाडी (पू. १२), वीकरा (पू. २७), कवाड (पू. ४३), डोई (पू. ४८), पाइक (पू. १५४), वीख (पू. १७१), ठाणवें (पू. १७१), रगटें (पू. १७३), सोजी (पू. १९६), घरधनी (पू. २२२), वरीस (३.१), पालखती (३.१५), सांडोवा (३.१६), अवंतिणे (३.६६), हाकारा (३.६७), भेली (३.११९), वाडवेळ (३.८५), अवंदा (३.२०४), जगरें (३.२२३).

शब्दलोप

त्यावेळचे काही शब्द मात्र काळाच्या ओघात आज पूर्णपणे विस्मृत झालेले आहेत. त्यातील काही पुढच्या मध्ययुगीन वाङमयात तुरळक कोठे आले आहेत, तथापी आजच्या भाषिक व्यवहारातून ते सर्वस्वी बाहेर फेकले गेले आहेत त्यात संदेह नाही. शब्दांचा लोप होण्याची कारणे अनेक असू शकतात. नाविन्याच्या सनातन आवडीमुळे भाषेत नव-नवीन शब्दांची घडण होत असते. त्याचप्रमाणे शेजारच्या भाषेतून काही शब्दांची भर पडत असते. काही वेळी राजकीय परिस्थितीही कारणीभूत होते. परकीय राजवटीच्या स्थापनेबरोबर परभाषा राजभाषेच्या पदावर अधिष्ठित होते आणि स्वभाषेचे त्या मानाच्या जागेवरून उच्चाटण झाले म्हणजे परकीय शब्दही मूळच्या शब्दांची हकालपट्टी करीत असतात. अशा निरनिराळ्या कारणांमुळे लीळाचरित्रातील जे शब्द आज लुप्त झालेले आहेत, त्यांपैकी पुढील शब्दांचा उदाहरणादाखल निर्देश करता येईल :

मढ (देऊळ, पू. १), तांबवटी (तांब्याची लोटी पू. २९,) पोपळ फोडना (अडकित्ता, पू. ३८), कीड्डी (तिरडी, पू ४३), आंगी (अंगातील बंडी, पू. ४६). अवडळ (नाठाळ, पू. १००), बडुवा (पुजारी, पू. १०४), आरोगण (जेवण, पू. १९९), धांडाळ (उपद्‍व्याप, उ. १), घरवात (संसार, उ. १), कोढळें (तेलाचे भांडे, उ. ६), जळांत पाणी (अत्यंत खोल पाणी, उ. १६), गळदंडा (गळ्यातील पुष्पहार, उ. ४८), बाहीखास (उपरणे, उ. ८२), साउलें (रेशमी वस्त्र, उ. ८३).

अर्थान्तर झालेले शब्द

काही शब्दांचे जसे बहिरंग बदलले किंवा काही शब्द सामाजिक व्यवहारातून नाहीसे झाले, त्याचप्रमाणे त्यांच्या अंतरंगात बदल झाला असेही अनेक शब्द दृष्टीस पडतात. वेगवेगळ्या आघात-प्रत्याघातांनी समाजरचना जशी हळूहळू पण निश्चितपणे बदलत असते, त्याचप्रमाणे शब्दांच्या बाह्य स्वरूपाबरोबरच, त्याचे अंतःस्वरूपही क्रमशः बदलत असते. म्हणजेच त्यांच्या अर्थामध्ये भिन्न भिन्न परिवर्तने होत असतात. मूळच्या अर्थाचा विचार होतो किंवा अर्थ संकुचित पावतो, मूलार्थाला अधिक गौरवपर अशी अर्थाची छटा प्राप्त होते, तर मूळच्या चांगल्या अर्थालाच हीनार्थाचे स्वरूप प्राप्त होते. भाषेच्या इतिहासात हे आणि अशा प्रकारचे जे शब्दार्थविषयक फेरफार होत असतात ते लीळाचरित्राच्या बाबतीतही घडून आलेले आहेत. लीळाचरित्रातील पुढील काही उदाहरणे तपासली म्हणजे यादवकालामध्ये या शब्दांचा कोणता अर्थ अभिप्रेत होता आणि आज त्याच अर्थामध्ये कसे परिवर्तन घडून आलेले आहे त्याची कल्पना येईल.

शब्द	तत्कालीन अर्थ	आजचा अर्थ
आसन (पू. ६)	चक्रधरांचा एखाद्या गावी काही काळ मुक्काम	बैठक
वसति (पू. ४०)	चक्रधरांचा एखाद्या गावी रात्रभर मुक्काम	वास्तव्य, विशिष्ट लोकसमूह.
अवस्थान (पू. १९९)	चक्रधरांचा एखाद्या गावी काही दिवस मुक्काम	
स्थिती (पू. ११५)	या पंथीयाला प्राप्त झालेली क्षणिक समाधी–सुखाची अवस्था	परिस्थिती, अवस्था
उपहार (पू. ७)	भोजन	भेट
एको वासना (पू. ३१)	एक मत,	विषय वासना, अभिलाषा
कामठ (पू. २२२)	व्यवसायाचे ठिकाण	रस, कर्मस्थान
दाम (पू. ३८)	विशिष्ट किंमतीचे नाणे	पैसा, किंमत
भागवत (पू. ४१)	भक्तिपद गायन करणारा	भागवत संप्रदायी
न्हाणे (उ. २१७)	स्त्री-पुरुषांचे स्नान	केवळ स्त्रियांचे स्नान
बटिक (पू. १२९)	शिष्य	दासी
गुंफा (उ. १०)	झोपडी	साधू पुरुषांची पर्णकुटी
राज्य करणे (उ. २)	काळ कंठणे, वास्तव्य करणे	राज्यकारभार चालविणे.
व्यापार (उ. १३)	कार्य, काम	धंदा, उद्योग
ब्राह्मणी (उ. ५३)	पत्नी	ब्राह्मण स्त्री
मुकुट (उ. ७४)	मस्तक (केवळ चक्रधरांच्या संदर्भात)	मुगुट
ढेप (उ. ८२)	(भाताची–) मूद, ढीग	केवळ गुळाचा खडा

तद्‌भव शब्दांचे पुन्हा संस्कृतीकरण

तत्सम शब्दांचे बाह्यरूपात बदल घडून त्याचे तद्‌भवीकरण ही सर्वरूढ प्रक्रिया झाली. म्हणून मराठी शब्दसंग्रहांच्या बाबतीत एक विशेष प्रक्रिया सतत वर्षानुवर्षे चालू आहे. ती मराठीच्या अगदी प्रारंभीच्या अवस्थेतही चालू होती आणि आजही चालू आहे. सुलभीकरणाच्या भूमिकेतून तत्सम शब्दांचे तद्‌भव स्वरूपात परिवर्तन घडून आलेले असले तरी प्रौढ, नादमधुर आणि ठसठशीत शब्दांच्या हव्यासाने आणि संस्कृतला धर्मभाषा, शास्त्रभाषा आणि ज्ञानभाषा म्हणून जे अढळस्थान प्राप्त झालेले होते त्याच्या प्रभावाने मराठी भाषिकांनी पुन्हा पुन्हा आपला मोहरा मूळ तत्सम शब्दांकडे

वळविलेला दिसतो. काही शब्दांच्या बाबतीत तत्सम शब्दांबरोबर तद्भव शब्दही वापरात आलेला दिसतो. तर काही वेळा तद्भव शब्द लुप्त होऊन केवळ तत्समच रूढ झालेला दिसतो. प्राकृताकडून अपभ्रंशाकडे आणि अपभ्रंशातून मराठीकडे येतांना अनेक शब्दांची अशा वैशिष्ट्यपूर्ण रीतीने म्हणजे तद्भवाकडून तत्समाकडे वाटचाल झालेली दिसते. मधुर (महुर), मुह (मुख), पद्म (पउम), नदी (णई) इत्यादी उदाहरणे पाहिली म्हणजे मराठीने आपल्या प्रारंभीच्या काळापासूनच काही तद्भव शब्द बाजूला ठेवून तत्सम शब्दांचाच वापर केलेला दिसतो. आणि लीळा-चरित्रातील काही शब्दांची आजची रूपे पाहिली तर ही संस्कृती-करणाची प्रक्रिया मराठीच्या पुढील कालखंडातही कशी अव्याहत चालू होती तिचा प्रत्यय येतो.

लीळाचरित्रांतील तद्भव शब्दरूप	आजचे तत्सम शब्दरूप
पस्याताप (पू. ११७)	पश्चात्ताप
सिख्य (पू. ११८)	शिष्य
दीस (पू. १२२)	दिवस
वेख (पू. १३१)	वेष
असक्ष (पू. १३२)	अशक्य
वेवहार (पू. १४५)	व्यवहर
सौंदर (पू. १७६)	सुंदर
हरिख (पू. १७६)	हर्ष
वोषद (पू. १८३)	औषध
वरीस (उ. १)	वर्ष
अन (उ. २)	अन्न
व्याम (उ. ११)	व्यायाम
दरिसन (उ. ११)	दर्शन
श्राध (उ. ११)	श्राद्ध
भगति (उ. ११)	भक्ती
वीस्यो (उ. १६)	विस्मय
पसीम (उ. ५१)	पश्चिम
पाखाण (उ. १०९)	पाषाण
जुगुति (उ. २२०)	युक्ती

१. प्रस्तुत लेखासाठी डॉ. शं. गो. तुळपुळे यांनी पाच भागात संपादित केलेली आणि सुविचार प्रकाशन, पुणे यांनी प्रकाशित केलेली लीळाचरित्राची आवृत्ती आधार-भूत म्हणून घेतलेली आहे.

२. लेखातील संक्षेप चिन्हांचा खुलासा :

ए. – लीळाचरित्र, एकांक
पू. – लीळाचरित्र, पूर्वार्ध
उ. – लीळाचरित्र, उत्तरार्ध
शिशु. – भास्करभट्टकृत शिशुपालवध
नरुस्व. – नरेंद्रकृत रुक्मिणीस्वयंवर
मूर्ति. – केशीराजकृत मूर्तिप्रकाश
वछा. – दामोदर पंडितकृत वछाहरण
स्मृ. – स्मृतिस्थळ
उद्भव – भास्करभट्टकृत उद्धवगीता
ज्ञा. – ज्ञानेश्वरी.

दासोपंतांचे गीतार्णव : एक अध्ययन

डॉ. श्री. दा. चितळे

मराठीचे आद्यकवी मुकुंदराज यांच्या मराठवाड्यातील अंबाजोगाई नगरीत प्रसिद्ध संतकवी दासोपंत यांनी आपली काव्यसंपदा निर्मिली. दासोपंतांचा कालखंड इ. स. १५५१–१६१५, म्हणजे शिवजन्माच्या अगोदर १५ वर्षे ते निवर्तले. ते शहाजीराजांचे समकालीन होत. मालोजी, शहाजी, शिवाजी, पेशवे व निजाम यांनी दासोपंतांच्या घराण्याला दिलेल्या सनदा त्यांच्या वंशाजवळ उपलब्ध आहेत. मराठी वाङमयात गेल्या ३०० वर्षांत दासोपंतांच्या इतकी अफाट काव्यनिर्मिती कोणीच केली नाही. त्यांची एकूण काव्यसंपदा जवळजवळ ४–५ लाख ओव्यांची आहे. ती साधारणपणे खालीलप्रमाणे होय :–

(१) गीतार्णव – २।। लाख ओव्या.
(२) पदार्णव – १। लाख ओव्या.
(३) पासोडी पंचीकरण – १६ हजार ओव्या.
(४) गीतार्थ बोध चंद्रिका – २ हजार ओव्या.
(५) ग्रंथराज – २ हजार ओव्या.
(६) प्रबोधोदय – २५ हजार ओव्या.

खेरीज त्यांनी अनेक ग्रंथ लिहिले आहेत. शिवाय मराठी, तेलगू, हिंदी, व कानडी भाषेत अनेक ळळिते, भजने, भारुडे, आरत्या, गौळणी, विरहिणी, टिपऱ्या, अष्टके, शेजारत्या पण रचल्या आहेत. दासोपंत हे अनेक शास्त्र पारंगत व अनेक भाषांचे जाणकार होते.

गीतेवर मराठी मायबोलीतून त्यांनी 'गीतार्णव' या नावाने केलेली २।। लाख ओव्यांची टीका आहे. गेल्या ३०० वर्षांत ह्या प्रदीर्घ टीकेचे परीक्षण कोणाही संशोधकांने केलेले नाही. गीतार्णवाचा कालखंड हा ऐतिहासिकदृष्ट्या शिवपूर्व कालखंड होय म्हणून त्याचे मूल्य अधिक.

गीतार्णवातून व्यक्त झालेली सामाजिक, आर्थिक, राजकीय व धार्मिक परिस्थिती त्या कालखंडाची निर्देशक होय. आणि म्हणून ऐतिहासिक दृष्ट्या गीतार्णवाला बरेच महत्त्व आहे.

म्हणून शिवपूर्व कालखंडातील मराठवाड्याचे व त्याच्याच अनुषंगाने महाराष्ट्राच्या तत्कालीन समाजाचे बरेचसे यथार्थ दर्शन आपणाला गीतार्णवातून

दिसून येते. प्रस्तुतात त्यातून दिसणाऱ्या फक्त सामाजिक परिस्थितीवरच विचार केला आहे.

सामाजिक

दासोपंतांच्या गीतार्णवाचा सामाजिक दृष्टचा परामर्ष घेतल्यास त्याकाळी चातुर्वण्य व्यवस्था घट्ट होती हे दिसून येते. यज्ञ, पशुहत्या, होमहवन हे ब्राह्मणाचे कर्तव्य, कृषिकर्म हे वैश्यांचे व संग्रामी हिंसा करणे हे क्षत्रियाचे कर्तव्य होते. तसेच 'मोळेमजुरी शूद्रकर्म' मानले जाई. शूद्र मोलमजुरी करून राबत. त्यांना वेतन दिले जाई. राबणे हाच त्यांचा धर्म होता. ब्राह्मण हा वेदविहिन असल्यास त्याला ब्राह्मण समजत नसत म्हणून दासोपंत म्हणतात.

'वैदिक वेदाचार संपन्न । तोच खरा ब्राह्मण । मानावा ।।'

(अध्याय २, ओवी ३६५३)

तसेच ब्राह्मण हा वेदभाष्य, याति, क्रियाभेद, आचार, व्यवहार, प्रायश्चित, चिकित्सा, गणित, शास्त्र, इतिहास, पुराण यांत पारंगत असावा.

"वेदवादी तो ब्राह्मण। येरु तो शुद्रासमान ।।" (२।२१९२)

अवलक्षणी संन्यासास स्पर्शसुद्धा करून देत नसत. ब्रह्महत्या महान पातक मानत असत, व त्याच्यामुळे संपूर्ण गावाचा नाश होईल अशी भावना होती. एके-ठिकाणी असे म्हटले आहे की, धर्मशास्त्र ब्रह्महत्या निवारू शकले नाहीत म्हणून सर्व "बृह्मवृंद राजसभेप्रति गेला (२।२४०३–२४०५). चांडाळाच्या स्पर्शाने तर ब्राह्मण्यत्व नष्ट पावते, अशी कल्पना होती. कलियुगात ब्राह्मण दरिद्री व सामर्थ्य झाला असा उल्लेख दासोपंत करतात.

वैश्याने ब्राह्मणाचा धर्म आचरला तर तो महापातकी समजत (१८।११११५७). महार, चांडाळ यांचा उल्लेख वारंवार गीतार्णवांत येतो. चांडाळ मेलेला पशू ओढून गावाबाहेर टाकत. तसेच सुळावर चढविलेल्या माणसाला मागाहून शूद्राच्या हवाली करण्याची पद्धत होती. एकगोत्री विवाहापासून झालेली संतती चांडाळ मानत.

येक गोत्री विवाही । तेथे जाले जे कुळ । ते पतित सर्व चांडाळ ।। (१।२७८६)

ब्राह्मणाच्या पदरी वाटाडचा म्हणून एका शूद्रास नोकरीला ठेवण्यात आलेले होते व ब्राह्मण त्याला वेतनापोटी "कर्णीचे सुवर्ण" पण देई. (२।२४९६–२४९७) गावात संन्यासी आल्यास त्याच्या भेटीला चारी वर्ण गटागटाने जात (२।२७५०).

समाजात अनेक जाती तेव्हा अस्तित्वात होत्या असे दिसून येते. साळी, माळी, धनगर, कोष्टे, सुतार, चांभार, परीट, न्हावी, चर्मक सुकर, रजक. वेश्या व्यवसाय करणाऱ्या स्त्रिया, व्याध, विणकर अशा अनेक जाती समाजात होत्या.

चांडाळांनी स्पर्श केल्यास तीर्थे अपवित्र बनत (१८।११४२२१).

तत्कालीन समाजात कुटुंबप्रमुखाचे स्थान बरेच महत्त्वाचे होते. कुटुंबांचे उपाध्याय असत व त्यांचा शब्द कोणीही उल्लंघित नसे (१८।१०४२५). अनेक नोकरचाकर, (परिचारक, दास, भृत्य, दूत, सेवक) कुटुंबामध्ये कामाला असत.

कुटुंबात दासी ठेवण्याची पद्धत अस्तित्वात होती आणि तिचे शरीर सर्वस्वी पराधीन होते, असा उल्लेख आहे.

दासीचे जैसे शरीर । पराधीन जग अर्जुना सर्वत्र. (१२।४५४).

कुटुंबात भांडणे होत तसे शिवीगाळी पण होई. (१८।१३७१४).

"क्रोध माजला नसवटे । मग सिविया आवाच्ये उत्तरे ।
लागला जल्पो । मनगटे चोळिता । दांत झिजले खाता ।।" (२।५१४७-५१६५)

ज्येष्ठ बंधूना उठून आलिंगन देण्याची पद्धत होती.

वेळप्रसंगी सोवासिनी (सुवासिनी) जेवायला बोलवत व त्यांना पक्वान्न वाढत.

अमचे घरी सोवासिनी । काल जेवली मांडा गुळवणी ।। (६। पूर्वार्ध पान ४५)

लोक अनुष्ठान करत त्याचबरोबर उद्यापन, व्रतोद्यापन पण करत. श्राद्धक्रिया, पिंडदान, तर्पण करत व हे न केल्यास--

'पीतर नरकसागरी पडोन राहिले'। (१।२७३०)

अशी त्यावेळेस कल्पना होती.

अतिथींचा सत्कार मानाने करण्यात येई. खाद्य तांबूल देऊन त्याचा मान-सन्मान करत. परंतु दासी, मोलकरीण यांना मात्र कुठल्याच प्रकारचे स्वातंत्र्य नसावे. अनेक मुले झालेल्या एका गरीब स्त्रीने आपल्या नाकर्त्या नवऱ्याला दारिद्र्याची जाणीव देताना पुढील शब्द वापरले आहेत. राजाने दानधर्म–दक्षणा वाटली. त्यालाही तो आळसामुळे गेला नाही. ती म्हणते,

आता उजवणी–सांजवणी । मुले कैसे कराल ।। (१८।१०३४६)

मुलींची बालपणी लग्ने करत.

म्हणे बालपणिचि करीयाचे लग्न । (६।५४२)

तसेच दूरदेशी मुली देण्याची पद्धत होती.

कवणे एक अन्य देशी । तयांची कन्या नोवरी ऐशी ।। (६।५४४)

आणि तिला आणण्यासाठी 'विप्रु' पाठविला असा उल्लेख आहे. जावयाला सासुरवाडीला आणण्यासाठी घोडा पाठविण्याची पद्धत होती.

लग्नाचे बोलणे करण्यास आलेल्यांना निश्चयाचा विडा देऊन सन्मानाने पाठवत.

लग्नमुहूर्ताच्या अगोदर स्त्रिया गौरीहर पूजत, याचाही उल्लेख दासोपंतांनी केलेला आहे. (६ । पान ४८).

वऱ्हाड–वऱ्हाडी, बोऊले (बोहोले) मंडप या शब्दांवरून परगावावरून वऱ्हाडी येत व मोठ्या मंडपात वोहोल्यावर विवाह होत, असे स्पष्ट दिसून येते.

एकगोत्री विवाह होत नसत. झालाच तर त्यापासूनची संतती पतित, चांडाळ समजत.

इष्टमित्र, शेजारी, सहृद, सोईरा, मेहुणा किंवा मेव्हणा व मोलकरीण या शब्दांचा उल्लेख वारंवार येतो.

प्रवासास निघताना,

इष्ट देखोनि प्रवर्तावे । अनिष्ठ देखोनि परतावे ।। (१।२५८९).

असे दासोपंत म्हणतात.

(गाडीघोडा) परवाणावरि समग्र घालुनी ।
अपार भृत्य देऊनि ।। (२।३४३८).

प्रवास केल्याचा उल्लेख आहे. " गाडा घोडा बैसला " असे ते म्हणतात.

सिबिका (शिबीका), घोडा, बैलगाडी, घोडागाडी या वहानातून लोक प्रवास करत.

शिक्षण

एका प्रदीर्घ आश्रमाचा दासोपंतांनी उल्लेख केला आहे, आश्रमाचे एकंदर ८ विभाग (धर्मस्थळे) व त्याच्या मध्यभागी मुख्य शाळा उल्लेखिलेली आहे.

आश्रमाचे आवार मोठे होते. त्यात गुरांचे गोठेपण होते. मुख्य पाठशाळेवर व इतर इमारतीवर कळस होते. पाठशाळेचे विभाग खालीलप्रमाणे होते (१८।१०२९४–१०३०१).

(१) तत्त्वज्ञान.
(२) धर्माधर्म निवारण.
(३) पौतृक कार्य
(४) एकांत (योगासाठी)
(५) या विभागात महानुभाव सज्जन, रहात
(६) शांत्यर्थ (गृहपूजा, जप, हवन)
(७) दैविक करणे
(८) दान (सत्पात्री) करण्याचे मंदिर

या खेरीज अध्ययन शाळा, धर्मशाळा, व होमशाळा वेगवेगळ्या होत्या. परदेशाप्रत जाऊन विद्या अभ्यासत असत. एक तरुण विद्यार्जनाकरिता दूर पळून गेला. जाताना त्याने

" पत्रिका लेखन करूनी खांबी वांधली । (६।५६०–५६१)

खांबासी बांधोनी परदेशाप्रती जाऊन अभ्यासू विद्या (६।५५९)

असा त्याचा विचार

कधी कधी शाळा घरी अंगणात भरत. निबंध, निघंटु, शास्त्रे, पुराणे वेद वैय्याकरण, ज्योतिष, इतिहास, सूत्रे चिकित्सा, यातिक्रिया भेद, आचार, व्यवहार हे शिक्षणाचे विषय असत.

यज्ञशाळेचा आणि व्यायामशाळेचा पण उल्लेख आहे.

गृहरचना

लोक स्वतःच्या घरात रहात, भाड्याचे घरात पण रहात परंतू ' भाड्याचे मंदिर लोका शाश्वत नव्हे " असे दासोपंत म्हणतात. यावरून लोक भाड्याच्या घरात रहात पण भाडी पण देत असावीत (९।३१६५).

पुढे अंगण, मधे घर व मागे अंगण किंवा घराला परस असे. 'कूप मलमूत्राचा' बाजूला असे. (१३।२६३२)

ओसरी, सोपा, तळघर, कोठी, बळद, माजघर हे घरांचे भाग निर्देशिलेले आहेत. तळघरात अंधार असे.

विवर (कोनाडा), कोठडी, भुयेर (भुयार), कपाट, तळघर, द्वार, खुंटी, बळद, पेव, वोखरे, आड, विहिर, वोवरी (ओवरी) माझीघरी (माझघर), देव्हारा यांचा उल्लेख केलेला आहे.

पुढील अंगणात सडा, संमार्जन करून रंगरांगोळी घालण्याची पद्धत होती. अंगणात घोडी बांधत (१८।९४८९–९०).

घरात आंव्याच्या अढचा होत्या असा पण उल्लेख आहे.

अनेक गृहोपकरणांचा उल्लेख दासोपंतांनी केलेला आहे. उदा० घटा, दंडु, रांजण, डोरी, अंथरुण, वुधला, स्वयंपाकपात्र, कुदळ, सहाण, कडदोरा, मुसळ, कणगी, कोथळा, दुरडा, (टोपली), ताट, थोरपात्र, कुठार, करवत, काटवटी, चाटु, पाळे, पाटा, उखळ, भोजनपात्र, उदकपात्र, द्रोण, पाट, दर्पण इ०.

मृत्तिकापात्रांची अनेक नांवे दासोपंत उल्लेखितात. ती अशी, हाटा, डेरा, रांजण, मुडा, पडघा, आनु, सुगड, तवली, घडी, घागरी, घडवली, अलंदे, चिकटी, मोरवा, पातली, सांजवणे वगैरे.

एक गृहस्थ माझ्या घरात ढेकूण फार झालेत म्हणून पण तक्रार करताना दिसतो.

ओसाड घराचा उल्लेख आहे. ते घर काळ्या ओसरीचे व मूषक, मोहळ, डास, मत्कुण, व केरु (केर) यांनी गजबजलेले होते. १८।१०४४०–४१)

आहार, तांबूल, वेशभूषा, केशभूषा, डागदागिने, खेळ, करमणूक

षड्रस अन्न व मिष्टान्नाचा वारंवार उल्लेख आहे. लेह्य, पेय, चोष्य, खाद्य, भक्ष्य इ. अन्नाच्या प्रकारांचा उल्लेख आहे.

गाईचे ग्रास पोळी । तांदुळाची झाली धारी ॥ (१।२३६४)

गोधूमाची पुरी । मांडा गुळवणी ॥ (१।१९७४,)

गोधूमाच्या अपूपिका तांदूळाची कांजी बळवटाची क्षीप्रा (२।५०९३–९६) बऱ्याचशा भाजेपाल्या, सायसाखर, क्षीर, खांडवी, मांडे (६ । पान ६०), पुऱ्या, मुगाचे वरान्न, धृतमधुपयशर्करा, धृतसाखर, दध्योदन, शाल्योदन आवळकाठीचा ठेवा यांचा उल्लेख केला आहे (६ । पान ६०).

'सुगृहिणी उत्तम जाणें अन्नकरणी'। (१८।१००१८)

गोधूम, खादीर, गूळ, तेल, दाळी, तांदूळ, दही, नवनीत, दूध, फलाहार, तांदूळाच्या पीठाचा गोळा, धृताचा कुंभ, दधि, नारळ, फणस, शर्करा ,मध, ताक, स्वादू, धृतकणिक, ओदन (भात), साय, शाक् (भाजीपाला), वटक, पर्वाटक, पडवळी, उसाचा रस, क्षीरपक्वे, दध्योदन (दहीभात) हे पदार्थ जेवणात असत.

अन्नपाकू (निपजलिया तो रसिकू । पात्री वाढी ॥ (२।३९८०)

करवंदे, नींब, चींच, हे आंबट पदार्थ अन्नात उपयोगात आणत (१८।१४४१६). फलाहार धान्याहार, लोक करत. उद्यापन, व्रतोद्यापन करत; तसेच सवाष्णीला निष्ठेने जेवायला बोलावत.

बुरहान निजामशहा नेहमी खीर खात असे आणि त्यातूनच त्याला विषप्रयोग झाला असा उल्लेख 'बुरहाने मासिर' मध्ये केलेला आहे.

जेवणानंतर विडा खाण्याची पद्धत होती. पूगीफल, कर्पूरयुक्त, नागवेलीच्या पानांची दले सोलून, खादीर सार निवडून, कर्पूर कंकोळ. येळा, लवंग, ताजिका, चुना, कात, गुंज, पोफळ, इ. टाकून तांबूल खात. नागवेलीची कोवळी पाने विडया-करिता वापरण्याची पद्धत होती. त्यावेळी मराठवाड्यात अस्तित्वात होती (६ । पान ६०).

पश्चिम महाराष्ट्रात पिवळी व जून विडयाची पाने खातात पण अद्यापही मराठवाडयात कोवळ्या पानांचाच विडा खाण्याची पद्धत आहे.

लोक धूम्रपान करत (८।१७३२) मद्यपी समाजात वावरत (२।७४७).

मधे मातलेला मनुष्य । आपणा न सांभाळी ।
त्याला विवेकु नसतो ।। (गीतार्थबोध चंद्रिका २।४१४)

वस्त्रे–कापडचोपड

अनेक वस्त्रांचा उल्लेख दासोपंत करतात. चोखघडीचे उपरणे, सेला, पासोडी, पातळ, पडदा, पडम, पडदणी, झीळ, विरळ, जाळी, घोंगडी. चवाळे, कंबळ, खोगीर, अंगडे, गवाळे, दुताई, कडा, गडेंट, कोचा, धोतरे, प्रावरणे (अस्तिर्ण), उपरणे.

अनेक प्रकारची आसने (गोमुखी, गवाळी, हरिते, स्वेते, पिवळी, आरक्ते, चित्रे, पापळी), पटकुळ व मृदु पटकुळ, सोनसळी, पातळ, स्त्रिया, वापरत.

नेसले धात्रे गळाले । फजिती झाली ।। (१८।५१२१)
मग हुल्लची वस्त ओढी । घडी उकलोनी करी घडी ।
हल्लुची नेसे ।। (१८।५१३६)
भिजलेली धोतर भिजवी । उगीच यज्ञोपवीत सरकवी । (१८।५१३४)
सिखा वाम करी कांडोळी । (१८।५१४३)
असा उल्लेख एका मूर्ख ब्राह्मणाचा आहे.
आणखीन एक गृहस्थ
धोतराचिया निरीया सरीसीया खोवी ।
उजवीकडील डावीकडे । डावीकडील उजवीकडे (१८।५१४१–१४२)
करताना दिसतो. कापडाची दुसे उल्लेखिलेली आहेत.

तत्कालीन लोक पायात जोडा घालीत असत असाही उल्लेख आहे. दृष्टीहीनत्वावर काचेच्या उपनेत्राचे ठिगळ लावत (२।९०२). यावरून लोक चष्मा वापरीत असावेत असे दिसते.

स्त्रिया अंगात कंचुकी घालत. सोनसळी पातळ व लुगडी नेसत. पुरुष धोतरे नेसत. कमरेला शेला, गळ्याभोवती उपरणे व अंगात अंगरखा असे. लहान मुलांच्या अंगडयांचा उल्लेख आहे.

शेंडी ठेवण्याची पद्धत होती. स्त्रिया खोपा घालीत. स्त्रियांच्या गळ्यात अक्षमाला व गुंजाहार असे. कानात कुंडल व हातात कंकण घालीत. अनेक हार व

दागिने यांचा उल्लेख आहे. स्त्रिया नाकात मोतीयाची मोरणी घालत. अंगुलिका म्हणजेच आंगठी बोटात घालत.

हळद, बुक्का, काजळ, कुंकू, उटी, टिळक, विभूती यांचाही उल्लेख आहे ही सौंदर्यप्रसाधने लोक वापरत. सर्वांगास श्वेतगंध, चंदन व इतर विलेपने लावण्याची पद्धत होती. हरिद्रेचे उटणे व रक्तचंदनाचा उल्लेख आहे. अनेक सुवासिक फुले व त्यांच्या माळा स्त्रिया घालीत.

चंपक (चाफा), पुष्प, केतकी (केवडा) स्त्रियांना आवडे.

खेळ–करमणूक

लोक सण उत्सव साजरे करीत.

महासणु आला म्हणजे लोक सडे संमार्जन, रंगमालिका काढीत, अंगाला मर्दन करून सुवासिक तेल चोळत, कर्पुर कस्तुरी अंगाला लावत, ललाटी सुगंध लावत, क्रीडावने, पुष्पवाटिका, वृक्षवाटिका अशा मनोरम ठिकाणी लोक स्वच्छंदपणे व आनंदाने हिंडत फिरत. जलक्रीडेची पद्धत होती (६।४४–४९) (१८।१११०५).

लोक वीरांचे पवाडे गात. सारीपाट खेळत. (१८।१४६३४)

ग्राम्यवादविनोद (गावगप्पा) पण दासोपंतांनी उल्लेखिलेला आहे.

लोक नानाविचित्र, विटनट इंद्रजाल, कोल्हाट पाहात। (२।५३८९)

भाट, नागरिक, वार्ता, पदे, उसाणे, प्रबंध, यांतून पण लोकांचे मनोरंजन होई. कळसूत्री बाहुल्यांचा खेळ चाले (२।४०९७) त्याचा सूत्रधार, यंत्रदार्वा, लाकूड, कळसूत्री दोरवा याचाही उल्लेख आहे. राजा पोलो खेळ खेळे असे कुंटे लिहितात,

पुराणिकांचा वर्ग पण करमणूक करी. हरिदास म्हणजे कथेकरी, बहुरूपी, धर्म प्रवचन करणारे, देवऋषी गावोगाव हिंडत.

रोगराई

दासोपंतांनी गीतार्णवात खालील रोगराईंचा उल्लेख केला आहे.

महाज्वरू, पववक्षय, पांडुरोग, अजीर्ण, शूळ, कफ, खोकला, उदरी, फुगारा, धनुर्वात इत्यादी.

स्मशानाचा उल्लेख मरण भूमिका म्हणून केलेला आहे. (२।२४०१)

पोट फुगणे, वोकारी, मळमूत्र हे पण उल्लेखिले आहेत.

जारण, मारण, वशीकरण, मौन, स्तंभन, उच्चाटन, निग्रहीकरण, विध्वंसन या विद्येसंबंधी गीतार्णवात उल्लेख आहे (१८।६६२१).

मूर्च्छा आलेल्यांचा उल्लेख आहे. नाना चूर्णे, व्यायाम, भस्मे गुटिका, हे उपाय पण सांगितलेले आहेत. वैद्यास भेषज हा शब्द योजला आहे. तो "व्याधी शरीरास लसुभासु करी असे म्हटले आहे") (६।२३८).

कलाकुसर

महाराष्ट्रांत त्यावेळी अनेक कलावंत अस्तित्वात होते.

पुराणिक–हरिदास–कथेकरी

गीतार्णव पुराणिकाचे खालीलप्रमाणे वर्णन करते.

मंगलाचरण आलापरुपे घोळितू । मग पदमोठी करितू ।
तानेचि संपादी ।। (२।३५४३)

पुराणिक कथा सांगत व जनसभा ऐके (२।३५४४).

हरिदास देवालयी कथा करितो । पुढे सभा श्रोतेयांची ।
मागें तया विद्यार्थियांची ।। (२।३५३१)

हरिदासाच्या हातात झर्झर (झांज) असे.

पुराणिक न्यासमुद्रा, अंगपल्लव, आऽऽऽ करून गायन करी (२।३५४६).

त्यांचे गळ्यात सुमनमालांचे भूषण असे. अंगास गंधविलेपन लावत (१।१८३८)

सर्वांगास श्वेतगंध । ललाटी पीतवरी आरक्त ।
घोसमाळा मुक्त सुमने । केतकी दशांग गुगुळ ।
धूपचंदन काष्ट ।। (२।२८९–२९१)

या शिवाय पुराणिक अंगाला हरिद्राचे उटणे, रक्तचंदनाचा टिळा, विभूती, बुक्का लावीत (९।२८४९–५०).

तत्कालिक ग्रंथ 'बुरहाने मासीर' अहमदनगरच्या निजामशाहीचा राजवैद्य महंमद मिश्री याचा उल्लेख करते (कुंटे पृ. १७८).

विणकर वस्त्रावर उत्तम कशिदा काढीत. रंगीबेरंगी वस्त्रे व आसनांचा उल्लेख यापूर्वी केलेलाच आहे.

गांधिये (वैद्य) समाजास औषधे देत.

गांधियाचा पसारा । आपणा पाहिजे मात्रा तेचि घ्यावी ।
(गीतार्थबोधचंद्रिका ४।४०८)

चित्रकार भिंतीवर अप्रतीम चित्रे काढीत. ती सजीव असत. राजचित्रकारांना **आश्रय** होता. (१२।२७१).

चित्रपटू राजघरी । चित्रविचित्र माना तयावरी ।
राजे सैन्य परोपरी । वनेसदने ॥
असुर, सूर, मानव । लता वृक्ष अपूर्व ॥ (८।३५३–३५४)
यावरून चित्राची कल्पना येते.

या खेरीज धर्मप्रवचन करणारे, बहुरूपी, पवाडे गाणारे, ज्योतिषी, देवऋषी गावोगाव हिंडत व आपल्या कलेवर उपजीविका करत.

नाट्यकला समाजात लोकप्रिय होती.

नट, नटी, नाट्यकला हे शब्द निर्देशिलेले आहेत. पुरूष स्त्री भूमिका करत

नटिया अंगावरी वेषू। एकी दारा येकू पुरूषु ।
तेथे उभयता प्रीतिविशेषू । मिथ्या जैसे (२।११८४)
नट नाट्यकला विर्सजिता । पुरुष वेळ नाथी तत्वता (२।११८८)

शेवटी तत्कालीन स्त्री सौंदर्याची जी कल्पना दासोपंतांनी रेखाटली आहे. ती त्यांच्याच शब्दात पहा.

आठवे चापे गोरटी । षोडष वरुपी मुष्टी । मांजू सामावे ।।
नेसली सोनसळा । ललाटी मळिवटू शोभला । कुंकुमाचा ।।
दंतपंक्तिची झळाळ । वरि सुरंग रंगले तांबोळ । चीरिव नयन विशाळ ।
रेखा काजळाची ।।
चंद्रलोपला वदनी । तानवडे भवरिया श्रवणी । नासापुटी सुपाणी। मोती झलेके।।
सुरेल रंगेल अधरोष्ठ । हनूवटी पाहाता नागर । हांस्यवदन सुकुमार॥
कबरी भार पृष्ठी । सुमन खोपा वीरगुंठी । चंदन चर्चिले कंठी । पातळ जिया॥
कुचस्थानी सुकुमारता । विश्रांती जेथे मन्मथा । कंचुकी अनुपम्य पाहाता ।
पांगळेमन ।
भुजदंड सरल । करतळ । पृष्ट सुकोमळ । शब्द होती केवळ । कंकणाचे ।।
उदरमुसे बोतला । मदन रुपा आला । कटिप्रदेशी रिघाला । परतेचिना ।।
कदली गर्भाची मृदुता । जानुब्दयाते सुकुमारता । चंपक पुष्पाची वरुवंता ।
काये तेथे ।।
अल्फद्वय मनोरम । पोटरिया ध्याती सकाम । पादद्वय अतिसम । सारिखेची ।।
आरक्ते ती पादतले । जेथे शंकली रातोत्पले । कामातुरे अलिकुले ।
रुंजी करिती ।।
सजे विखुरली सुमने । पुढे सुरसे गायने । नृत्य विनोद रंजवने । आनेहि नाना।।
(२।५०९७–५११३)

♠ ♠ ♠

मोगलांच्या नोकरीत नेताजी पालकर

डॉ. प्र. ल. सासवडकर

श्री शिवाजी महाराजांच्या अनेक सहकाऱ्यांत नेताजी पालकर फार प्रसिद्ध आहे. हिटलरच्या रोमेलप्रमाणे नेताजी पण फार पराक्रमी होता. नेताजीच्या जन्म-काळाचा पत्ता लागत नाही. तसेच त्यांचा व शिवाजी महाराजांचा संबंध निश्चित केव्हा आला तेही सांगता येत नाही. इतिहासकार बेंद्रे यांच्या मताने नेताजी हा बराच वयस्कर होता. शहाजी राजांनी शिवाजी राजांना शिकविण्यासाठी नेताजीची योजना केली होती.[१] भोसले व पालकर या दोन्ही घराण्यांचे संबंध निकट असून त्यांची नातीही होती. नेताजीचे कुटुंब वंशपरंपरा देशमूख असून सधन होते. नेताजीचा उल्लेख अनेक कागदपत्रातून राजे नेताजी पालकर असा येतो. परगणे करडे मधील तांदळी या खेडचाची देशमुखी पालकरांच्याकडे होती.

अगदी प्रथम नेताजी पुरंदर किल्याचा हवालदार होता. त्याच ठिकाणी माणकोजी दहातोंडचाच्या मृत्यूनंतर नेताजीला सरनौबती मिळाली. (इ. १६६१) हवालदार असताना नेताजी मोहिमेवरही जाई व कज्जांचे निवाडेही करी. श्री. वा. सि. बेंद्रे यांच्या मताने शिवाजीच्या राण्यांपैकी सगुणाबाई ही पालकर कुटुंबातील होती तर श्री. ब. मो. पुरंदरे पुतळाबाईला पालकर कुटुंबातील मानतात.[२] या दोहोंपैकी कोणतीही राणी असो नेताजीची चुलत बहीण होती, मिर्झा राजा जयसिंग व शिवाजी राजे यांच्या प्रकरणातील पत्रव्यवहारात नेताजीचा 'काका' म्हणून उल्लेख केलेला आहे. राणीचा चुलता म्हणून सर्व लोक नेताजीस 'काका' म्हणत असावेत.[३] मुसलमान इतिहासकार नेताजीचा उल्लेख शिवाजीचा नातेवाईक म्हणून करतात.[४]

इ. १६६३ मध्ये तळबीड येथील मोहिते घराण्यांत पाटीलकीबाबत तंटा लागला असता नेताजीने पाटीलकीचे वतन दोन्ही पक्षास निम्मे निम्मे दिले; पण देशमुखी मात्र नेताजी मोहिते यालाच दिली. तसेच 'आपल्या सैन्याचा तुम्हाला त्रास होणार नाही.' असेही आश्वासन नेताजीने मोहित्यांस दिले.[५] अफजुझखान शिवाजीवर चालून आला, त्या वेळी शिवाजीने तानाजी मालुसरे, मोरोपंत पिंगळे व नेताजी पालकर यांच्याशी सल्लामसलत केली आणि खानाने दगा केलाच तर त्याच्या बाजूस व पिछाडीस आपले सैन्य ठेवून ते व विजापूरकरांना माघार घेता येऊ नये या उद्देशाने या तिघांना सैन्यरचना करण्यास सांगितले. अफझुलखानाने सैन्य बरोबर जावळीस आणले होते व थोडे वाईस ठेविले होते. शिंग फुकल्याबरोबर त्यांनी हल्ला करावा असे ठरले होते.

अफजुलखानाचा वध केल्यानंतर तावडतोब इशारा मिळून नेताजी, मोरोपंत व हजारो मावळे विजापुरी सैन्यावर चोहोबाजूंनी तुटून पडले. विजापूरकरांची लांडगेतोड झाली. महाराजांना बरीच लूट मिळाली[६] नेताजीला वाई येथील खानाच्या सैन्यावर हल्ला करण्याचा हुकूम होता पण नेताजी अन्यत्र गुंतला असल्यामुळे वाईस उशीरा आला. मुसेखान व अफजुलखानाचा मुलगा फाझलखान हे प्रतापराव मोरे याच्या मदतीने निसटले. शिवाजीला ही गोष्ट पसंत पडली नाही.[७] नंतर विजापुरी सैन्याचा नेताजीने पराभव केला.

या विजयाचा फायदा घेऊन आपला मुलूख वाढविण्यासाठी शिवाजीने विजापूरकरावर मोहीम सुरु केली. नेताजीसही बरोबर घेतले होते. या मोहिमेत त्या दोघांनी मिळून वाई ते पन्हाळगडपर्यंतचा मुलूख जिंकला. शिवाजीने पन्हाळा घेतला आणि नेताजीने कुंडल, कागल, मिरज, सांगली वगैरे ठिकाणे घेतली. या नंतर लागलीच शिवाजी सिद्धी जोहरच्या पन्हाळ्याच्या वेढ्यात सापडला. यावेळी विजापुरी सैन्यास पायबंद घालण्यासाठी शिवाजीने नेताजीस विजापूरकरांच्या पिछाडीस ठेवले होते. जिजाबाईने राजगडावरून सिद्दी जौहरच्या सैन्यावर हल्ला करण्या-बद्दल नेताजीस हुकूम सोडला. नेताजीने सिद्दी जौहार व सिद्दी हिलाल यांच्या सैन्यावर हल्ला केला सिद्दीचा पराभव झाला. व हिलालचा मुलगा ठार झाला.[८] पन्हाळ्यात शिवाजी राजे वेढ्यात सापडण्यापूर्वी रायबागेजवळ शिवाजीराजाचे रुस्तुमे जमा व फाझलखान यांशी युद्ध झाले. त्यांत नेताजीने फाझलखानाची दाणादाण उडवून त्याला पळवून लावले.

पन्हाळ्याच्या वेढ्याच्या वेळी शिवाजीवर कठीण प्रसंग ओढवला. विजापूर-करांच्या वेढ्यातून सुटण्याला मार्ग नव्हता आणि याचवेळी शाहिस्तेखान दक्षिणेत आला. परंतु महाराज पन्हाळ्यातून कौशल्याने निसटले व विशाळगडास पोचले (१६६०).

आपल्या मुलखाचे रक्षण करण्यास महाराजांनी नेताजीस ठेवले होते. तो मोगली मुलखात लुटालूट करीत होता व मोगली सैन्यास झुकांड्या देत मोठमोठ्या मजली मारीत होता. उंबरखिंडीच्या प्रसंगानंतर त्या मुलखाचा बंदोबस्त ठेवण्यास नेताजीस ठेवले होते. पन्हाळ्याच्या वेढ्यात नेताजीने सिद्दी जौहरची रसद बंद केली होती. शायिस्तेखानालाही नेताजीने सतावून सोडले होते. दरसाल आठ महिने तो मोगलांच्या मुलखात यशस्वी लुटालूट करी. शत्रूच्या हालचालीवर लक्ष ठेवणे हेही त्याचे एक काम असे.[९]

शिवाजी महाराजांचा पुरता बंदोबस्त करण्यासाठी बादशाह औरंगजेबाने मिर्झा राजा जयसिंगाला दिलेरखानासह दक्षिणेत पाठविले. पुरंदर पडल्यावर १२ जूनला महाराजांना जयसिंगाशी तह करणे भाग पडले. संभाजीने नेताजीबरोबर

मोगलांच्या दक्षिणेतील सुभेदारास सहाय्य करावे असे त्यांत एक कलम होते.[१०] यावरून नेताजीचे महत्त्व लक्ष्यास येते. मिर्झा राजाने यानंतर विजापूरकरांवर मोहीम काढली. हीत शिवाजी व नेताजी मोगलांच्या बरोबर होते. दोन हजार घोडदळ व आठ ते नऊ हजार पायदळ त्यांचेजवळ होते. किल्ले जिंकण्यात त्यांनी अप्रतिम कौशल्य दाखविले. तीन आठवड्यात तायवडा, मंगळवेढा वगैरे ठिकाणे त्यांनी घेतली.[११] मिरज मात्र शिवाजीला घेता आले नाही. यावेळी नेताजीने विजापूरचे उपनगर शहापूर जिंकले व मुल्ला अहमदचा पराभव करून दोन हजार घोडेस्वार धरले.[१२] मोगल–मराठे संयुक्त सैन्यात नेताजी पिछाडीस होता व त्याने विजापुरी सैन्यास चांगलेच तोंड दिले.

विजापुरी सैन्य फार कौशल्याने मोगल व शिवाजी महाराज यांच्या संयुक्त सैन्याशी लढत होते. मोगल सेनापतींनी हल्ला केला की छावणी सोडून ते इकडे तिकडे नाहीसे होत व मोगल सैन्याला अडचणीत गाठीत. विजापुरी सैन्याच्या एका टोळीने नेताजीला अडचणीत पकडले व ते त्याला मागे रेटू लागले. शेवटी जयसिंगाचा पुत्र किरतसिंग हा नेताजीच्या मदतीस आला व त्याने नेताजीची सुटका केली.[१३] नंतर शिवाजी व नेताजी यांच्या सैन्याने तायवडा व फलटण घेतले. शिवाजीने पन्हाळा घेण्याचा प्रयत्न केला परंतु ते शक्य झाले नाही. तेव्हा शिवाजी विशाळगडाकडे निघाला. या वेळी त्यांचा व नेताजीचा काहीतरी मतभेद झाला. खाफीखानाच्या मताने काही विजापुरी अधिकाऱ्यांनी नेताजीला फितूर केले व तो विजापूरकरांना जाऊन मिळाला.[१४] आपल्या पराक्रमाचे योग्य चीज महाराजांनी केले नाही असे नेताजीला वाटून तो विजापूरकरांना जाऊन मिळाला. विजापूरकरांना ही सुवर्णसंधीच चालून आली. त्यांनी १२ लाख रुपये नेताजीला दिले.[१५]

सर जदुनाथ सरकार, नेताजी चार लाख रुपये लाच घेऊन विजापूरकरांना मिळाला व मोगली मुलूखावर हल्ले करू लागला असे सांगतात.[१६] नेताजीसारखा योद्धा विजापूरकरांच्या बाजूला असण्यात मिर्झा राजा जयसिंगांला फार मोठे संकट वाटले. नेताजीला अनेक आमिषे दाखवून त्याला आपल्याबाजूस वळविण्याचे त्याने ठरविले. पाच हजाराची मनसब, चांगल्या स्थितीत असलेली जागीर, अडतीस हजार रुपये नगद इत्यादी मागण्या मान्य करून मिर्झा राजाने नेताजीला विजापूरकरांकडून फोडले.[१७] नेताजी प्रामाणिकपणाने जयसिंगाच्या आधीन राहून मोगलांची सेवा करीत होता. तरीही शिवाजीच्या पलायनाचा सूड म्हणून आक्टोबर १६६६ मध्ये बादशहाचा जयसिंगाला हुकूम आला की नेताजीला पकडावे. तेव्हा धारूर मुक्कामी जयसिंगाच्या सैनिकांनी त्यावर आक्रमण करून त्याला व त्याचा चुलता कोंडाजी पालकर यांना बंदी केले व जयसिंगाच्या शिबिरात आणले. जयसिंगाने त्याला दिलेरखानाच्या स्वाधीन करून आग्र्यास पाठविले.[१८]

इ. १६६६ डिसेंबरात नेताजीला दिल्लीस नेले. त्याला फिदाईखानाच्या कैदेत ठेवून त्यावर फौलादखानाची देखरेख होती. ३–४ दिवस त्याचे मनस्वी हाल झाले. अखेर त्यातून सुटण्यासाठी व मोठ्या अधिकाराच्या आमिषामुळे नेताजीने मुसलमान होण्यास सम्मती दिली. बादशाहाला आनंद झाला, सुंता करून धर्मांतराचा विधी झाल्यानंतर बादशाहाने त्याला २००० स्वार व ३००० जात अशी मनसब दिली आणि ‘ मुहुम्मद कुलिखान ’ असा किताब दिला.[१९] नेताजीचे पुत्र व चुलता कोंडाजी यांनाही इस्लामी धर्माची दीक्षा देण्यात आली. बादशहाने नेताजीला त्यांच्या पत्न्यांना उत्तरेत बोलावून घेण्यास सांगितले. दोघी आल्या. त्यांना मुसलमान होण्यास भाग पाडले. बादशाहाने त्याचा त्याच्या धर्मांतरीत बायकांशी निका लावला. नंतर पाच हचाराचे दागिने बादशहाने त्यांना भेट दिले.[२०]

यानंतर मुहुम्मद कुलीखानाची नेमणूक वायव्य सरहद्द प्रांतात पंजमीर येथे करण्यात आली. त्याठिकाणी एक वर्षभर मुहम्मद कुलीखानाने सरहद्दीबद्दल माहितगारी करून घ्यावी आणि मगच त्याला ठाणेदारी द्यावी असे ठरले.[२१] वायव्य सरहद्द प्रांतातील डोंगराळ भागात मुहम्मद कुलीखानाची मुद्दाम नेमणूक करण्यात आली. जवळ जवळ आठ वर्षे त्याने त्या प्रांतात काढली. तो काबूल, बदक्शान, बल्ख, इ. ठिकाणी राहिला. प्रामाणिकपणे तो मोगलांची नोकरी करीत असल्यामुळे त्याने पळून जाण्याचा एकदा प्रयत्न केला असे मनूची लिहितो.[२२]

कुलीखानाला या नंतर महमद कोली बल्ख भागातील घोरबंद येथील ठाण्यावर प्रमुख म्हणून नेमण्यात आले. तेथील सावकार मुहंमद कलीखानाला त्याच्या सरंजामासाठी दरमहा १५००० रुपये देत असे. सावकारांना एकच काळजी पडली होती, खानाची जर उत्तर हिंदुस्थानातून उचलबांगडी झाली तर पैसा कसा वसूल करावयाचा ? सावकारांनी बादशहाकडे ही शंका प्रदर्शित केल्यावर बादशहाने त्यांना वचन दिले की, मुहम्मद कुलीखानाची यापुढे बदली होणार नाही व तो आहे तेथेच राहील.[२३]

बाटल्यापासून नेताजीबद्दल बादशहाचे मत एकदम पालटले. महम्मद कुली-खानाला तो अत्यंत सहानुभूतीने वागवी. इ. स. १६६७ आक्टोबरात फिदाईखानाने बादशहाकडे तक्रार केली की, मुहम्मद कुलीखानाने घोड्यांना डाग देण्याचे व शिक्के मारण्याचे हिशेब दिलेले नाहीत व आवश्यक असणारी अनामत रक्कमही भरलेली नाही. बादशहाने हुकूम सोडला की, मुहम्मद कुलीखानाने ताबडतोब घोड्यांना डागण्याचा हिशेब व तपशील लाहोरच्या सुभेदाराला सादर करावे व त्याने ताबडतोब महाबतखानाबरोबर अफगाणिस्थानाकडे कूच करावे, काही कालानंतर घोड्यांना डागण्याच्या बाबतीत मुहम्मद कुलिखानाला सवलत देण्यात आली व त्याला कोणतेही अडथळे आणू नयेत. अशी सर्वांना ताकीद झाली.[२४]

बादशाहाची मर्जी आपणावर जडली असे पाहून मुहम्मद कुलीखानाने बादशाहाकडून ब्याच सवलती मिळविल्या. शिवाजीचा एक काकाजी नावाचा स्वामिनिष्ठ नोकर व सेनापती होता. भेलशाचा फौजदार रायबान याने काकाजीला कैदेत टाकले होते. मुहम्मद कुलीखानाने बादशाहाला विनंती केली की, काकाजीला कधी सोडलाच तर त्याला परत शिवाजीकडे पाठवू नये. मी त्याला ठेऊन घेईन. शिवाजीच्या बरोबरीच्या काही लोकांना पकडून कैदेत टाकले होते. शिवाजीशी समझौता झाल्यानंतर बादशाहाने त्यांची मुक्तता करण्याचे ठरविले. मुहम्मद कुलीखानाने या मुक्त कैद्यांना आपल्याकडे ठेऊन घेण्याची बादशाहाला विनंती केली. तेव्हा बादशाहाने ती तावडतोब मंजूर केली. बादशाहाने जुम्दतु अल मुल्कला हुकूम सोडला की, काकाजीला मुक्त करून दरबारी पाठवावे. त्याला आणण्यासाठी एक अधिकारी पाठवून २०० रु. खर्चही मंजूर करण्यात आला.[२५] यावरून स्पष्ट दिसते की, मुहम्मद कुलीखानाने बादशहाचा विश्वास संपादन केलेला असून तो एक राजनिष्ठ व वजनदार असा मोगल सरदार बनला होता.

अशी १० वर्षे मुहम्मद कुलीखानाने बादशाहाच्या सेवेत घालवली. एकदा दिलेरखानाबरोबर त्याला दक्षिणेत पाठविण्यात आले. संधी साधून मुहम्मद कुलीखान दिलेरखानाच्या छावणीतून पळाला.[२६] व रायगडास शिवाजी राजाच्या पायाशी येऊन सादर झाला. शिवाजी महाराजांनी त्याला पुन्हा हिंदू करून घेऊन त्याचा पूर्वीचाच मान व अधिकार त्याला दिला. नेताजीची दाभोळ येथे नेमणूक झाली. सुरतच्या फॅक्टरी रेकार्डमध्ये यासंबंधी पुढीलप्रमाणे लिहिले आहे. " नुकताच शिवाजीकडे १० वर्षे मोगलांच्या दरबारात राहिलेला व मुसलमान झालेला एक चाणाक्ष सरदार 'नेताजी' परतला आहे. शिवाजीने त्याला हिंदू करून घेतलेला असून त्याला अधिकारी नेमला आहे."[२७] शिवाजीला आपल्या माणसाची अशी कदर होती. पुढे संभाजीच्या कारकीर्दीतही वृद्ध नेताजी अधिकारी म्हणून होता. नेताजीच्या मृत्यूची तिथि निश्चित उपलब्ध नाही.

---

१. वेंद्रे छत्रपती संभाजी १९६० पृ. १२५
२. वेंद्रे छत्रपती संभाजी पृ. १२६ पुरंदरे दुसरा खंड पृ. ४२७
३. वेंद्रे छत्रपती संभाजी पृ. १२६ पुरंदरे दुसरा खंड पृ. ४२७
४. शिवकालीन पत्रसारसंग्रह खंड १ क्र. ८५९
सरकार शिवाजी ॲन्ड हिज टाईम्स पृ. ५७ (१९४८ प्रत)
५. शिवकालीन पत्रसारसंग्रह खंड १, क्र. ८५९. शिवचरित्र साहित्य खं. ७ ते ४३
६. हफ्त अजुमन १९३. शेजवलकर शिवछत्रपती पृ. ३७६.

७. काळे, छत्रपती शिवाजी पृ. ७६, ८०.
८. जगदीश नारायण सरकार, मिलीटरी डिस्पॅचेस पृ. ११३.
९. शिवकालीन पत्रसार संग्रह, खंड पृ. २३५–२३९.
१०. पुरंदरे, राजा शिवछत्रपती, खंड ८ पृ. ३६
११. इलियट व डौसन, खंड ७ पृ. २७७
१२. जगदीश नारायण सरकार, मिलिटरी डिस्पॅचेस पृ. ११३.
१३. जगदीश नारायण सरकार, मिलिटरी डिस्पॅचेस पृ. ११३
१४. इलियट व डौसन, हिस्टरी ऑफ़ इंडिया, खंड ७, १८७७, पृ. २७८
१५. जदुनाथ सरकार, हिस्टरी ऑफ औरंगजेब खंड ४, प्रकरण ४१, पृ. ११७
१६. सरकार, हिस्टरी ऑफ औरंगजेब, खंड ४, प्रकरण ४१, पृ. ११७
१७. पुरंदरे ब. मो., राजा शिव छत्रपती, दुसरा खंड, पृ. २२५
१८. इलियट व डौसन, खंड ७, पृ. २८२
१९. पुरंदरे ब. मो.–राजा शिव छत्रपती, खंड २, पृ. २२९
सरकार, मासिरे आलमगिश, प्रकरण १०, पृ. ४०
२०. ग. ह. खरे व गो. त्र्यं. कुलकर्णी, ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड ६, क्र. ९७
२१. ग. ह. खरे व गो. त्र्यं, कुलकर्णी, ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड ६, क्र. १००
२२. Manuchi, Storia da Hogor, 21/201
२३. खरे व कुलकर्णी, ऐति. फारसी साहित्य, खं. ७, क्र. ९७
२४. खरे व कुलकर्णी, ऐति. फारसी साहित्य, खं. ६, क्र. १००
२५. खरे व कुलकर्णी, ऐति. फारसी साहित्य, खं. ६, क्र. १०५
२६. इलियट व डौसन, खं. ७, पृ. २८२
२७. इंग्लिश रेकॉर्डस ऑन शिवाजी, भाग २, क्र. १७५, पृ. ९४–९५

सर चार्लस मॅलेटच्या वंशजाकडील वस्तू

डॉ. बा. द. दिवेकर

प्रास्ताविक :

प्रस्तुत निबंधात सर चार्लस वॉर मॅलेट (Sir Charles Warre Malet) (जन्म १७५२–मृत्यु १८१५) ह्यांच्या सध्याच्या वंशजाकडे–म्हणजे, इंग्लंडमध्ये सॉमरसेट परगण्यातील शारगॉट (Chrgot) ह्या गावी रहात असलेले त्यांचे खापर पणतू, सर एडवर्ड मॅलेट ह्यांचेकडे–मॅलेटच्या ज्या वस्तू आहेत त्या संबंधीचे विवेचन आहे. ह्यातील कित्येक वस्तू पुण्याहून तिकडे सुमारे पावणे दोनशे वर्षांपूर्वी मॅलेट ह्यांनी आपल्या बरोबर नेलेल्या असून त्यातील अनेक वस्तु महत्वपूर्ण आहेत. ऑगस्ट १९७४ मध्ये प्रस्तुत लेखकाला सर एडवर्ड मॅलेट ह्यांचे शारगॉट येथील घरी राहून त्यांचा पाहुणचार घेण्याची व वस्तू प्रत्यक्ष अवलोकन करण्याची संधी मिळाली होती. त्यावेळी केलेल्या टिपणावरच प्रस्तुतचा निबंध आधारित आहे.

मॅलेट यांनी इंग्लंडला आपल्याबरोबर नेलेल्या वस्तूंचे मोल लक्षात येण्यासाठी त्यांच्या पुण्यातील वास्तव्यासंबंधी व कारकिर्दीसंबंधी थोडक्यात माहिती खाली देत आहे.

मॅलेट : पुण्यातील वास्तव्य

सर चार्लस वॉर मॅलेट पेशव्यांकडील इंग्रजांचे पहिले कायमचे वकील किंवा रेसिडेंट होत. त्यापूर्वी शिवाजीमहाराजांच्या राज्याभिषेकसमयी (इ. १६७४) आलेल्या सर हेन्री ऑक्झेंडन व डॉ. फ्रायर पासून ते पुरंदरला तहाची बोलणी करण्यासाठी आलेल्या (इ. स. १७७६) कर्नल अप्टनपर्यंत, शंभर वर्षांच्या काळात, इंग्रजांकडून वेळोवेळी कारणपरत्वे वाटाघाटी करण्यासाठी त्यांचे वकील येत असत. पण ते कायमचे वकील किंवा रेसिडेंट नव्हते. इंग्रज व मराठे यांत झालेल्या पहिल्या युद्धानंतर १७८२ त सालपे येथे उभयतात महादजी शिंदे यांच्या मध्यस्थीने तह ठरला व त्याच सुमारास पेशव्यांच्या दरबारी आपले पुण्याकडील राजकारण सांभाळण्यासाठी एक कायमचा वजनदार वकील असावा असे इंग्रजांनी ठरवले. त्यासाठी महादजी शिंदे यांचे मन वळवून, त्यांच्या संमतीने, पुणे दरबारी इंग्रजांचा रेसिडेंटची, म्हणजेच मॅलेट यांची जानेवारी १७८५ त नेमणूक करण्यात आली. मॅलेट प्रत्यक्ष पुण्यात ३ मार्च १७८६ रोजी येऊन दाखल झाले. तेव्हापासून ते फेब्रुवारी १७९७ मध्ये त्यांनी पुणे अखेरचे सोडीपर्यंत सतत ११ वर्षे त्यांचा पुण्याशी, पुणे दरबाराशी व पुण्यातील अनेक लहानथोर व्यक्तींशी संबंध आला. मॅलेटचा

पुण्यातील काळ म्हणजे सवाई माधवराव पेशवे व नाना फडणवीस यांचा काळ होय. मराठे उत्कर्षाअवस्थेत होते तेव्हाचा हा काल.

मॅलेट पुण्याला आल्यावर त्यांच्या हातून घडलेली महत्त्वाची कामगिरी म्हणजे पेशवे–निजाम–इंग्रज या तीन सत्तांचा टिपूविरुद्ध करण्यात आलेला दोस्तीचा तह होय. १ जून १७९० रोजी पुणे मुक्कामी या तहाचा मसुदा पक्का करण्यात आला, व त्या तहाची प्रत इंग्रजांतर्फे पेशव्यांना अधिकृतपणे देण्याचा समारंभ पुणे येथील शनिवार वाड्यातील ' गणेश महालात ' खास दरबार भरवून ६ ऑगस्ट १७९० रोजी सकाळी साजरा करण्यात आला. या महत्त्वाच्या प्रसंगाचे चित्रण करण्यासाठी मॅलेट ह्यांनी आपल्याबरोबर काही नामांकित चित्रकार नेले होते. हा तह घडवून आणण्यात बजावलेल्या कामगिरीमुळे मॅलेट ह्यांना ब्रिटिश सरकारकडून इ. १७९१ मध्ये ' सर ' हा किताब बहाल करण्यात आला.

मॅलेट ह्यांच्या पुणे येथील कारकिर्दीत घडलेली दुसरी महत्त्वाची घटना म्हणजे खर्डे येथील पेशवे व निजाम यांतील लढाई व तीत झालेला पेशव्यांचा विजय. या वेळी मॅलेट जातीने रणांगणावर हजर होते, व त्यावेळी केलेल्या अवलोकनावर आधारित त्यांनी मराठ्यांच्या सैन्यासंबंधी त्यांचे रचनाकौशल्य, शिस्तीचा अभाव, सैन्यसंख्या वगैरे विषयांवर लेख लिहिला आहे. त्यांच्या कारकिर्दीतील तिसरी महत्त्वाची घटना म्हणजे सवाई माधवराव पेशवे ह्यांचा ऑक्टोबर १७९५ मध्ये झालेला अपघाती मृत्यू. त्या वेळी मॅलेट मुंबईला होते. पुणे रेसिडेन्सीतील अधिकाऱ्यांनी त्यांना खास दूताकरवी ही वार्ता मुंबईस कळवून, लगोलग बोलवून घेतले. ३ डिसेंबर १७९६ मध्ये दुसरे बाजीराव पेशवे पदावर आले. त्या वेळी नाना फडणवीसांचे महत्त्व संपुष्टात आले होते. विलायतेला निघण्यापूर्वी पुण्याचे अखेरचे दर्शन घ्यावयाचे म्हणून मॅलेट मुंबईहून पुण्यास आले. (त्यावेळी ते नुकतेच मुंबईच्या गव्हर्नरच्या कौन्सिलचे सभासद झाले होते.) २१ फेब्रुवारी १७९७ रोजी बाजीराव पेशव्यांकडून त्यांचा मोठा सत्कार करण्यात आला. व मार्च १७९७ मध्ये त्यांनी हिंदुस्थानचा कायमचा निरोप घेतला.

राजकीय उलाढालींबरोबरच सर मॅलेट ह्यांच्या दुसऱ्या तऱ्हेच्या महत्त्वाच्या उद्योगांचा इथे उल्लेख केला पाहिजे. किंबहुना प्रस्तुत निबंधासाठी तो जास्त आवश्यक आहे. मॅलेट ह्यांच्याबरोबर त्यांचे कार्यालयीन साहाय्यक डॉ. क्रुसो, डॉ. फिंडले, ऊटॉप, वॉटसन, गोएली वगैरे इंग्रज मंडळी आली होती. या मंडळींमुळे पुणे शहरात पाश्चात्य वस्तूंचा, विद्येचा, वैद्यकांचा, चित्रकलेचा, पशुपक्षी संग्रहालय बनवण्याचा इ. विविध आधुनिक गोष्टींचा प्रसार झाला. हे सर्व प्रयत्नपूर्वक घडवून आणण्यात सर मॅलेट यांचा विशेष पुढाकार असे. प्रस्तुत लेखकाने, मॅलेड ह्यांनी आपल्या पुण्यातील वास्तव्याची केलेल्या सामाजिक–सांस्कृतिक उपक्रमांविषयी

त्यांच्या डायऱ्यांवरून टिपणे काढली आहेत. पण त्या विषयात इथे शिरण्याचे कारण नाही. या विषयासंबंधी ज्यांना उत्सुकता असेल त्यांनी खालील दोन ग्रंथ पाहिल्यासही या संबंधात बरीचशी माहिती कळण्यासारखी आहे.

(१) Sardesai G. S., Ed., *English Records of the Maratha History, Poona Residency Correspondence Vol. 2. Poona Affairs, 1786-1797* (Malet's Embassy) (Bombay 1936).

(२) पारसनीस द. बा., **सवाई माधवराव पेशव्यांचा दरबार,** (मुंबई, प्रकाशन तारीख नाही.)

एवढ्या प्रास्ताविकानंतर इंग्लंडमध्ये मॅलेट ह्यांच्या वंशजांकडे—त्यांचे खापरपणतू सर एडवर्ड मॅलेट ह्यांच्याकडे, त्यांच्या कोणकोणत्या वस्तू आहेत त्याचा तपशील पाहू.

पत्रव्यवहार व इतर लिखाण

१. सर चार्लस मॅलेट ह्यांच्या दैनंदिन वृत्तांताच्या शंभरावर पक्क्या बांधणीच्या फायली, 'डायऱ्या' अलीकडेच लंडनमधील इंडिया ऑफिस ग्रंथालयास सर एडवर्ड मॅलेट ह्यांनी विकल्या आहेत. असे असूनही अजून सर एडवर्ड ह्यांजकडे सर मॅलेट ह्यांच्या पत्रव्यवहाराच्या अनेक फायली शिल्लक आहेत. ह्या फायलीत सर चार्लस मॅलेट ह्यांचे पुणे रेसिडेन्सीतील सहकारी मि. ऊटाफ इत्यादींचा पत्रव्यवहारही आहे.

२. मॅलेटनी ७–१२–१७७६ रोजी लिहून पूर्ण केलेला '*Thaught on Cambay*' ह्या निबंधाचे हस्तलिखित एकूण सव्वा पाच फुलस्कॅप पानाचे आहे. मॅलेटची पुण्याला नेमणूक होण्यापूर्वी काही वर्षे आधी, १७७४ पासून ते खंबायतच्या नबाबाकडे इंग्रजांचे रेसिडेंट होते. त्यांच्या तिथल्या वास्तव्यावर आधारित हा निबंध आहे.

वैयक्तिक–वापरातील व 'भेट' वस्तू

(१) सर चार्लस ह्यांना मोगल बादशहाकडून मिळालेली सनद (१७७५)– दोन हजारांची 'मनसबदारी' व 'इहतिशान उद्दौला उल् मुल्क बहादुर फारूज जंग' हा किताब.

(२) सर चार्लस वापरीत असलेले, त्यांच्या घराण्यात परंपरेने आलेले, 'Family Bible'

(३) सर चार्लस ह्यांच्या नक्षीकाम केलेल्या चांदीच्या वस्तू–ह्यातील कित्येक त्यांना भेट म्हणून आल्या.

(४) सर चार्लसनी संग्रहीत केलेल्या Chinaware च्या मौल्यवान वस्तू. त्या त्यांनी स्वतःसाठी मुद्दाम तयार करवून घेतलेल्या असाव्यात, कारण सुबक नक्षीकामाच्या मध्यभागी प्रत्येक वस्तूवर CWM अशी त्यांची अद्याक्षरे आहेत.

(५) मराठा पद्धतीचा दोन मोठ्या ढाली व वीस बाण.

(६) तीन चवऱ्या चांदीच्या मुठींच्या

(७) पेशव्यांनी सर चार्लसना भेट म्हणून दिलेला बुद्धिबळाचा सेट–दीड फूट लांब, एक फूट रुंद व एक फूट उंच अशा सुरेख नक्षीकामाच्या पेटीत हा सेट आहे. पेटीच्या दोन्ही बाजूस प्रत्येकी एक सिंह असून सिंहाच्या तोंडात 'रिंग' आहे. खेळातील मूर्ति लाकडी रंगीत असून एक ते दोन इंच उंच आहेत. फार सुंदर कारागिरी आहे. राजा, वजीर, हत्ती, घोडे. उंट, सैनिक सर्व प्रमाणबद्ध आहेत. एका बाजूस हिंदूंचे सैन्य तर विरुद्ध बाजूस मुसलमानांचे सैन्य, अशी एकंदर कारागिरी आहे. मुसलमानांचा हिरवा पोषाख तर हिंदूंचा पिवळा पोषाख आहे. मुसलमानांची घोडी तांबड्या रंगाची, हिंदूंची पिवळ्या रंगाची. माणसांच्या शिरस्त्राणात, चेहरेपट्टीत छान फरक दाखविले आहेत. दोन्ही बाजूस सैनिकांच्या हातात तलवारी आहेत. तख्तावर बसलेला मुसलमान बादशहा व त्याचा वजीर दोघांनाही दाढीमिशा आहेत. उलट सिंहासनावर बसलेल्या हिंदू राजाच्या व त्याच्या प्रधानास फक्त मिशा आहेत. त्यावेळच्या राजकीय पार्श्वभूमीवर मिळालेली पेशव्यांकडची ही सूचक भेट पाहून मॅलेटना गंमत वाटली असेल.

चित्रसंग्रह

खाली उल्लेख केलेली बहुधा सर्व चित्रे जलरंगी आहेत.

(१) सर मॅलेट भारतातून इंग्लंडला गेल्यावर तिथे Wiltshire कौन्टीमध्ये Wilbury House मध्ये जाऊन राहू रागले. पुण्याला संगमाजवळ ते अनेक वर्षे राहिलेले होते. त्याची आठवण करून देणारे नैसर्गिक वातावरण त्यांना इथे आढळले म्हणून त्यांनी मुद्दाम ही प्रशस्त वास्तू खरेदी केली असे म्हणतात. ह्या 'विल्ब्युरी हाऊस'ची अनेक बाजूंनी काढलेली चित्रे एका खास अल्बममध्ये आहेत.

(२) मॅलेटची राजपूत स्त्री, 'बीबी अंबर कुंवर' हिचे चित्र.

(३) चार्लस मॅलेट ह्यांच्या घोड्याचे मोठे चित्र.

(४) चार्लस यांची बायको–सुझान हिने काढलेल्या चित्रांचा आल्बम, अनेक नातेवाईकांची, बिल्ब्युरी हाऊसची इ. चित्रांचा भरणा जास्त आहे.

(५) जेम्स वेल्सने काढलेले सवाई माधवराव पेशवे यांचे चित्र. पेशवे धावत्या घोड्यावरून जात आहेत. मागेपुढे लोक पळत आहेत. दोन फूट लांब १। फूट रुंद ह्या आकाराचे हे चित्र फारच सुंदर आहे.

पुणे दरबारचे तैलचित्र

(६) वर उल्लेख केलेली सर्व चित्रे जलरंगात काढलेली आहेत. यापुढे वर्णन करावयाचे चित्र—तैलचित्र.

३ ऑगस्ट १७९० रोजी सकाळी पुणे येथील शनिवारवाड्याच्या गणेशमहालात इंग्रजांतर्फे त्रिवर्ग तहाची अधिकृत प्रत देण्याचा समारंभ झाला. त्याला मॅलेटच्याबरोबर पुणे रेसिडेन्सीतील इतर सर्व महत्त्वाच्या व्यक्ती हजर होत्या. रेसिडेन्सीतील मुसलमान वकील सय्यिद नूसरूद्दीन हुसैनखानही होता. पेशव्यांतर्फे पुण्यात हजर असलेली सर्व प्रमुख मंडळी या महत्त्वाच्या दरबारास उपस्थित होती. पेशव्यांच्या डाव्या हातास नाना फडणवीस व त्यांच्या मागे इंग्रजविषयक कामकाज पाहणारे बहिरो रघुनाथ मेहेंदळे होते. पेशव्यांचे समोर स्वतः मॅलेट व त्यांच्यामागे त्यांच्या रेसिडेन्सीतील अधिकारी बसले होते. एकूण सुमारे शंभर एक मंडळी ह्या खास समारंभासाठी हजर होती.

ह्या अत्यंत महत्त्वाचा प्रसंग चित्रबद्ध करून ठेवण्यासाठी मॅलेट यांनी आपल्याबरोबर जेम्स वेल्स, डॅनियल इत्यादि सुविख्यात युरोपीयन चित्रकार नेले होते. जेम्स वेल्सने आपल्या हाताखाली शिकवून तयार केलेले गंगाराम चिंतामण नवगिरे, बखतराम हे हिंदू चित्रकारही बरोबर घेतले असावेत असे प्रस्तुत लेखकाचे मत आहे.

शारगॉटला सर एडवर्ड मॅलेट यांजकडे ते मूळ भव्य तैलचित्र आहे. सुमारे नऊ फूट लांब व सहा फूट उंचीचे हे तैलचित्र उत्तम अवस्थेत आहे. १८८४ साली Owen ह्या गृहस्थाने इंग्लंडमध्ये असलेला त्या चित्राचा फोटो काढला होता. त्या फोटोवरून त्याच्या काही प्रतिकृती करण्यात आल्या. पुणे येथे भारत इतिहास संशोधक मंडळामध्ये मूळ एकदोन प्रतिकृती पहावयास सापडतात. प्रस्तुत लेखकाकडे मूळ तैलचित्राचा बारा इंच लांब व ८॥ इंच उंच असा उत्तम फोटो आहे. जिज्ञासूंना तो पाहता येईल.

ह्या चित्राचा आराखडा तयार करण्यासाठी, कॅमेरामन जसा एका बाजूने दृश्य टिपतो त्याप्रमाणे एका बाजूस मॅलेटने बरोबर नेलेली चित्रकार मंडळी बसलेली असावीत व प्रत्येकाकडे उपस्थित समुदायाचे वेगवेगळे भाग व त्या त्या भागातील व्यक्ती वाटून दिल्या असाव्यात असे दिसते. शिवाय सबंध महालाची व मंडळी जशी बसली किंवा उभी होती त्याची ठळक मंडळींच्या स्थानांच्या तपशीलासह, रूपरेषा

काढण्याचे काम एकाकडे असावे. हे सर्व काम जेम्स वेल्सच्या मार्गदर्शनाखाली झाले. तैलचित्र त्याचवेळी लगेच तयार झाले नाही. वेल्सच्या मृत्युनंतर (१७९५) पुढे १८०५ मध्ये डॅनियलने ते तयार केले. हे तैलचित्र तयार करताना प्रत्यक्ष प्रसंगाच्यावेळी निरनिराळ्या चित्रकारांनी जे रंगीत आराखडे केले होते. त्यांचा व एकंदर महालाच्या व समुदायाच्या सविस्तर रूपरेषाचा उपयोग करून महालात त्या त्या ठिकाणी मूळाबरहुकूम व्यक्ती चित्रीत करून डॅनियलने मोठे तैलचित्र बनविले. इंग्रजीत ह्याचे प्लॅनिंग ' piecing together ' असे वर्णन करता येईल. प्रत्येक व्यक्ती ज्या पद्धतीत बसली होती किंवा उभी होती त्यांचे शारगॉटच्या चित्रसंग्रहात स्वतंत्र रंगीत आराखडे पहावयास सापडतात. एखाद्या समारंभासाठी जमलेल्या मोठ्या समुदायाचे प्रत्यक्ष जसेच्या तसे, फोटोसारखे चित्र काढण्याचे, कदाचित त्या वेळचे हे तंत्र असावे. पुणे रेसीडेन्सीकडून आलेली महत्त्वाची मंडळी पेशव्यांकडे तोंड करून मॅलेटपासून सुरू करून साधारण एका ओळीत बसली होती. गंगाराम चिंतामण नवगिरेच्या स्वतंत्र आल्बममध्ये नुरुद्दीन हुसैनखानाचे व साधारणपणे तैलचित्रातील उजव्या हाताच्या टोकाला असलेल्या व्यक्तींचे आराखडे आहेत. कडेला हातात दंड घेऊन उभ्या असलेल्या मराठा चोपदाराचा आराखडाही गंगारामच्या आल्बममध्ये आहे. हा भाग त्याच्याकडे वाटून देण्यात आला असावा. स्वत: जेम्स वेल्सने सवाई माधवराव पेशवे, नाना फडणवीस, बहिरोपंत मेहेंदळे व सर चार्लस मॅलेट ह्यांच्या आराखड्यांचे काम आपणाकडेच घेतले असावे. कारण यापूर्वीही त्याने स्वत: त्यातील काहींची स्वतंत्रपणे बैठका (Sittings) घेऊन चित्रे काढण्यास सुरवात केली होती.

गंगाराम चिंतामण नवगिरे (तांबट)

शारगॉटला गंगारामाच्या दोन तऱ्हेच्या कलाकृती आहेत. (१) लाकडी चित्रे व (२) कागदावर काढलेली जलरंगी चित्रे.

(१) लाकडी चित्रे पेशव्यांच्या प्राणिसंग्रहालयातील प्राण्यांची असून ती सुमारे १॥ ते ३ फुट उंचीची आहेत. लाकडी चित्रांचा तपशील असा– १ हत्ती, १ सिंह, १ वाघ, ३ चित्ते, १ रानमांजर, १ उंट, व १ घोडा (बहुधा स्वत: मॅलेट वापरीत त्या घोड्याची ही प्रतिकृती असावी, कारण शेजारी उभ्या असलेल्या मालकाचे चित्र हरवले आहे. व तिथे मॅलेटचे नाव लिहिले आहे.)

प्रत्येक लाकडी चित्राखाली पाटवजा स्टॅंड असून त्यावर बाळबोधीत गंगाराम चिंतामण नवगिरे हे कलाकाराचे नाव, मुक्काम पुणे, नारायण पेठ, हा पत्ता, चित्र बनविल्याची भारतीय तिथी व हे चित्र चार्लस मॅलेटसाठी बनवले असा उल्लेख आहे.

गंगारामने जी जी लाकडी चित्रे बनविली आहेत, त्यातील प्रत्येकाचे स्वतंत्र रंगीत चित्रही कागदावर काढले आहे. त्याखालीही चित्रकाराचे नाव, इत्यादी बाळबोधीत लिहिले आहे. उदाहरणार्थ, वाघाच्या चित्राजवळ डाव्या हाताला समासात पुढील शब्द लिहिले आहेत.

'गंगाराम चिंतामण तांबट नवगिरे, मुक्काम पुणे, नारायण पेठ, गुरुप्रसादे नक्षा लिहिला आसे निसबत सर चारलीस म्यालेट बारोनेट ॥ भाद्रपद वद्य १४ बीस्तर वार वाघाचा नक्षा लिहिला आसे ॥' प्रत्येक चित्राशेजारी मूळचे मोजमाप दिले आहे. वाघाच्या चित्राशेजारी दिलेले मोजमाप असे :

नाकापासोन मस्तकापावेतो फूट १, खांद्या पावेतो फूट १, खांद्यापासोन ढुंगापावेतो फूट ३; ढुंगापासोन शेपटी पावेतो फूट ३, छातीपासोन खांद्यापावेतो फूट १।।, उंची फूट ३.

रंगचित्रे

गंगाराम नवगिरेने काढलेल्या रंगचित्रांचा एक स्वतंत्र आल्बम आहे. सर्व चित्रे साधारणपणे २ फूट लांब १ फूट उंच अशा आकाराची आहेत. आल्बममध्ये ज्या क्रमाने चित्रे लावली आहेत, त्या क्रमाने ती खाली वर्णिली आहेत.

(१) गंगारामाने स्वतःच काढलेले चित्र— गंगारामाच्या अंगावर काही नाही. खांद्यावर जानवे, कमरेखाली लाल काठी धोतर, डोक्यावर तांबडी पगडी, मिशा आहेत. हनुवटीजवळ दाढीचे खुंट वाढले आहेत. बसलेल्या स्थितीत चेहऱ्यावरून तो पस्तीशीचा वाटतो. चित्राखाली इंग्रजीत पुढील मजकूर आहे.

"Gangaram by himself" Very like, a very ingenious person of Poona in the service of Charles Warre Malet from whome the subsequent native sketches were drawn chiefly from life. (subsquent " म्हणजे त्या आल्बममध्ये नंतर येणारी.)

(२) गंगारामाचे गुरु. त्यापुढील मजकूर : 'His G' roo a celebrated holy hermit near Poona. अंगात काही नाही, लाल काठी, धोतर, हातात रुद्राक्षाची माळ, चेहऱ्यावर मिशा, वय सुमारे पन्नास वर्षे.

(३) यानंतर ओळीने पेशव्यांच्या प्राणिसंग्रहालयातील अनेक प्राण्यांची चित्रे व त्याखाली इंग्रजीत मजकूर. उदाहरणार्थ, गेंड्याच्या चित्रापुढील मजकूर असा : Rhinoceros— belonging to Madarao Narain

Peshwa— well taken from the life with great fidelity at Poona in November 1790 by Gangaram Chintaman Tambat— the age of the Rhinoceros was supposed to be 25 years of the following dimensions : (या पुढे त्या मूळ प्राण्याची मोजमापे दिली आहेत.)

प्राणी संग्रहालयातील विविध प्राण्यांच्या चित्रानंतरची चित्रे पुढीलप्रमाणे :

(४) पर्वतीसमोरील तळ्यात बैल, उंट, हत्ती वगैरे धुण्याचे काम चालू आहे. सुमारे २०–२२ माणसे हे काम करीत आहेत.

(५) हत्ती व त्यावरील हौदा.

(६) तळ्यात घोडे धुण्याचे काम चालू आहे.

(७) पुन्हा विविध प्राण्यांची चित्रे : चित्ता, वाघ, सिंह, उंट, रानमांजर, धावता घोडा.

(८) 'Hunting party encamped'— एका झाडाखाली शिकारी पार्टी विसावत आहे. तंबू, घोडे, झाडाची सावली इ. सर्व उत्कृष्ट चितारले आहे.

(९) सवाई माधवराव पेशवे व नाना फडणवीस, समोर मुसलमान वकील हात जोडून पाऊले मागे वळवून गुडघ्यावर बसला आहे. मागे तीन भालदार चोपदार उभे आहेत.

(१०) तोफखान्याची एक तुकडी नदीचे पात्र पार करीत आहे, काही हत्ती या कामात मदत करीत आहे.

(११) काही लोक नदी पार करीत असल्याची तीन निरनिराळी चित्रे,

(१२) शिकारी पार्टी.

(१३) भारतीय नोकर एका मुलाला घेऊन उभा आहे.

(१४) महादजी शिंदे यांच्या चित्राचा आराखडा.

(१५) घोड्यावर बसलेले महादजी शिंदे.

(१६) शिपी कपडे बेततो आहे— शिपी शिप्याच्या पाटावर बसला आहे. बसताना उजवा गुडघा वर केला आहे. शेजारी कात्री–खुंटाळ्यावर वस्त्र टांगल्या आहेत.

(१७) वर वर्णन केलेल्या ६ ऑगस्ट १७९० च्या गणेश महालातील दरबार प्रसंगातील तीन आराखडे याप्रमाणे शारगॉटला सर चार्लस मॅलेटची

कागदपत्रे, यांना भेटीदाखल मिळालेल्या व त्यांनी जमविलेल्या वस्तू, पेशवे दरबारचे भव्य तैलचित्र, गंगाराम तांबटाने काढलेली सुरेख चित्रे व इतर अनेक चित्रांचे आल्बम पहावयास सापडतात. गंगारामाने व बखतरामाने आणखी चित्रे काढली असावीत. ती जर पुण्यात किंवा महाराष्ट्रात उपलब्ध झाली तर एक फार मोठा मौल्यवान ऐतिहासिक ठेवा सापडल्यासारखे होईल. श्री. पारसनीसांनी आपल्या 'सवाई माधवराव पेशव्यांचा दरबार' या पुस्तकात म्हटले आहे. (पृ. ६९) : हृया गंगारामाची अधिक माहिती कोठे मिळत नाही. तथापि हा सर चार्लस मालेट हृयांच्या, नोकरीस असून तो त्यावेळीही चित्रकार म्हणून चांगला प्रसिद्धीस आला होता असे दिसते. सर चार्लस मॅलेट हृयांनी वेरूळच्या लेण्यांची चित्रे घेण्याकरता ह्यास वेरूळास पाठवले होते. ही चित्रे व माहिती सर चार्लस मालेट ह्यांनी हिंदुस्थानचे गव्हरनर जनरल सर जॉन शोअर ह्याच्याकडे कलकत्यास पाठविली. त्यासोबत मि. मॅलेट ह्यांनी ता. २२ डिसेंबर इ. १९७४ रोजी जे पत्र लिहिले आहे. त्यामध्ये त्यांनी गंगारामचा नामनिर्देश केला असून त्याचे " a very ingenious native in my service" असे वर्णन केले आहे. त्या गंगारामाने काढलेली काही मूळ चित्रे दूर इंग्लंडमध्ये का होईना, सुरक्षित असून उपलब्ध आहेत ही जिज्ञासूंच्या दृष्टीने भाग्याचीच गोष्ट म्हटली पाहिजे.

मल्हारा मुण्डवंशीय ताम्रपट–मुण्ड, शक, शूलिक, हूण

देवीसिंग चौहान

शक १८९६ च्या विदर्भ संशोधन मण्डळाच्या वार्षिकात म. म. मिराशींनी अचलपूर जवळील मल्हारा गावी सापडलेल्या मुण्डवंशीय एका आदित्यराजाचा ताम्रपट प्रकाशित केलेला आहे. हा पाच पत्रांचा ताम्रपट आजपर्यंत अज्ञात असलेल्या मुण्ड या राजवंशातील आदित्यराजाने वानखेट अर्थात अकोला जिल्ह्यातील वानखेडपूर या गावातून दिलेला आहे. लिपीच्या धारणीवरून हा लेख शक ३०० च्या पूर्वीचा ठरत असला तरी डॉ. मिराशींनी अन्य कारणावरून तो शक २०० च्या सुमाराचा असावा असे प्रतिपादिले आहे. हा मुण्ड वंश ब्राह्मण होता असे लेखात अनेक वेळा म्हटलेले आहे. वस्तुतः हा मुण्ड वंश ब्राह्मण आहे असे ५० ओळींच्या या लेखात कोठेच स्पष्टपणे वा सूचक रीतीने सांगितलेले नाही. या लेखातील मुण्ड राजवंशाच्या वंशावळीत सोम, वर्धन, मुण्ड, राष्ट्रमहाराज, राजकुल व आदित्यराज अशा सहा व्यक्ती आलेल्या आहेत. पैकी शेवटल्या, तीन, राजे असून पहिल्या तीन पुरुषांना राजपददर्शक विशेषण लावलेले नाही. मुण्ड राजवंश ब्राह्मण आहे असे मानण्यास या ताम्रलेखात किंवा अन्यत्र काहीच साधन नाही. या उलट हा मुण्ड वंश ईराणी लोकांपैकी असावा.

मुण्ड हा राजवंश ब्राह्मण आहे असा डॉ. मिराशींचा समज होण्याचे कारण असे असावे. या वंशातला सोम हा पुरुष परम भागवत होता. त्याला वेदाचे अध्ययन करण्यात आनंद वाटत होता. शिवाय हे मुण्ड घराणे अश्वमेध यज्ञ करणारे होते. (पाहा : वार्षिक पृ. १४ ओळी २, ४). वर्धन हा वंशावळीतला दुसरा पुरुष यमनियमरत, आर्यवृत्ति, अतिथीप्रिय तपस्वी होता. तिसरा पुरुष मुण्ड याने कोणाकडूनही कधी दान स्वीकारून आपला हात कलंकित करून घेतला नाही. (ओळ १४). तो नित्यव्रत व यज्ञानुष्ठानार्थ दीक्षित होता. यज्ञासाठी त्याला द्रव्य कधीही कमी पडत नाही. (ओळ १६). राष्ट्रमहाराज, राजकुल व आदित्यराज यांना वरील सारखी विशेषणे झालेली नाहीत. त्याचे वर्णन राजांना–क्षत्रियांना साजेसे आलेले आहे. वरील विशेषणांवरून मुण्ड राजवंश ब्राह्मण होता असा निष्कर्ष काढणे योग्य होणार नाही. ज्या व्यक्तींना गावे दान दिलेली आहेत त्यांना ब्राह्मण असे लेखात म्हटलेले आहे.

या वंशातील सहा व्यक्तींपैकी पहिली दोन नावेच, फार तर भारतीय सांस्कृतिक परंपरेतील म्हणता येतील. मुण्ड हे व्यक्तिनाम या परंपरेत आढळत नाहीत. राजकुल या संस्कृत शब्दाचे तद्भव रूप राजउल, राउल असे होते. राऊल

म्हणजे राजा, राजासारखी मान्यवर व्यक्ती. आदित्यराज शक गणात रूढ असलेले व्यक्तिनाम आहे याचा उल्लेख आम्ही अन्यत्र यापूर्वी केलेला आहे (पाहा : चौहान, पृ. ७७ ते ८२.).

प्रस्तुत ताम्रपटात भट्टस्वामी, अग्निस्वामी, दित्यस्वामी, द्रोणस्वामी, नन्नस्वामी, सूर्यस्वामी, कालिशर्मा प्रभृति ब्राह्मणांना गावे दान दिलेली आहेत. या नावापैकी अग्नि, दित्य, नन्न, सूर्य ही ईराणी उपास्य देवते व म्हणून ईराणी व्यक्तिनामात त्यांचा समावेश विशेषत्वाने होतो. या सांस्कृतिक परंपरेची नोंद घेणे आवश्यक आहे. दिनेशचंद्र सरकार या प्राच्यविद्या कोविदाने असाही अभिप्राय नोंदविला आहे की स्वामिन् शब्द ईराणी शक गणाचे रिक्थ आहे (सरकार, पृ. १७३, टीप २). स्टेन कोनो याने आपल्या शक स्तदीज (पृ. ३६) या छोटेखानी पुस्तकात मुरुण्ड शब्द मृवन्त शब्दापासून व्युत्पादिला आहे. मृवन्त म्हणजे मृत्युला सामोरे जाणारा, पराक्रमी. दिनेशचंद्र सरकार यांनी मुरुण्ड ही शकांची स्वामी या अर्थी उपाधी मानून संस्कृत स्वामी त्याचा संस्कृत अनुवाद आहे असे सांगितले आहे. चष्टन व नहपान अशा महाक्षत्रपकुलातील अनेक महाक्षत्रपांना स्वामी ही उपाधी लावलेली दिसून येते. अशा अवस्थेत वरील व्यक्तिनामात युक्त स्वामी शब्दाकडे लक्ष पुरविणे इष्ट होय. नन्न स्वामी ही व्यक्ती ईराणी परंपरेतील नाव धारण करणारी आहे असे निश्चयाने म्हणता येते. आम्ही एका लेखात (युगवाणी, पृ. ९०६) मराठी, गुजराती आदि भाषांतील, नाणे, नाणू, नाणक आणि नाना या व्यक्ती नामाच्या व्युत्पत्तीची चर्चा केलेली आहे. यात नना शब्द मूलभूत आहे.

मुण्डवंश

प्रस्तुत मल्हारा ताम्रपटात 'मुण्डपुत्राणां' सोम असा या घराण्यातील पहिल्या पुरुषाचा उल्लेख आलेला आहे. म्हणून हे मुण्ड राजघराणे, डॉ. मिराशींनी आपल्या संपादनात पार्जितरच्या प्रसिद्ध ग्रंथाचा उपयोग केलेला आहे. पार्जितरने संकलित केलेला पुराण संहितेचा आवश्यक भाग असा आहे (पाहा पार्जितर, पृ. ४५ व ४६).

आन्प्राणां संस्थिते राज्ये तेषां भात्यन्वया नृपाः
सप्तैवान्प्रा भविष्यन्ति दशाभीरास्तथा नृपाः
सप्त गर्दभिनश्चपि शकाश्चाष्टादशैव तु
यवनाष्टो भविष्यन्ति तुषारास्तु चतुर्दश

त्रयोदश मरुण्डाश्च । गुरुण्डाश्च हुणा ह्येकोन विंशतिः । मौना ह्येकादशैव तु ।

पार्जितरच्या या छोटेखानी ग्रंथाचे नाव कलियुगातील राजघराण्यासंबंधी पुराण-संहिता असे आहे. राजघराण्यातील व्यक्ती व त्यांची राज्यकाल वर्षे निश्चित

करण्यासाठी पार्जितरने प्रयत्न व कष्टाचा डोंगर उभा केला. आहे. या संहिता निर्धारणासाठी त्याने भागवत पुराणाच्या २०, भविष्य पुराणाच्या ८, ब्रह्मांड ६, गरुड ४, मत्स्य १८, वसु १४ व विष्णु पुराणाच्या १२, अशा मुख्य मुख्य पुराणांच्या एकूण ८२ प्रती हाताळून, महत्त्वाचे पाठभेद नोंदविले आहेत.

शेवटच्या श्लोकाचा चौथा चरण 'हुणा ह्येकोनविंशतिः' असा आहे. पार्जितरच्या मते मत्स्य पुराण सर्वाधिक विश्वास पात्र आहे. याच पुराणात हुणाः व मौनाः हे दोन्ही पाठ प्राप्त आहेत. हुण व मौन शब्दावरील टिपेत दोन्ही पाठांना चांगला पुरावा मिळतो, असे पार्जितरने स्पष्टपणे नोंदविले आहे. डॉ. मिराशींनी मुण्ड शब्द मौन शब्दापासून व्युत्पादण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांचे म्हणणे असे की मौन शब्द मौण्ड शब्दाचे अपभ्रष्ट रूप असून मौण्ड शब्द मण्ड शब्दापासून बनलेला आहे. अर्थात येथील मौनाः हे घराणे मुण्ड असण्याची शक्यता आहे. अशी डॉ. मिराशींच्या विचाराची दिशा आहे.

मुरुण्ड हा पाठ वायु पुराणात मरुण्ड रूपात सामान्यपणे आलेला आहे, असे पार्जितरने नोंदविले आहे. मत्स्य व ब्रह्मण्ड या दोन्हीत गुरुण्ड पाठ मिळतो. असे असले तरी वायु पुराणात गरुण्ड, गुरुण्ड व मत्स्य पुराणातील काही प्रतीत मुरुण्ड असे पाठ मिळाल्याची नोंद आहे. हे दोन्ही पाठ सुस्थिर आहेत असे त्याने म्हटले आहे. या परिस्थितीवरून असा निष्कर्श निघतो की मूळ पाठ मुरुण्ड असाच आहे. गुरुण्ड शब्द हा लेखकांचा प्रमाद होय. भाषावैज्ञानिकदृष्टया मुरुण्ड शब्दापासून गुरुण्ड शब्द उद्‌गत होणेही शक्य आहे. प्राकृतातील तद्‌भवीकरण परम्परेनुसार मृध्वनीच्या व ध्वनीत परिवर्तीत होण्याच्या स्वभावामुळे, मुरुण्ड शब्दाचे वुरुण्ड रूप शक्य आहे, व या वुरुण्ड शब्दाचे ईराणीत, व ध्वनीचा ग ध्वनी बनण्यामुळे गुरुण्ड असे रूप निष्पन्न होणे नियमानुसारी आहे. (पहा : चौहान, पृ. १०७ व १२४). वुरुण्ड हा पाठ पुराणात नसला तरी, उरुण्ड हा शब्द, मोनियर वुइल्यम्सच्या कोशानुसार अथर्व वेदात, एका असुराचे नाव म्हणून आलेला आहे. एका व्यक्तीचे नाव म्हणूनही हा शब्द इतरत्र आढळतो.

वरील चर्चेवरून ही गोष्ट स्पष्ट होते की गुरुण्ड व मुण्ड ही रूपे मुरुण्ड या मूळ पाठाची चुकीची अथवा तद्‌भव रूपे होत. मुरुण्ड वंशात तेरा राजे झाल्याची नोंद सर्व पुराणे एक मताने करतात. (पाहा : पार्जितर पृ. ४६).

सातवाहनाचे राज्य संपुष्टात आल्यानंतर त्याच्या भृत्य, नोकर वंशातील राजे होतील असे सर्व पुराणे सांगतात. या भृत्यवंशातील राजांची संख्या व त्यांचा राज्यकाल पुराणांत दिलेला आहे. हे भृत्यवंश आभीर, गर्दभिन, शक, यवन, तुषार, मुरुण्ड व हूण होते. राज्यकाल सांगताना किलकिल (कोलकिल) राजांचा उल्लेख आलेला आहे. यावरून असे दिसून येते की सातवाहनांच्या राज्यकालातच आभीर,

शक, मुरुण्ड, हुणादी ईराणी गणांनी पश्चिम भारतात पाय रोवले होते. गिरनार प्रस्तरलेखाचा रुद्रदामन् याचे ढळढळीत उदाहरण आहे. मुरुण्डाना पुराणात म्लेंच्छ असे म्हटलेले आहे.

गुरुण्डा (मुरुण्डा) वृषलौ सार्थं भोक्ष्यन्ते म्लेच्छसम्भवा: ।

वृषल याचा अर्थ पार्जितरने शुद्र, नीच याति असा केलेला असला तरी, वृषल म्हणजे एक जाति, गण असाही अनेक प्राचीन ग्रंथात अर्थ दिसून येतो. मुरुण्ड हे म्लेच्छ वंशात जन्मलेले आहेत असे पुराणे सांगतात. येथे शक संज्ञेचा विदेशी हाच मुख्यार्थ आहे. मुरुण्ड गणाला जरी म्लेंच्छ म्हणून संबोधिले असले तरी मुरुण्ड वंशदृष्ट्या ईराणी आर्य गण होते. मुरुण्ड हे शकच होत असे स्टेन कोनो, प्रबोधचंद्र बागची आदि विद्वानांनी सिद्ध केलेले आहे. कोनो यांनी मुरुण्ड शब्द मृवन्त या शब्दापासून व्युत्पादिलेला आहे. मृ. धातूचा अर्थ मृत्यूला सामोरे जाणे असा असून, मुवन्त म्हणजे शूर, वीर असा होतो.

पुराणातील पैशाची प्रभाव

सर्व पुराणांचे मूळ भविष्य पुराण असून त्याची रचना प्राकृत भाषेत सातवाहन राज्याच्या विनाशानंतर शक १५८ च्या मागाहून झाली. हे पुराण शक १७२ च्या सुमारास रचिले गेले, असा पार्जितरचा निर्वाळा आहे. मत्स्य, वायु व ब्रह्माण्ड ही पुराणे, शक २६० अगोदर, भविष्य पुराणाच्या मूळ प्राकृत प्रतीवरून अनुवादरूपाने अस्तित्वात आली असा त्याने निष्कर्ष काढलेला आहे. सर्व पुराणे मूळ प्राकृताचे संस्कृतीकरण आहेत असे त्याने नि:संधिग्धपणे म्हटलेले आहे. अनेक शब्द व श्लोकार्थ पाली आहेत असे तो म्हणतो (पाहा, पार्जितर, प्रस्तावना पृ. १० व पुढे, पृ. १४/७८).

अशोकाच्या कालापासून (पाहा : चौहान, पृ. १४९) वररुचि व राजशेखरच नव्हे तर हेमचन्द्रापर्यंत ईराणी व पैशाचीचा प्रभाव प्राकृत भाषेला चांगला जाणवत होता, हे स्पष्टपणे दिसून येते. पार्जितरने पुराणांच्या लेखनकाल निर्धारणात प्राकृत भाषेच्या प्रकृतीचा उपयोग केलेला आहे. परंतु त्याने पैशाचीच्या पुराणातील खुणा, पाठनिर्धारणाच्यावेळी ध्यानात घेतलेल्या नाही. पैशाचीची मुख्य खूण म्हणजे तिच्यातील मृदु व्यंजनांचा अभाव व संस्कृत शब्द वापरताना या वर्णाची कठोर वर्णात परिवर्तन या मुद्द्याची चर्चा आम्ही अन्यत्र केलेली आहे. (पाहा, चौहान, पृ. १९४–९५) पार्जितरने उद्धृत केलेल्या पुराण संहितेत शिशुनाग, शैशुनाग, शुंग व योमेध या शब्दांतील क वर्गाच्या ग व ध वर्णाबद्दल काही पुराणांत अथवा त्यांच्या काही प्रतीत अनुक्रमे क व ख झाल्याचे पाठ उपलब्ध व नोंदलेले आहेत. यावरून महत्त्वाच्या पुराणांच्या रचना कालात शक १५० ते ३०० पर्यंत पुराणकार व पुराणांचे नकलाकार यांच्यात काही प्रमाणात का होईना, पैशाची भाषेचा प्रभाव

जागृत होता, ही गोष्ट पुढे येते. वरील शब्दांच्या पाठभेदाचा तपशील पुढील-प्रमाणे आहे.

शिशुनागो (पार्जितर पृ. २.१.१ बिंदूनंतरचा अंक ओळीचा)
मत्स्य व वायु पुराणात सर्वत्र–**शिशुनाको**
शैशुनागा (पृ. २२.१५)
वायु पुराणात–**शैशुनाका**
मत्स्य पुराणात सर्वत्र–**शिशुनाका** (पाहा टीप ४३ व ४७)
शुंगो (पृ. ३०.४)
मत्स्य पुराणात–**शुंको**
शुंग–(पृ. ३३.।)
वायु पुराणात–**शंक–**
शुंगानां (पृ. ४९.७)
वायु पुराणाच्या एका प्रतीत–**शुंकानां**
योमेधः (पृ. ३२.३)
मत्स्य पुराणाच्या एका प्रतीत–**योमेखः**

वरील चर्चेवरून मुरुण्ड शब्दाचे मुण्ड व त्याचेच गुरुण्ड रूप काही पुराणात प्रयुक्त झालेले असले तर ते परिस्थित्यनुसारच आहे असे मानावे लागेल.

मुण्ड म्हणजे तुखार

सातवाहनकालोत्तर झालेल्या राजघराण्यांची जी याद भविष्य, मत्स्यादि पुराणात दिलेली व जी आरंभी उद्धृत केलेली आहे, तीत गर्दभिन (भिल), शक, यवन, तुषार, मुरुण्ड, व हूण हे प्रमुख होत. गर्दभिन हे कोण याचा तपशील अद्यापि पुढे आलेला पाहाण्यात नाही. यवन हे आयोनियन, योन ग्रीक असले तरी त्याचा वापर बदलला होता. शकांसंबंधी भरपूर साधने उपलब्ध आहेत. ते मोठे पराक्रमी योद्धे व राज्यकर्ते होते. तुषार व मुरुण्ड हे एकच होत असे प्रबोधचंद्र बागची यांनी प्रतिपादिले आहे (पाहा, बागची पृ. १४६). तसेच मुरुण्ड व कुषाण हे तुषार, तुखार आहेत हेही बागची यांनी याच प्रसंगी सांगितलेले आहे. एकूण तुषार, मुरुण्ड व कुषाण हे गण एकच होत.

बागची यांनी चूलिक, शूलिक, सुरी व हू याचे समीकरण मांडलेले आहे (पाहा, बागची, पृ. १४१). लि-येन या चिनी कोशकाराच्या फान-यु-त्स-मिंग या संस्कृत-चिनी शब्दकोशात सुरी (=सुली) हा शब्द हू शब्दाचा समीकृत वर्णिला आहे. लि-येन याचा हा कोश इ. सनाच्या ७ व्या ८ व्या शतकातील आहे. त्याने दुसरा एक काही भागच उपलब्ध असलेला समकालीन शब्दकोश वापरलेला आहे.

असे बागची याने प्रतिपादिले आहे. हू या चिनी पाठात हुण, सुरी हे चुरिक सुरी शब्दातील सकाराचा लोप झालेला आहे असे दिसते.

भारतीय प्राचीन संस्कृत इतिहास साहित्यात आढळणाऱ्या हूण शब्दात सुरी शब्दातील स ध्वनीचा ह ध्वनी बनून, र ध्वनीचे न ध्वनीत परिवर्तन झालेले आहे असे दिसून येते. असे परिवर्तन ऐतिहासिक भाषाविज्ञानात नित्याचे आहे. हे परिवर्तन भारोपीय काल, संस्कृत-प्राकृत काल व नव्य भारतीय भाषाकाल यांच्यात आजपर्यंत चालू आहे. म्हणून हूण हे सुरी, सुली, शूलिक, सूरिक व अन्ती सुग्दिगन, सुग्द होत हे तथ्य समोर येते. हूण हा सुग्ददेशीय ईराणी आर्यगण आदि हे स्पष्ट होते. पश्चिम भारतावर शककालाच्या पाचव्या शतकाच्या मध्यात राज्य करणारे तोरमाण व मिहिर कुल (मित्रकृत्) हे पितापुत्र हूण अर्थात् सोग्दियन होते. त्याचप्रमाणे, बाबुर या तुर्कवंशीय मुगलाने शक १४४८ त दिल्लीवर आपले राज्य कायम केल्यावर, त्याचा पुत्र हुमायून याला भारताबाहेर हुसकून लावणारा व श्रेष्ठ प्रतीचा राजा समजला जाणारा शेरशाह हा सुरी वंशातला अर्थात हूण म्हणजेच सोग्दियन होता, हे सत्य पुढे येते. शेरशाह हे त्याचे पडनाव होय. त्याचे मूळ नाव फरीद खान असून तो बिहारमधील सरदार हसन खान याचा पुत्र. बादशाह झाल्यावर त्याने सूरी ही उपाधि आपल्या नावात सम्मीलित केली. शेरशाह सूरीने हुमायुनाला शक १४६२ त देशोधडीला लावले. हुमायुनने शक १४७८ मध्ये दिल्ली पुन: काबीज केली. आपल्या अस्तंगत वंशाचा अभिमान जागृत होण्याची अशी अनेक उदाहरणे इतिहासाला ज्ञात आहेत. धनाजी जाधव हा लखूजी जाधवाचा वंशज. हे ताजे उदाहरण, रजा खान या ३००० सेनेच्या सेनाधिकाऱ्याने शक १८४४ तील पहिल्या महायुद्धाअखेर ईराण देशाला रशियाच्या मगरमिठीतून मुक्त केले. त्याला ईराणी जनतेने काजार या तुर्की वंशाच्या जागी बादशहा मानिले. बादशाह झाल्यावर त्याने सतराशे वर्षापूर्वी झालेल्या आपल्या पहलवी साम्राज्याची स्मृति जागृत करणारे रजाशाह पहलवी असे नाव धारण केले. असो. शेरशाह सूरी हा हूणवंशीय, सुग्ददेशीय हा मुख्यार्थ.

पादानुध्यात

प्रस्तुत मुण्डवंशाच्या ताम्रपटात पाचही राजांना पादानुध्यात असे विशेषण वापरलेले आहे. प्रत्येकजण आपल्या पित्याचा पादानुध्यात आहे. हा एक अल्पसंख्य विदेशी गणाचा विशिष्ट वाक्संकेत आहे, असे मानण्याकडे कल होतो. मुण्ड, मुरुण्ड हा शक गण असल्यामुळे आपल्या कुल-गण-देश परम्परांचा येत्या पिढीतील युवकांवर विशेष संस्कार करण्याची ही त्याची पद्धती असावी असे वाटते. डॉ. मिराशींनी खानदेशातील २ शिलालेख, एक महाराज स्वामिदास याचा व दुसरा महाराज रुद्रदास

याचा, प्रकाशित केले आहेत. दोन्ही एका कालगणनेतील अनुक्रमे वर्ष ६७ व ११७ चे आहेत. तिसरा असाच लेख डॉ. मिराशींनी उल्लेखिला आहे. तो कालवर्ष १०७ चा सहाराज भुलुण्ड यांचा असून तो रमेशचंद्र मुजुमदार यांनी एपिग्राफिया इन्दिका, खण्ड १५ त (पृ. २८६) प्रकाशित केला आहे. हे तिन्ही लेख एकाच राजवंशाचे आहेत (पाहा, मिराशी, पृ. ७२ ते ७५) या तिन्ही लेखातील वातावरण पाहिल्या-नंतर ते शक गणाचे असावेत व कालगणना शककालाची आहे, असे वाटते. या तिन्ही लेखात परमभट्टारक पादानुध्यात हा वाक्संकेत वापरलेला आहे. गुप्तवंशीय द्वितीय चन्द्रगुप्त राजाच्या उदयगिरी लेण्यातील शिलालेखात हा शब्द आला आहे. तो शक ३२३ तील होय (पाहा, सरकार पृ. २७९). याच सुमाराच्या वाकाटक महिषी प्रभावती गुप्ता हिच्या पुणे ताम्रपटात हा संकेत तत्पादपरिगृहीतः असा आलेला आहे.

डॉ. मिराशी यांचे वाकाटक नृपतीच्या पत्रलेखाचे सम्पादन प्रमाण मानले जाते. त्यांनी दिलेला राजांच्या राजवटीचा काल साधारणतः योग्य असाच आहे. अशा परिस्थितीत प्रस्तुत मुंडवंशीय आदित्य राजाचा पादानुध्यात हा सर्वप्रथम उल्लेख मानावा लागेल.

सारांश असा. मुंण्ड हा राजवंश ब्राह्मण नव्हे. तो मुरुण्ड असून शकगणीय आहे. प्रस्तुत ताम्रपटातील मुण्ड हा शब्द मुरुण्ड शब्दाचे विकृत अथवा तद्भव रूप आहे. हूण व सूर, सूरी हे एकच असून, ते सुग्ददेशीय अर्थात् शूलिक, चुलिक आहेत. पुराणग्रंथांच्या रचनाकाळात पश्चिम भारतात पैशाची भाषेचा प्रभाव चांगलाच जिवन्त होता.

संक्षेप व संदर्भ

चौहान—भारत ईराणी संश्लेष, दे. व्यं. चौहान, पुणे १८९५.

पार्जितर—पुराण तेक्स्तस् ऑफ द दिनास्तीज ऑफ द कलि एज, पार्जितर, लंदन १९१३.

फ्राय—कामा ओरियन्तल इन्स्तितयूत, सुवर्ण जयन्ती ग्रंथ,, मुंबई १९६९, रिचर्ड फ्राय.

बागची—इन्दिया अँड सेंत्रल एसिया, प्रबोधचंद्र बागची, कलकत्ता १९५५.

मिराशी—संशोधत मुक्तावली, सर २, वा. वि. मिराशी, नागपूर १९५७.

वार्षिक—विदर्भ संशोधन मंडळ वार्षिक १९७५, नागपूर १९७६, वा. दि. मिराशी.

सरकार—सिलेक्त इन्स्क्रिप्शन्स, दिनेशचंद्र सरकार. कलकत्ता १९६५.

नामदेवांची पंजाब यात्रा

श्री. रा. टिकेकर

श्री नामदेव (स. १२७० ते १३५०) पंजाबात गेले होते; तेथे त्यांनी भक्तिमार्गाचा प्रचार केला; आपल्या अभंगांना औत्तरीय रूप दिले; स्थानिक भाषेत कवने रचिली; आणि गुरुदासपूर जिल्ह्यात घोमान येथे समाधी घेतली. नामदेवांचे सुमारे ६१ अभंग आदि ग्रंथांत समाविष्ट आहेत. इत्यादी रूढ समज संशोधक आपापल्या परीने तपासून पहात आहेत. माझी पहाणी नामदेवांच्या प्रवासापुरती मर्यादित आहे. तिचा निष्कर्ष असा की, आमचे महाराष्ट्रातले नामदेव पंजाबात गेले नसावेत. घोमान (जि. गुरुदासपूर) येथे नामदेव समाधी आहे ती पंजाबी स्वामी नाम-देव यांची. महाराष्ट्रीय नामदेवांची नव्हे.

एक तर पंजाब हा यात्रेचा प्रदेश नव्हता; उलट तो मगध, कलिंग, कामरूप या प्रदेशांप्रमाणे अधर्मी प्रदेश समजत. विशेषत: तेथील स्त्री-पुरुषांचे आचार निंद्य आहेत असा समज प्रचलित होता. " आम्ही वडिलांकडून तुझ्या मध्य प्रदेशाबद्दल काय काय ऐकले " हे कर्णमुखाने शल्याला महाभारतात ऐकविले आहे. त्याचा सज्जन सभेत उच्चार करणे अशिष्टपणाचे ठरेल.

पंजाबात पाच-सहा मोठ्या नद्या असल्यातरी एकाही नदीला कोठेही घाट नाही किंवा एकीच्याही काठी मंदिर नाही. घाटाविना किंवा देवळाशिवाय नदी आपणास ठाऊकच नाही. पंजाबापलिकडे सिंधूला अटक किल्ल्याजवळ एक घाट आहे. त्या घाटावरच एक छोटे मंदिरही आहे. पण तो घाट मराठ्यांनी बांधल्याचे सांगतात. पंजाबविषयी पूर्वग्रह सार्वत्रिक फैलावला जाण्याचे हेही एक कारण असू शकेल.

अशा पंजाबात आमचे नामदेव आपण होऊन प्रचलित लोकमताविरुद्ध जातील असे वाटत नाही. तेथे देवळे कमी असल्याने त्यांच्यासारख्या यात्रेकरूंची व्यवस्था कुठे झाली असेल हा तर प्रश्नच आहे.

नामदेव, नानक आणि आदि ग्रंथ (=ग्रंथसाहेब) यासंबधी तौलनिक कालपट असा—

इ. १२७० नामदेव जन्म.

इ. १४६९ गुरु नानक जन्म.

इ. १५६३ गुरु अर्जुन जन्म.

आदि ग्रंथाची जुळवाजुळव गुरु नानकांनी केली असली तरी प्रत्यक्ष ग्रंथरूपाने ती संहिता अर्जुन देवांच्या हयातीत उपलब्ध झाली. म्हणजे नामदेवांच्या तथाकथित पंजाब यात्रेनंतर सुमारे तीनशे-सव्वातीनशे वर्षांनी आदि ग्रंथ तयार झाला. ह्या कालात नामदेव रचित (हिंदी-पंजाबी ?) काव्य कुठे तरंगत राहिले ? कुणी लिहून अथवा कंठस्थ करून ठेवले ? या प्रश्नांचे समाधानकारक उत्तर मिळाले पाहिजे.

आदि ग्रंथात नामदेवांची कवने आढळतात हे खरे पण ती शुद्ध मराठी नाहीत पंजाबी जनतेला समजतील अशा साध्या औत्तरीय भाषेत ती आहेत, हेही खरे; ती आदि ग्रंथात कशी सामावली ? या प्रश्नाचे उत्तर दिले पाहिजे. नानक गुरुंचा जीवनपट पहाता त्यांनी भारत भ्रमण केले असल्याचा पुरावा मिळतो. ठिकठिकाणच्या लोकप्रिय संतमहंतांची कवने ऐकून, ती स्थानिक पंडिताकडून समजावून घेऊन, आपल्या भाषेत नानक गुरुंनीच ती नोंदून ठेवली असावी असे वाटते.

कारण आदि ग्रंथांत अनेक प्रदेशातल्या पुष्कळ संत-कवींची वचने आहेत. ते सर्व संत पंजाबात गेले असे म्हणता येणार नाही. पण गुरु नानकांनी त्यांची कवने ऐकली. त्यामुळे ते प्रभावित झाले. . . इत्यादि इतिहास आहे. आदि ग्रंथांत इतर धर्मपुरुष आहेत (त्यांची कवने आहेत) ते :—

शेख फरीद, धन्ना, भकिन, जयदेव, कबीर, पीपा, रामानंद, रविदास, सूरदास, त्रिलोचन . . . इत्यादि.

हे सर्व संत पंजाब, यात्रेला गेले होते त्यांची कवने त्या त्या काळापासून पंजाबात रूढ होती. आणि मग त्यांचा समावेश आदि ग्रंथांत झाला असे अनुमान काढता येणार नाही.

घोमान येथील नाम-देव समाधीने हा घोटाळा उडविला आहे. एकतर ही समाधी नामदेवांची नव्हे. त्यांच्या काळचीही नव्हे. उपलब्ध वर्णनांवरून पंजाबी नाम-देव स्वामी चांगले धिप्पाड दिसतात; त्यांच्या जटा, दाढी, मिशा पाहिल्यावर खात्री पटते की, हे स्वामी पंजाबी असावे, महाराष्ट्रीय नसावे.

घोमान समाधीबाबत सरकारी निरीक्षण असे आहे की या समाधीला कुठलेही ठळक " दान " नाही. ही मराठी नामदेवांची समाधी असती तर मराठी अमदानीत तिचा परामर्ष मराठे सरदारांनी घेतला असता हा स्वाभाविक तर्क. अटकेपार भगवा झेंडा नेताना आणि पंजाबवर सत्ता गाजविताना मराठ्यांचे या समाधीकडे लक्ष गेले नाही. ही घटना दुर्लक्षण्यासारखी नव्हे. म्हणून घोमानच्या समाधीचा संबंध मराठी नामदेवांशी पोचत नसावा.

★ ★ ★

सारांश, पंजावी समाजस्थितीची ख्याती लक्षात घेता, तिकडे यात्रेला जाण्याचे काही खास प्रयोजन नसता, नामदेव पंजाबात गेले असतील असे म्हणवत नाही. त्यांचा काल आणि आदि ग्रंथ संहिता प्रकट झाली तो काल यामध्ये ३–३।। शे वर्षांचे अंतर असल्याने नामदेव कवनांचा शीख धर्मग्रंथात समावेश निराळ्या प्रकारे झाला असावा. कबीर, सूरदास, जयदेव, रामानंद इत्यादि अनेक कवींची कवनेही त्या आदि ग्रंथात ज्या प्रकारे समाविष्ट झाली त्या प्रकाराने महाराष्ट्रीय नामदेवांचीही झाली असावी. तेवढ्यासाठी नामदेवांच्या पंजाब यात्रेची आणि तीन-सव्वातीन शतके त्यांची कवने तत्रस्थात रूढ ठेवण्याची आपत्ती ओढवू नये.

The Dating of the Mahayana Caves at Ajanta : A Historical Perspective

T. V. Pathy

"Chronology and Geography" says Dr. G. Yazdani, "are the two eyes of history[1]" but in ascertaining the chronological phases of the excavation of the various caves at Ajanta, the known history becomes an indispensable aid. The enduring cave temples excavated and sculptured at Ajanata and the pictorial expressions of the 'Jatakas' and the life of the master through the medium of the murals served not only a hortatory religious purpose but was also an expression of the creative genius of the talented followers of the Buddhist faith. Though the expressions are rooted in manifesting the accepted faith. through artistic creativity, the nuances reveal the peculiar emphasis of the shifting sociological and cultural patterns of the time. Thus the murals, the sculptures and the various architectural motifs at the Ajanta caves represent the organic growth of the evolving religious and creative refinement spread over several centuries. In this context a study of the chronological phases of the excavation of the major group of caves becomes complicated where the need for refinement required the artists of a later generation or generations to rework and rehash the existing expressive details. Most studies of the chronological evolution and excavation of the caves lend themselves to controversal counter--expositions in the absence of definitive historical support. This essay, it is feared may not solve any of the more controversial problems, but it is intended to suggest a new avenue for the revaluation of the chronology of the Mahayana group of caves based upon years of familiarity and recorded historical evidence.

The literature available on the dating of the Mahayana group of caves, meagre as it is, illustrates the divergence of

opinions held by the scholars. Dr. Walter Spink's view[2] that the Ajanta Caves, the Ghatotkacha Caves and Caves I and III at Aurangabad were excavated between Circa 465 A. D. and Circa 500 A. D., roughly corresponding to the rule of king Harisena of the Vakatakas, has not only generated fresh interest in the study of the chronology of the caves but also begs for a serious scrutiny as it has attempted to define with a degree of exactitude the precise chronological period of the excavation. Dr. Spink's eminence and authority does really make one cautious and circumspect, but the following observations appear to be necessary.

For example, the inscriptions in Caves XVI and XVII record that the excavations were undertaken at the behest of Varahadeva and the Rishika family, one of the ministers and a family of feudatory lords respectively of King Harisena. Obviously Harisena's or the Vakatakas' direct and exclusive patronage is not recorded. Prof. Mirashi[3] has also in his book entitled 'Vakataka Inscriptions' suggested that only in three places out of the eighteen records the association of the feudatory lords of the Vakataka dynasty with the Buddhist faith are mentioned, but no relation is established between the Vakataka dynasty **Per se** and the Buddhist rock cut temple activities. This naturally gives scope to the valid conjecture that the Buddhist excavatory activities were conducted on a limited scale by people not necessarily from the royal family, but possibly outside of it and might have spilled over into the rule of the succeeding dynasties.

Further, the disintegration of the Gupta empire provided Harisena with tempting opportunities of conquest and annexation The ambitious Harisena, according to the incontrovertible historical records did not let go the opportunity and undertook various campaigns of expansion. Verse 18 in the inscription at Cave XVI specifically states among other things that Harisena

conquered 'Kuntala, Avanti, Kalinga, Kosala, Trikuta, Lata, Andhra' etc.[4] It would be rather difficult to be persuaded to to believe that Harisena could have shown any interest in the excavations or could have provided the resources when he was totally committed for the major part of his rule to expensive martial activities.

As for the argument that liberal donations by some individual traders or the benevolence of trade guilds could also have covered the expenses, one would like to point out that in the absence of definite proof, the suggestion that the work was commissioned during the time of Harisena alone, would not be satisfactory. The traders and the trade guilds had no doubt provided the fiscal resources for the excavations, but to trace their contributions to the 35 years rule of Harisena, lacking support from authentic records, becomes untenable in establishing the chronology of the caves. Again, in the study of chronology the similarities and continuity of architectural motifs would at best become a conjectural possibility, and no more. For example, the architectural styles of the free standing pillar in the courtyard of Cave XXXII and those of Caves II, XVI & XXIX are howsoever similar, a time gap of nearly 200 years between these two groups is clearly established on the basis of epigraphy and other associated evidences[5].

The belief that the excavations of the Mahayana group of caves was not exclusively confined to the historical period of Harisena gains in support by the dedicatory inscription at Cave XXVI. The donor of the cave fondly remembers Bhavviraja one of the ministers of the Asmakas as a cherished friend and dedicates the cave to his memory.[6] According to Dandin's **Dasakumaracharita**, the Asmakas succeeded the Vakatakas by engineering a successful revolt and by deposing them. Thus there is sufficient evidence to support the view that at least Cave XXVI of Mahayana group of caves was excavated during the

rule of the Asmakas when they had asserted their independent authority as rulers. This can be further corroborated by pointing out the differing architectural style and sculptural patterns between Cave XXVI and Cave XIX. Unlike cave XIX which has an incipient pillared porch and a court yard, cave XXVI, in its planning and general execution is more complex. The pillared verandah in front with two pillared chambers on each side of the court-yard and possibly a ministral gallery (the projected portion from the Chaitya window and supported by the verandah has pillars fallen) act as the forebears of the Chaitya complex as noticed in Cave X at Ellora. Further, the pillar profiles of Cave XXVI and its vaulted roof also exhibit a considerable amount of transformation when compared to that of Cave XIX. The sculptures of Cave XXVI are more standardised and repetitive and have lost the classical touch of grace, refinement and proportion. All this certainly proves that there was a definite time gap between Cave XIX and Cave XXVI and it could have been possibly more than the short period of 35 years assigned to all the Mahayana Caves at Ajanta.

It is also believed that the Kalachuris undertook a series of rock-cut excavations in the Konkan region and at Ellora and Aurangabad. The possibility of Kalachuri patronage towards the excavation of the later Mahayana caves at Ajanta cannot be ruled out. The Abhona plates of Sankaragana dated A. D. 595 and found in the Nasik district record the grant of land in the **Bhogavardhana Vishaya**[7]. Bhogavardhana, has been wrongly identified with Govardhan, the ancient name of Nasik region. But it can be identified with the present day Bhokardhan, a taluka place in Aurangabad district. It was one of the important trading centre rivalling Pratishthanapura, Tagara, and Bhrugukacha during the Satavahana[8] rule. It was a Vishaya or an administrative division under the Kalachuris and Ajanta lay within a distance of 20 miles from Bhogavardhana. Though the Kalachuris were staunch followers of ‘ Pasupati ’ from of Lord

Siva, yet it may be presumed that they were sufficiently Catholic towards other religions too. Their rule was however, shortlived, but still their personal predilictions towards the Shiva cult did not hamper the Mahayana phase of Buddhistic art at Ajanta, despite the fact that the Ajanta site was within their territorial jurisdiction.

By the beginning of the 7th century the entire southern dominion of the Kalachuris was appropriated by the Chalukyas under Mangalesa (Mahakuta Pillar Inscription of Mangalesa, issued in the year 602 A. D[9].) Pulakesin II (610--11--642 A.D.) was referred to as the lord of Maharashtra by Hiuen Tsang and this is amply justified by the fact that he defended his territories against Harshavardhana on the banks of the river Narmada far beyond Maharashtra territories. The discovery of Lohner grant in Nasik district of A. D. 630 shows that this area was already under the direct rule of the Chalukyas[10]. The Chalukya rule witnessed a vigorous temple building and excavation activities. Due to the paucity of documentary evidence we are greatly handicapped in fixing the dates and the authorship of the Buddhist caves around Aurangabad. However, one would notice the impact of the Chalukyan art and architecture in these monuments. The Ajanta paintings in Caves I and II depict the Persian and Sassanian motifs, palace scenes, which are absent in the early paintings. Perhaps the prevailing contacts, political as well as religious, between Central Asia and the Deccan during the Chalukyas were reflected in these paintings. The stylised paintings in Caves I and II reveal a marked stylistic and technical differenciation and possibly were undertaken at a temporal point different from the rest.

The engraving of another inscription between Caves of XXVI and XXVII datable on palaeographical grounds to about the eighth century[11] supports the view that the excavation continued beyond A. D. 500. The purpose of the inscription is

not clearly known as it is badly mutilated. But it has been adduced on the basis of the reconstructed reading of the inscription that it belonged to the early Rashtrakuta family of the Berar Branch. It is difficult to trace relationship with the Chalukyas. Possibly there was a contention for power and hegemony between the neighbouring Rashtrakutas and the successors of Pulakesin II who had not established themselves firmly. The mention of Vajrata, in the **Nasik plates** issued by Dharasraya Jayasimha, a son of Pulakesin II, and the eulogistic mention of the same Vajrattadeva in Ajanta inscription bears out the fact that the adversary of the Chalukya ruler had some sort of a supremacy for a time over the Ajanta region, which was basically a Chalukya territory.

These evidences, I fear, make the neat fixation of the chronology of the Mahayana group of caves within the span of 35 years, between Circa 465 A. D. and Circa 500 A. D. quite untenable[12]. It may perhaps be more appropriate to suggest that the excavation of the Mahayana group of caves could not have been successfully completed in a short period of sustained activity but was spread over several centuries. In the light of the evidence and observations suggested in this paper, one is prone to believe that the Mahayana group of caves numbering about 25 of the 30 caves at Ajanta embraced the regimes of the Vakatakas, the Asmakas, the Kalachuris, the Chalukyas and the Rashtrakutas of the Berar Branch. Thus it apparently spanned the historical period starting from roughly 465 A. D. to 700 A. D. and that I suggest is the chronological period of the excavatory activities connected with the Mahayana group of caves.

1. Yazdani,(Ed.) : The Early History of the Deccan, p. 151.
2. Spink : Ajanta to Ellora Marg 1967. p. 7.
3. Mirashi : Corpus Inscriptionum Indicarum, Vol. V (Vakataka Inscriptions). p. 42
4. ——— Vakataka Inscriptions in Cave XVI at Ajanta, Hyderabad Archaeological Series Vol. 14.

5. Pathy T. V. : Ellora : A cultural study (unpublished thesis) Plates II–IV
6. Yazdani : Ajanta. Vol. IV. p. 114.
7. Mirashi : Corpus Inscriptionum Indicarum, Vol. IV Part–I. pp. 39–40
8. Deo (Ed.) : Excavation at Bhokardan, p. 210
9. Yazdani (Ed.) ; The Early History of the Deccan, p. 209
10. Majumdar(Ed.) : The Classical Age, p. 235
11. Yazdani : Ajanta, Vol. IV p. 122
12. Walter Spink cites the evidence of tha inscriptions of Caves XVI and XVII and suggests a period of thiry five years for the entire Mahayana excavations at Ajanta. Apart from the characteristic Vakataka and the post Vakataka artistic peculiarties which are so evident in Caves XV, IX and I, II and XXVI respectively.

Summaries

The new Laboratory of the Mandala was declared open by Shri Jayantrao Tilak M.P. on 28th June 1976. Shri G. V. Natu Treasurer of the Mandala presented at that time a brief report of the tasks accomplished by the present Executive during the last two years. The salient points he emphasised in that report are :

(a) Addition of more than 1,500 original documents and 500 manuscripts to the Mandala collection mainly through the efforts of Prof. G. H. Khare. He was assisted by Shri R. P. Goswami.

(b) Preparation of a descriptive catalogue of the miniatures in the Mandala collection. Dr. Mate is preparing it and is assisted by Smt. Usha Ranade. Smt. Ranade and Smt. Kamal Chavan have prepared a monograph on the 'Tala-paintings' in the BISM Collection. It is being published with financial assistance from the Central and State Governments. The printing is complete and it would be released soon.

(c) Prof. Khare has prepared a new chronology of events in Maratha history, utilising the latest available source material. It is in the press.

(d) Two Seminars, one on the 'Policy of Shivaji' and the other on the 'Sources on the Biography of Jnyaneshwar' were held in the early part of 1976. More than fifty scholars from all over Maharashtra participated. Shri V. T. Shete, Prof. Khare, Dr. Parchure, Dr. Kanade were mainly responsible for the success of these seminars.

(c) Steps have been taken to modernise the laboratory facilities available in the Mandala. More attention is being paid to the problems of preservation of documents and paintings. Dr. Mujumdar is guiding the modernisation programme. The Union

Government has sanctioned a sum of fifteen thousand Rupees for this purpose.

Shri Tilak assured the Mandala of his full co-operation in securing Government assistance.

Gulwani M. G. : The author has attempted to locate the site (near Fort Panhala) of the building known as 'Bardvari' built by Chhatrapati Sambhaji.

Gokhale S. : A few Copper Coins of the Kalachuri King Krishnaraj have been discovered at Gharapuri. This is the first board of its kind and the author discusses its significance.

Chavan K. : Discussion of the motif of Nari-Kunjara found on the walls of the eighteenth century mansion of the Holkars at Chandwad.

Ranade U. : An attempt to interpret six miniatures having the outward form of Ragamala paintings but in reality dealing with some unknown Yogic practices.

Pasalkar D. N. : A brief account of the family history of the famous Baji Pasalkar, one of Shivaji's trusted collegues.

Mate M. S. : An introduction to an illustrated manuscript of 'Yusuf and Julaikha' in the possession of the Deccan College.

Ranade H. G. : The paper offers a new interpretation of two terms 'akshadhur' and 'akshapali' used in sanskrit sacerdotal literature.

Valvekar D. : Discussion of a caste-feud in the Somavamshiya Sahasrarjuna Kshatriya community.

Thite G. U. : Introduction to various rituals current in Vedic society regarding omens.

Pethe M. P. : Discussion of some literary works mistakenly passing as works of Jnyaneshwara.

Shastri S. : An introduction to some 18th Century archival material at Wai, Benaras and Poona.

Kanade M. S. : Study of words and word-formations in the Lilacharitra.

Chitale V. D. : Cultural study of 'Dasarnava' by Dasopant a 16th Century poet of Marathawada.

Saswadkar P. L. : A life sketch of Netaji Palkar.

Divekar V. D. : An account of the various articles of historical and artistic interest belonging to Sir Charles Mallet and preserved by his descendants.

Chauhan Devising : The author contends that the 'Mund' dynasty, mentioned in the copper-plate found at Malhara were Sakas.


Tikekar S. R. : Author contends that contrary to popular belief Namdeo had never been to Punjab.

पथी टी. व्ही. : अजंठयाच्या महायान गुंफांचा काल, स्पिक यांच्या मताने इ. स. ४६५ ते इ. स. ५०० असा असला तरी ह्या गुंफांची निर्मिती एवढ्या थोड्या कालावधीत झालेली नाही तर त्यासाठी इ. स. ४६५ ते ७०० एवढा विस्तृत कालावधी लागला असला पाहिजे असे शिलालेखातील माहितीवरून आणि वास्तु-शास्त्रीय अभ्यासावरून स्पष्ट होते.

♠ ♠ ♠


१४४

आकृती ८



सोमशकट : ह. गो. रानडे

आकृती १




बारद्वारीचे अवशेष : मु. गो. गुळवणी

आकृती २




कलचुरी कृष्णराज याची नाणी : शोभना गोखले

आकृती ३



कलचुरी कृष्णराज याची नाणी : शोभना गोखले

आकृती ४




चांदवडचा नारीकुंजर : कमल चव्हाण

आकृती ५



नीलराग व रागवधू : उषा रानडे


आकृती ६



हंसरागपुत्र : उषा रानडे


आकृती ७





'युसुफ-जुलैखा 'तील चित्रे : म. श्री. माटे

आकृती ७ अ



बाजी पासलकर वाड्याचा चौथरा : द. न. पासलकर